# अजून जग जिवंत आहे

निर्मलकुमार फडकुले




# अजून जग जिवंत आहे !





# अजून जग जिवंत आहे !



निर्मलकुमार फडकुले

सुविद्या प्रकाशन

**Ajoon Jag Jivant Aahe**

**Nirmalkumar Phadkule**

© डॉ. निर्मलकुमार फडकुले

**प्रकाशक :**
बाबूराव मैंदर्गीकर
सुविद्या प्रकाशन
'गंगा निवास',
३७४, उत्तर कसबा, सोलापूर-०७
फोन : २७२२५१०

**मुद्रक :**
विनंद ऑफसेट
टिळक चौक, सोलापूर.

**प्रथमावृत्ती** : जून २००५

**अक्षर जुळणी :**
जयंती ऑफसेट
सोलापूर - ४१३००७
फोन : २७२४४१५

**मुखपृष्ठ :**
शिरीष घाटे

**मुद्रित शोधन :**
पुरुषोत्तम नगरकर

मूल्य : १०० रुपये

अजून जग जिवंत आहे' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक २००५ साली 'सुविद्या प्रकाशन' यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# अजून जग जिवंत आहे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

शिवाजी विद्यापीठाचे पूर्व कुलगुरू आणि माझे मित्र

स्व. के. भोगिशयन

यांच्या संजीवक स्मृतीला

# थोडं मनातलं

माझ्या ललितलेखाचं हे नवं पुस्तक आपल्यासमोर ठेवताना मला आनंद होत आहे. ललितगद्य हा साहित्यप्रकार मला विशेष आवडतो. यात लेखकाच्या मनःप्रकृतीचे विविध रंग सहजतेनं प्रकट होऊ शकतात. एका मर्यादित अर्थानं लेखकाच्या व्यक्तिमत्वाला भिन्नभिन्न रंगरेषा यातून दिसतात. स्वतःशी आणि वाचकांशी मोकळेपणानं बोलण्याचा आनंद अशा लेखनातून अधिकांशानं मिळतो. साहित्यसमीक्षा, संतकाव्याची चिकित्सा, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांची चर्चा करणारी माझी इतरही पुस्तकं आहेत. पण ललितगद्य हा खेळकर आणि काहीसा खोडकर स्वैर वाङ्मयप्रकार मला अधिक मानवतो. इतर साहित्यप्रकारांचे गुणधर्म यातही मिसळलेले असतात. लालित्य हा तर या लेखनाचा आत्मा असतो. इंग्रजी साहित्यात ललितगद्याचं भरघोस पीक आलेलं दिसतं. त्या तुलनेत मराठीतलं ललितगद्य अद्यापी कमी वैशिष्ट्यपूर्ण असलं तरी ते विकासाच्या वाटा शोधत चाललं आहे असं निश्चितपणानं सांगता येतं.

'अजून जग जिवंत आहे' हा माझा आठवा ललित लेखसंग्रह प्रकाशित होत आहे. काहीतरी सांगण्याची आंतरिक उर्मी प्रबल झाल्याशिवाय मी हातात लेखणी घेतली नाही. संपादकांनी मागणी केली म्हणून लिहिण्यासाठी बैठक मारून बसलो नाही. सभोवतालच्या जगांत कडू आणि गोड इतकं काही घडत असतं की ते सजगपणानं पाहात असताना विचारभावना उचंबळून येतात. यातले लेख त्या उचंबळल्या विचारांचं प्रतिनिधित्व करू शकतात असं मला वाटतं. जे लिहिलं ते कितपत समर्थ आहे हे वाचकांनीच ठरवायचं आहे. माझ्या लेखनाबद्दल अहंपणाचा उद्‌गार मी काढणार नाही. माझी भूमिका 'वेडेवाकुडे गायीन परि तुझाच म्हणवीन', इतकीच आहे. या

संग्रहातले बहुतांश लेख 'संचार' या नियतकालिकातून प्रकाशित झाले. काही 'लोकमत' व 'पंढरी संचार' यात प्रसिद्ध झाले. हे ललितलेखन एकत्रित करून पुस्तकरूपानं प्रकाशित करण्याची जबाबदारी सुविद्या प्रकाशनाचे संचालक श्री बाबूराव मैंदर्गीकर यांनी घेतली. या सर्व लेखनात एक मध्यवर्ती सूर प्रतीत होतो तो हा की, कुणीही काहीही म्हटलं तरी हे जीवन आपण सर्वांगानी जगावं इतकं बहुरंगी आणि सुंदर आहे. दुःखवेदनांच्या चक्रव्यूहात संघर्ष करतानाही जीवनाला आनंदाचा गंध येऊ शकतो. हा दृष्टिकोन वाचकांना मान्य होईल अशी माझी अपेक्षा आहे. काटे फार आहेत पण काट्यांत विखुरलेली फुलं टिपताना काट्यांची बोच सहन करायला काय हरकत आहे ? हे मी नवीन सांगत नाही. हे तर आमचं प्राचीन तत्त्वज्ञान आहे, पण हे जुनं झालेलं चंदन पुन्हा थोडंसं उगाळण्याचा प्रयत्न मला आनंददायक वाटला म्हणून हा लेखनप्रपंच गंध मिळाला, तर स्वीकारावा. नाहीतर 'शब्द बापुडे केवळ वारा' असं म्हणून सोडून द्यावा. प्रकाशक श्री. मैंदर्गीकर आणि चित्रकार श्री. शिरीष घाटे यांचे मनःपूर्वक आभार.

**- निर्मलकुमार फडकुले**

जगावं की मरावं ? / १
उदंड झाले नेते ! / ६
प्रेम कोणावर करावे ? / १४
मायमराठीची विटंबना / १९
भोगरसिक आणि भोगलंपट / २५
अजून यौवनात मी ! / ३०
शिवछत्रपतीशी 'संवाद' / ३५
विद्येच्या क्षेत्रातली बांडगुळे / ४०
जाऊनिया तीर्था तुवा काय केले ? / ४५
लेखकाचा धर्म / ५०
कुठे आहे तो देव ? / ५४
कालाय तस्मै नम: । / ५९
सूर्यावर थुंकणारे अतिशहाणे / ६५
अजून जग जिवंत आहे / ७०
राजकारण आणि तत्त्वनिष्ठा / ७५
पुतळ्यांची कथा आणि व्यथा / ८०
मला वकील व्हायचं होतं / ८५
मीरेची प्रेमकहाणी / ८९
वक्ते आणि वक्तृत्व / ९५
जीवनाचा अर्थ काय ? / १००
घनु वाजे घुणघुणा / १०५

# जगावं की मरावं ?

अर्नेस्ट हेमिंग्वे हा एक मनस्वी प्रकृतीचा बेदरकार लेखक होऊन गेला. कादंबरीकार म्हणून त्यानं अफाट कीर्ती मिळवली. 'द ओल्ड मॅन अँड द सी' ही त्याची एक विलक्षण गाजलेली कादंबरी. लेखणी आणि बंदूक चालवण्यात हा पाश्चात्य लेखक निष्णात होता. तो स्वैरपणानं जगला. जगताना त्यानं सोवळेपणाचे सगळे संकेत उद्दामपणे बाजूला सारलेले होते. आयुष्यात त्यानं अनेक रंगढंग केले. लेखणीवर जसा त्याचा विश्वास होता त्याप्रमाणंच बंदुकीवरही होता. या स्वच्छंदी वृत्तीच्या लेखकानं स्वत:वर गोळी झाडून आपल्या जीवनाचा शेवट केला. आत्महत्या करण्याचं कारण तरी काय ? तो म्हणत असे, 'अंथरुणावर परावलंबी होऊन पडायचं आणि मग अगतिक होऊन एक दिवस मरणाला शरण जायचं हे मला आवडणार नाही. त्यापेक्षा आपणच स्वत: होऊन मृत्यूला आमंत्रण दिलेलं चांगलं नव्हे का ? हा त्याचा युक्तिवाद त्याच्या साहसी, बेगुमान स्वभावाला साजून दिसतो. पण आत्महत्या करण्यात शौर्य किंवा धैर्य आहे हा समज मला तरी चुकीचा वाटतो. प्रत्येक आत्महत्या ही कोणत्यातरी वैफल्यातून घडलेली असते. विफलतेचं दु:ख असह्य झाल्यामुळं मृत्यूला जवळ करण्याची ही कृती कितपत सयुक्तिक आहे याचा विचार केला पाहिजे. हेमिंग्वेच्या आत्महत्येमागं त्याच्या दृष्टीनं एक विचार होता. जन्मभर स्वैर जीवन जगलेल्या माणसाला आयुष्याच्या शेवटी कदाचित विकल अवस्थेत कोणाच्या तरी दयेवर अवलंबून राहावं लागेल याची भीती वाटत होती. याचा अर्थ हेमिंग्वे भयानं व्याकूळ झाला होता. त्याची आत्महत्या एखाद्या उदात्त कारणासाठी घडलेली नव्हती. अनेक प्रकारच्या भीतीतून माणसं आत्महत्येला प्रवृत्त होतात. कोणी अपयश सहन होत नाही म्हणून, कोणी जगात अप्रतिष्ठा झाली म्हणून, कोणाला असाध्य रोगाशी झगडता येत नाही म्हणून किंवा कोणी घरात छळ होतो म्हणून आत्मघात करून घेतात. जीवनाचं भय अथवा आपत्तींचं भय हीच प्रामुख्यानं आत्महत्येची कारणं असतात. निर्भयपणानं आत्महत्या घडल्याचं उदाहरण क्वचितच असेल. पण जगण्यापेक्षा मरणं हेच सुलभ आणि सुखकर वाटावं ही प्रकृती नसून विकृती आहे असं म्हटलं तर ते विवाद्य ठरू नये.

काही माणसं अगदी क्षुल्लक कारणांसाठी आत्महत्या करतात. आठवी किंवा दहावीच्या परीक्षेत अपयश आलं म्हणून स्वत:ला पेटवून घेणाऱ्या किंवा विहिरीत उडी टाकणाऱ्या मुला-मुलींच्या वार्ता ऐकल्या की मला धक्काच बसतो. दिवसभर मनात विचारांचा कोलाहल माजतो. माझ्या परिचयातल्या एका पंधरा वर्षांच्या मुलीनं परीक्षेत दोन विषयांत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले म्हणून जंतुनाशक द्रव्याची बाटली घशाखाली घातली. त्यातच तिचा मृत्यू झाला. आत्महत्येचं कारण तिनं आपल्या वहीत लिहून ठेवलं होतं. या कोवळ्या अश्राप जीवानं अद्यापी जीवन पाहिलं नव्हतं. परीक्षेतले गुण कमी-अधिक असले तरी या घटनेला प्राणापेक्षा अधिक महत्त्व देणं वेडेपणाचंच होतं. परीक्षेच्या पेपरपेक्षा निसर्गानं आपल्याला दिलेलं हे सुंदर आयुष्य सहस्रपटीनं अधिक चांगलं आहे एवढाही विवेक भावनेच्या आवेगात मुलांना सुचू नये, याची जबाबदारी जितकी त्यांच्या वेडेपणावर तितकीच त्यांच्या पालकांच्या शहाणपणावरही असते.

माझ्या ओळखीचे एक पालक आपल्या इयत्ता सातवीतल्या कन्येला सांगत होते, 'वर्गात पहिला नंबर आलाच पाहिजे. मी शाळेत होतो तेव्हा माझा कधीही दुसरा नंबर आला नाही. तुला कमी मार्कस् मिळाले तर माझ्याशी गाठ आहे हे लक्षात ठेव. नापास झालीस तर मला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. जग माझ्या तोंडावर थुंकेल. पहिला नंबर सोडायचा नाही.' अशी मुक्ताफळं मूर्खपणानं उधळणाऱ्या पालकांना मुलाचं मानसशास्त्र कधीच कळत नाही.

रागावून आणि वाटेल ते बोलून बालकांची मनं घायाळ केल्यानंतर परीक्षा आणि पेपर या गोष्टींबद्दल मुलांना कायमची धास्ती वाटत राहाते. ती आवडीनं नव्हे तर भीतीनं आणि वडिलांच्या धाकानं अभ्यास करू लागतात. पण त्यांचा आत्मविश्वास पालकांच्या भयामुळं ढासळून गेलेला असतो. वर उल्लेखिलेल्या गृहस्थाची कन्या परीक्षेत पहिला क्रमांक मिळवू शकली नाही. निकालपत्र पाहिल्यावर ती वर्गातच रडू लागली. तिचा तिसरा क्रमांक आला होता. आता घरात आपले वडील काय अकांडतांडव करतील याची तिला कल्पना होती. ती घरी गेलीच नाही. घरापासून दूर असलेल्या एका देवळाच्या ओट्यावर रात्र होईपर्यंत उपाशी पोटी बसून राहिली. आत्महत्येचे विचार अनेकवेळा तिच्या मनात घोळले असतील. या प्रसंगाची जबाबदारी माझ्या मते त्या अविचारी पालकावर आहे. हळुवार शब्दांनी आपल्या मुलीचा आत्मविश्वास त्याला जागृत करता आला असता. दोन-चार गुण

कमी पडले किंवा वर्गात अगदी शेवटचा क्रमांक आला असता तरी आभाळ कोसळून पडलं नसतं. कित्येक आत्महत्या अशा चुकीच्या कारणानं घडतात. सासरी सारखा छळ होतो, किंवा नवरा सतत भांडण करतो, ही कारणं हळव्या स्त्रियांच्या आत्महत्येला पुरेशी ठरतात. जगण्याचं भय वाटावं अशी परिस्थिती उद्‌भवल्यावर मृत्यू हाच आपला जिवलग आहे असं वाटलं तर त्यात आश्चर्य नाही. जेव्हा सारेच दरवाजे दुर्दैवानं बंद असतात तेव्हा मरणाचं दार उघडं आहे हे पाहिल्यावर माणूस त्या दाराकडंच वळणार यात शंका नाही. पण याला भित्रेपणाशिवाय दुसरं नाव देता येत नाही. मरण्यापेक्षा धैर्यानं जगण्याचा निर्धार करून जीवनाला सामोरं जाणं हेच आवश्यक आहे. माझ्या मते हेमिंग्वेची आत्महत्यादेखील त्याच्या दुबळेपणाची द्योतक आहे. आत्महत्या करणारी माणसं जीवनापासून दूर पळण्याचा प्रयत्न करतात. ही पलायनवादी भूमिका घेण्यापेक्षा जीवनातल्या आपत्तींशी निर्धारानं दोन हात करीत राहिलेली माणसं अधिक शूर असतात असं मला वाटतं.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना ऐन तारुण्यात पन्नास वर्षे जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. अंदमानच्या कुप्रसिद्ध सेल्युलर जेलमध्ये एका अंधारकोठडीत त्यांना डांबण्यात आलं. कोलू फिरवून खोबऱ्याचं तेल काढण्याचं काम दररोज आठ-दहा तास करायचं. कसलंतरी कदान्न कसंबसं खायचं आणि भयाण एकांतात अंधारकोठडीत पडून राहायचं, हे त्यांच्या प्राक्तनात लिहिलं होतं. आपण या अवस्थेत जगण्यापेक्षा गळफास घेऊन आत्महत्या करावी हा विचार त्यांच्या मनात पुन्हा-पुन्हा येऊ लागला. फासाच्या एका हिसक्यात या क्रूर बंदिवासातून आपली सुटका होईल आणि मृत्यूच्या मांडीवर आपण सुखाची झोप घेऊ शकू हा विचार बळावत गेला. पण त्यांच्या विवेकी मनानं त्यांना समजावून सांगितलं, 'तुझ्या आत्महत्येनं काय साधणार ? तू मेलास तर ते इंग्रजांना पाहिजेच आहे. त्यांचं अनायासे काम होईल. भित्रेपणानं मरून जाण्यापेक्षा तू या यातना सहन करीत जगत राहिलास तर स्वातंत्र्याच्या चळवळीला अधिक गती मिळेल. लढाऊपणानं जगण्यात पुरुषार्थ आहे. जगला-वाचलास तर स्वातंत्र्य चळवळीची ज्वाला अधिक भडकवण्याचं काम तू करू शकशील.' सावरकरांच्या हताश मनात पुन्हा जीवनाच्या उत्साहाचा संचार झाला. त्या शूर ध्येयवाद्याचं मन थोडावेळ मरगळलं होतं. पण ते पुन्हा धगधगू लागलं. आपल्या आत्म्याच्या अमरत्वाची रसरशीत जाणीव त्यांना झाली. आत्मघाताचा दुबळा, पुरुषार्थहीन विचार त्यांनी झटकून टाकला. तशाही अवस्थेत

त्यांच्या तप्त मनातून एक कविता उफाळून आली,

अनादि मी, अनंत मी,
अवध्य मी भला
मारिल रिपु जगति असा
कवण जन्मला
अग्नि जाळि मजसि
ना खड्ग छेदितो
भिऊनि मला भ्याड मृत्यू
पळत सुटतो

या तेजस्वी रसरशीत अक्षरात आत्मशक्तीची ज्वाला उचंबळून आलेली दिसते. सेल्युलर जेलमधील भयानक छळाला तोंड देणं शक्य होत नाही म्हणून कित्येक कैद्यांनी आणि देशसेवकांनी आत्महत्याही केल्या. पण पायात मणामणाच्या बेड्या ठोकलेल्या असूनही सावरकरांचं मन स्वतंत्र राहिलं. आत्महत्येच्या विचाराची बेडीदेखील त्यांनी तोडून टाकली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर पुन्हा राष्ट्राच्या मनात आपल्या दाहक विचारांची पेरणी करण्यासाठी हा स्वातंत्र्यवीर झगडत राहिला. भित्रेपणानं जीवनाला चिकटून राहू नये. आणि दुबळेपणानं मरणालाही बिलगू नये. प्रहार झाले तर प्रतिप्रहार करण्याची रग मनात ठेवली पाहिजे. आत्महत्येनं कोणताही प्रश्न सुटत नाही. फक्त आत्मघात करून जीवनाशी असलेला संबंध तोडता येतो. पण त्यातून काहीच साधता येत नाही. आत्महत्येचा विचार जेव्हा अत्यंत प्रबल होतो तो क्षण जर जिंकला तर त्यानंतर आत्मनाशाचा विचार क्षीण होत जातो. जीवनाची आसक्ती पुन्हा माणसाला आपल्या रेशमी पाशात गुरफटून घेऊ लागते.

एकदा एका तरुण विद्यार्थ्यानं मला पत्र लिहून कळवलं होतं : तुम्ही तुमच्या भाषणात जीवनाचं सुंदर आणि मोहक दर्शन घडवलं. 'विटलेल्या मनानं आयुष्याकडं न पाहता प्रेमानं आणि उत्साहानं त्याला आलिंगन द्या. म्हणजे जीवन तुम्हाला आपल्या हृदयातलं विलक्षण संगीत ऐकवील. मृत्यू म्हणजे जीवनाचा अभाव. जीवन म्हणजे रससौंदर्याचा प्रभाव. जगण्यातली दु:खंदेखील मधुर असतात. मरण्यातलं सुख मात्र कडवट असतं. जीवनाच्या खेळात कधी हार तर कधी जीत असणारच आहे. आज हरलेला उद्या विजयी होऊ शकतो. आत्महत्या ही मात्र कायमची हार आहे. जीवनाची मस्त नशा आणखी आणखी अनुभवावी. हातातला पेला दु:खानं

भरलेला असला तरी आपल्या मनातलं आशेचं चांदणं त्यात मिसळावं. प्रियतमेच्या लोभस ओठांची आठवण करावी. तिच्या स्पर्शातला उन्माद मनात जागा करावा. आणि जीवनाच्या प्यात्यातलं कडवट रसायन पीत राहावं. ते कडवट लागणार नाही. पुन्हा पुन्हा त्याचे घोट घ्यावेत हा मोह पडेल.' ही तुमची वाक्यं माझ्या लक्षात आहेत. मी देखील प्रेमभंगामुळं निराश झालो होतो. पण हे भाषण ऐकल्यानंतर तुटलेले धागे पुन्हा जुळवण्याचा प्रयत्न केला. तोडलेलं जोडलं गेलं. आत्महत्येच्या काठावरून मी परत आलो. ती वाट आता सोडली. आता जीवनाच्या वाटेनं चाललो आहे. अधिक काय सांगू ?

ते पत्र वाचल्यावर मला आनंद वाटला. आश्चर्यही वाटलं. कुणाची तरी आत्महत्या चुकली होती. चुकलेल्या वाटा सोडून जीवनाच्या नव्या वाटा चोखाळण्यात आनंद आहे हे त्या पत्रलेखकाला समजलं होतं !

●●●

# उदंड झाले नेते !

स्वत:भोवती भ्रमाचं एक वलय निर्माण करून त्यात राहण्याची कित्येकांना सवय असते. थोडीफार राजकीय सत्ता केवळ दैवयोगानं हातात आलेल्या एका मंत्र्याच्या जाहीर भाषणाला जाण्याचा एकदा मला कुयोग आला. मंत्रीमहोदय सभास्थानी तब्बल दीडतास उशीरानं आले. ठरलेल्या कोणत्याही कार्यक्रमाला ते कधीही वेळेवर गेले नाहीत. लोकांनी आपली वाट पाहिली पाहिजे, आपण आल्यानंतर 'आले', 'आले' असा कौतुकाचा आणि आदराचा उल्लेख झाला पाहिजे. आपण सभागृहात प्रवेश करताच टाळ्यांचा कडकडाट झाला पाहिजे. आपल्या नावानं 'की जय' किंवा 'झिंदाबाद' अशा घोषणा झाल्या पाहिजेत ही त्यांची इच्छा असते. त्यांचा चतुर सेक्रेटरी ही सारी तरतूद आधीच करून ठेवतो. 'साहेब' आल्यानंतर त्यांना हार घालण्याची लगबग सुरू होते. पाचपंचवीस हार गळ्यात पडतात. फोटो घेतले जातात. हार घालणाऱ्यासमोर हे मंत्रीमहाशय हात जोडल्याचं नाटक करतात. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात हे छायाचित्र ठळकपणानं प्रसिद्ध व्हावं अशी व्यवस्था झालेली असते. हा नाट्यप्रयोग मी तटस्थपणानं न्याहाळतो. सर्वसामान्य माणसांवर मात्र या दृश्याचा मानसिक परिणाम होतो. पुढारी म्हणून आपली प्रतिमा दृढ व्हावी यासाठीच हे ठरलेलं कर्मकांड केलं जातं. मंत्री आपण फारच लोकप्रिय झालो आहोत अशा समजुतीत समाधानी असतात. कुणीतरी साहेबांचा एक भाट प्रास्ताविक भाषण करतो. त्यात 'साहेब म्हणजे आकाशातले सूर्य आहेत, त्यांच्या प्रकाशानं आपल्या देशात सगळीकडं उजेड पडला आहे.' असा भावार्थ असतो. नंतर मनोमनी सुखावलेले गुबगुबीत चेहऱ्याचे ते मंत्री नाटकीपणानं बोलू लागतात.

'तळागाळातल्या लोकांना वर आणण्यासाठी मी माझ्या आयुष्याचं बलिदान करायला तयार आहे. (टाळ्या) महात्मा गांधींच्या पाऊलावर पाऊल टाकीत गरीब जनतेच्या उद्धाराचं व्रत घेऊन मी चालत आहे.' (या वाक्यालाही टाळ्या पडतात. टाळ्या वाजवणारे लोक नेमलेले असतात. ते कुठंही टाळ्या वाजवतात. रोजंदारीवर नेमलेल्या लोकांना फक्त टाळ्या वाजवायच्या एवढंच

कळलेलं असतं.) भाषण चालू असताना दूरदर्शनचा कॅमेरा आपल्यावर स्थिरावला आहे की नाही हे किलकिल्या डोळ्यांनी मंत्री पाहतात आणि मग घोषणा करतात. 'तळागाळातल्या (हा शब्द कुठून आला कुणास ठाऊक ?) गरीब जनतेसाठी मी मरेपर्यंत काम करीत राहीन.' (पुन्हा टाळ्या) शब्दांपेक्षा टाळ्याच जास्त होतात. सेक्रेटरीनं लिहून दिलेलं भाषण वाचणं हेसुद्धा आमच्या या समाजकल्याण मंत्र्याला जमत नाही. परिस्थितीचा उच्चार ते 'परस्थिती' असा करतात. काहीवेळा तर 'परस्त्री' असाही करतात. 'व्रत' शब्दाला 'वर्त' म्हणतात. फक्त तळागाळातला हा शब्द मात्र त्यांच्या जिभेला सवयीचा झाला आहे. जिथं जातील तिथं तळागाळाशिवाय बोलणं नाही. अखेर भाषण संपतं. आभार मानणारी एक बाई - चुकलो - नवयुवती हातात 'वरमाला' घेऊन, पुन्हा चुकलो, युवती म्हटल्यावर 'वरमाला' आठवली. त्याला काय करायचं? 'पुष्पमाला' घेऊन, आपलं पाठ केलेलं आभाराचं गोड भाषण करू लागली. प्रत्येक वाक्यात 'आमचे साहेब' हा शब्द लाडिकपणानं डोकावत होता. अखेर ते गोड भाषण संपलं. मंत्र्यांच्या गळ्यात हार पडला. सभा संपल्यानंतर तळागाळातल्या लोकांचं कल्याण करण्यासाठी साहेब आपल्या टोयाटो गाडीतून आपल्या एअरकंडिशण्ड बंगल्याकडं गेले. सभेत झालेल्या परिश्रमामुळं थकलेल्या साहेबांना तरतरी आणणाऱ्या पेयाची जरुर लागणार हे ओळखून पेयाची सिद्धता केलेली होती. दोन घोट घेतल्यावर त्यांना आभार मानणाऱ्या युवतीची आठवण येते. यापुढं वाचकांनीच हे चित्र आपल्या कल्पनेनं पूर्ण करायचं आहे.

गांधीजींच्या नावाचा जयघोष करणारे आणि तळागाळातल्या जनतेचा प्रत्येक भाषणात आवर्जून उल्लेख करणारे सत्तापदस्थ पाहिले म्हणजे आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल शंका उरत नाही. सत्ता हे जनकल्याणाचं महत्त्वाचं साधन असतं. पण आज ते आत्मकल्याणाचं एकमेव माध्यम बनलेलं आहे. आम्ही 'रामराज्य' आणणार आहोत असं गर्जून सांगणारे सत्ताधारी रावणाचे वारस शोभतील असेच असतात. रावण हा पराक्रमी तरी होता. ज्ञानवंतही होता. अपहरण करून आणलेल्या सीतेशी त्यानं दुर्व्यवहार केला नाही. तो तिचा अनुनय करीत राहिला. यातही काही अंशी त्याच्या सुसंस्कृतपणाची खूण दिसते. लहान मोठ्या अधिकारांवर असलेल्या लोकांनी रावणाचे काही गुण अंगीकारले तर बरं होईल. रामाचा आदर्श त्यांना कधीच पेलता येणार नाही. सत्तेसाठी चाललेल्या यांच्या हाणामाऱ्या आणि

कटकारस्थानं पाहिली म्हणजे 'राम' हे नाव उच्चारण्याचाही अधिकार ते गमावून बसले आहेत हे स्पष्ट होतं. सत्तेच्या खुर्चीभोवती रात्रंदिवस पिंगा घालणाऱ्या या महाभागांना रामाचं चरित्र आणि चारित्र्य कधी कळणं शक्य आहे काय ? रामराज्य या शब्दांची केवळ जपमाळ ओढण्यानं 'रामराज्य' येणारं असतं तर 'रामायणाला' काहीच महत्त्व उरलं नसतं.

भवभूतीच्या 'उत्तररामचरित' या नाटकातील एका सुंदर श्लोकाची इथं आठवण होते. राजा रामचंद्रानं म्हटलं आहे.

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि।
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा॥

लोकनायक रामचंद्राचं उदात्त नेतृत्व यातून व्यक्त झालं आहे. 'लोकांच्या आराधनेसाठी, लोककल्याणासाठी माझ्या जीवनातल्या सर्व सुखांचा त्याग करायला मी सिद्ध आहे. लोकसेवा करताना मला सर्वाधिक प्रिय असलेली सीता त्यागावी लागली तरी मी तिचा त्याग करीन.'

नेतृत्वाचा एक उज्ज्वल आणि उत्तुंग आदर्श आपल्या संस्कृतीच्या इतिहासात राजा रामचंद्रानं प्रस्थापित केला. म्हणूनच गांधीजी 'रामराज्य' या शब्दातून आपली आदर्श राज्याची संकल्पना स्पष्ट करीत असत. नि:स्वार्थी, त्यागी, उदार आणि धीरवीर असं नेतृत्व जेव्हा एखाद्या राष्ट्राला किंवा लोकसमूहाला लाभतं तेव्हा ते राष्ट्र नवा इतिहास घडवू शकतं. आज नेता आणि नेतृत्व या शब्दांचं वस्त्रहरण झालं आहे. लोकांना देखील नाना प्रकारचे भ्रष्टाचार करणारा पुढारी डोक्यावरून मिरवावासा वाटतो. या कर्माला काय म्हणावं ? अनेक घोटाळे करण्याची ज्याची क्षमता असते तो आज लोकनेता होऊ शकतो.

स्वत:ला विचारवंत समजणारे एक अविचारवंत मला म्हणाले, 'नेत्याला निष्कलंक चारित्र्य असावं ही तुमची कल्पना अत्यंत जुनाट आहे. तुमच्या विचारांना आधुनिक वळण मिळालं पाहिजे. श्रीराम, गांधीजी, लोकमान्य टिळक, फुले आणि आंबेडकर ही नावं फार जुनी झाली. काळाच्या आणि परिस्थितीच्या बरोबर तुम्हाला राहता येत नाही. यामुळंच तुमचे विचार इतके चुकीचे आणि विसंगत झाले आहेत. एकविसाव्या शतकात नेतृत्व करण्यासाठी धूर्तपणा, वारा वाहील त्याप्रमाणं पाठ देण्याची वृत्ती आणि लोकांना खेळवीत राहण्याचं चातुर्य, स्वार्थ साधण्यासाठी आवश्यक असलेला मुत्सद्दीपणा या सद्‌गुणांची नितांत आवश्यकता असते. त्याग,

सत्यनिष्ठा, चारित्र्य, लोककल्याणाची भावना या दुर्गुणांनी नेता होता येत नाही. असलं चारित्र्यसंपन्न नेतृत्व कवडीमोलाचं आहे. चारित्र्याचा आणि सत्याचा अकारण उदो उदो केल्यामुळं रामाला वनवासात झोपडीत दिवस काढावे लागले. तो मुत्सद्दी नव्हता. वडिलांच्या आज्ञेप्रमाणं राज्यावरचा अधिकार त्यानं सोडून दिला. बापाला तुरुंगात टाकून सुपुत्रानं राज्य मिळवल्याच्या घटना आपल्या देशाच्या इतिहासात आहेत. रामाच्या काळातही अशा घटना घडल्या असतील. पण त्याचा इतिहासाचा अभ्यास कच्चा असल्यामुळं त्यानं वनवास पत्करला. लोककल्याणाचं वाईट व्यसन लागल्यामुळं गांधीजींची काय गत झाली हे नीट लक्षात ठेवा. लोककल्याण हा एक सुंदर पण निरर्थक शब्द आहे. सभा संमेलनात तो उच्चारला म्हणजे टाळ्या मिळतात. टाळ्या मिळवणं आणि लोकांना टाळणं हे खऱ्या नेत्याचं लक्षण असतं. तुम्ही प्राध्यापक लोक पुस्तकातलं सगळं खरं मानून चालता. आत्मकल्याण तेवढं खरं असतं हा धडा राजकारणात महत्त्वाचा असतो. माझं म्हणणं खोटं असेल तर लालू यादवांना विचारा ! जयललिताबाईंची ट्यूशन लावा. इतके भव्य आदर्श समोर असताना रामाचं आणि गांधींचं नाव घेण्यात काय अर्थ आहे ? नेतृत्वाच्या संकल्पना काळाबरोबर बदलल्या आहेत याची जाणीव ठेवली पाहिजे. अहो, वयाच्या पहिल्या दुसऱ्या वर्षी तुम्ही जो सदरा घालीत होता तो पन्नाशीत घालण्याचा अट्टाहास का करता ? देशभक्ती, शील आणि त्याग या गोष्टी वर्गातल्या पोरापोरींना शिकवण्यात तुमचं आयुष्य गेलं. तेव्हा तुम्हाला दोष देण्यात काही अर्थ नाही. आमच्या गावचे एक पुढारी निवडून आले. किमान पन्नास-साठ लाख रुपये त्यांनी आपल्या मतदारसंघात उदारबुद्धीनं वाटले. धोतरं आणि साड्या यांचीही खैरात केली. मतदारांच्या खाण्याची आणि विशेषत: पिण्याची दयाबुद्धीनं तरतूद केली. त्यांच्या विरुद्ध, तुम्ही म्हणता तसा एक प्रामाणिक राष्ट्रभक्त उभा होता. त्याचं डिपॉझिट जप्त झालं. खोटं मतदान करावं लागतं. खोट्यालाच किंमत असते. आता त्या पुढाऱ्यानं केवढं आत्मकल्याण साधलं आहे हे सांगणंच कठीण आहे. 'राष्ट्राचा उद्धारकर्ता' या नावानं त्याचं चरित्र लवकरच प्रसिद्ध होईल.'

त्या 'विचारवंतानं' एक व्याख्यान देऊन मला व्यवहारज्ञान शिकवण्याचा प्रयत्न केला. खरं तर राजकारणातले बहुसंख्य नेते अवैध मार्गानं संपत्ती गोळा करतात असं श्री. अण्णा हजारे यांचं मत आहे. अनेक व्यासपीठांवरून त्यांनी हे मत आवेशानं मांडलं आहे. सत्तेचं राजकारण करण्यात गुंतलेल्या किती लोकांत सेवेची भावना

असते हा एक संशोधनाचा विषय आहे. याच लोकांनी राजकारणाचा प्रवाह दूषित केला आहे. बिनकष्टानं पण अंगच्या चतुराईनं फार थोड्या काळात गडगंज श्रीमंत होणारी ही माणसं पाहिली म्हणजे देशाच्या भवितव्याबद्दल गडद निराशेचे विचार मनात घोंघावू लागतात. भ्रष्टाचाराची कित्येक प्रकरणं उजेडात येतात. थोडे दिवस खळबळ माजते आणि पुन्हा सारं कसं शांत शांत होतं. सर्व क्षेत्रांत भ्रष्टाचाराचे विषारी जंतू पसरलेले आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रांतही उजळ माथ्यानं भ्रष्टाचार घुसलेला आहे. विद्यार्थी आणि पालक यांच्याकडून खंडणी घेतली जाते. विद्यापीठांतून मिळणाऱ्या पदव्या देखील विकत मिळतात असं वृत्तपत्रांतून बऱ्याच वेळा वाचनात येतं. पी.एच.डी. ची पदवी रेडिमेड विकत मिळते. शिक्षक आणि प्राध्यापक यांचं हे अध:पतन लाजिरवाणं आहे. एका विद्यापीठाचा कुलगुरू आणि लोकसेवा आयोगाचा प्रमुख तुरुंगात डांबला गेला आहे ही वार्ता वाचल्यावर आता त्यावर टीका टिप्पणी करण्यासाठी योग्य शब्द सापडत नाहीत. ज्या क्षेत्रात भ्रष्टतेचा अंशही नाही असं एखादं क्षेत्र अस्तित्वात असेल काय हा प्रश्न आहे. या केविलवाण्या परिस्थितीचं मूळ माणसाच्या लोभात आणि मोहात आहे.

चंद्रगुप्ताचा गुरू आणि त्याला सिंहासन मिळवून देणारा चाणक्य एका सामान्य झोपडीत राहून राज्याचं नेतृत्व करीत होता. एकदा रात्री त्याच्याकडं कोणी गृहस्थ सरकारी काम घेऊन आला. थोडा वेळ चर्चा झाली. ते काम संपल्यावर घरगुती गोष्टींवर चर्चा सुरू झाली. चाणक्यानं जवळचा दिवा मालवला आणि दुसरा दिवा पेटवला. तो गृहस्थ गोंधळला. खुलासा करताना चाणक्य म्हणाला, 'इतका वेळ आपण सरकारी काम करीत होतो. म्हणून तो सरकारी दिवा तेवत ठेवला. आता आपल्या गप्पा चालू झाल्या आहेत. त्यासाठी सरकारी पैशाचं तेल खर्च करणं योग्य नव्हे. म्हणून मी माझा खाजगी दिवा प्रकाशित केला आहे.' ही कल्पनारंजित कथा नव्हे. नैतिक मूल्यांवर श्रद्धा ठेवणाऱ्या एका नि:स्वार्थी राष्ट्रभक्ताची ही कथा आहे. टिळक आणि गांधी यांच्याही नि:स्वार्थपणाच्या कित्येक रोमांचित करणाऱ्या कथा आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातलं नेतृत्व आणि आता स्वातंत्र्योत्तर काळातलं नेतृत्व यात दोन ध्रुवांचं अंतर पडलं आहे. त्यागाचा काळ निघून गेला. स्वैर आणि मूल्यहीन भोगलंपटतेचा काळ सध्या चालू आहे. देश आणि देशातली गरीब जनता हे प्रश्न अगदीच किरकोळ बनले आहेत. केवळ राजकीय नेतृत्वावर मला टीका करायची

नाही. सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक नेतृत्वही आज क्षुद्र पातळीवर गेलेलं दिसतं. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या उंचीचा कोणी शिक्षण तपस्वी १९६० पासून आजच्या महाराष्ट्राला किंवा देशाला लाभला आहे काय ? पंजाबराव देशमुख, मामासाहेब जगदाळे हे अपवाद. पण त्यांच्या पावलांवर कुणीही पाउलं टाकली नाहीत. शिक्षण हा एक किफायतशीर धंदा झाला आहे. शैक्षणिक संस्थांच्या उंच उंच इमारती उभ्या राहिल्या. पण त्यातून शिकवणाऱ्या शिक्षकांचा खुजेपणा अधिकच जाणवू लागला. शिक्षक होण्यासाठी सुद्धा संस्थाचालकाला लाख - दोन लाख रुपयांची लाच द्यावी लागते. ही शैक्षणिक प्रगती थक्क करणारी आहे. म. फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील हे दंतकथेचे विषय बनले. धार्मिक क्षेत्रातही गाडगे महाराजांसारखा श्रेष्ठ संत कोणी झालेला नाही. तुकडोजी महाराजांनी विदर्भात रचनात्मक कार्य केलं. संत-महंत, ज्ञानवंत आणि लोकाभिमुख राज्यकर्ते, प्रशासक आणि अधिकारी आकाशातून पडत नाहीत. सामान्य माणूस हा प्रेमाचा आणि चिंतनाचा विषय झाल्याशिवाय नेतृत्व खऱ्या अर्थानं विकसित होणार नाही. गाडगेमहाराज ज्ञानवंत नव्हते पण विचारवंत होते. जनतेच्या मनात सुविचारांची बीजं त्यांनी अपार सहानुभूतीनं आणि कष्टानं पेरली. त्यांनी सांप्रदायिक धर्म सांगितला नाही. माणुसकीचा धर्म त्यांनी दिला. या प्रकारचं लोकप्रबोधन करणारं नेतृत्व सर्व क्षेत्रांत निर्माण झालं पाहिजे. स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षं उलटून गेली. या काळात जनतेच्या मनाची आणि जीवनाची उंची वाढली काय ? जसे नेते तशी जनता. भौतिक प्रगतीही फारशी झाली नाही अशा स्थितीत नैतिक आणि बौद्धिक प्रगतीबद्दल काय बोलावे ? पण म्हणून, या परिस्थितीत सुधारणा होणं शक्य नाही. असा पूर्ण निराशावादी विचार करण्याचं कारण नाही. भोगवादाची एक आंधळी अदम्य लाट आल्यामुळं लोकदृष्टी अंधारून गेली. ही लाट थोपवण्याचा प्रयत्न विचारवंतांनी आणि लोकनेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांनी केला पाहिजे. लाटेबरोबर वाहवत जाणं हे अगतिक बनलेल्या निर्जीव काटकीला शोभून दिसेल. भारतीय जनता निष्प्राण बनली नाही. उसळी घेण्याची शक्ती तिच्यात आहे हे इतिहासानं कित्येक वेळा सिद्ध केलं आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विचारशील आणि ध्येयनिष्ठ व्यक्तींनी उडी घेऊन एक सुजाण नेतृत्व समाजाला दिलं पाहिजे. कुरुक्षेत्राच्या रणांगणावर श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला होता, 'तुझं हे वैचारिक षंढपण प्रथम झटकून टाक, परिस्थितीचं आव्हान धैर्यानं स्वीकार. दोन हात करण्यासाठी सज्ज हो. मरशील किंवा मारशील.

पण मरण्याची तयारी ठेव. म्हणजे लढाईत तू जिंकशील.' अशीच अटीतटीची लढाई सध्याच्या परिस्थितीत जनतेला करायची आहे. आणि श्रीकृष्णासारख्या विचारवंताकडे समाजाचं सारथ्य करण्याचं काम दिलं पाहिजे.

नेतृत्वाला विचाराचं आणि समाजप्रेमाचं बळकट अधिष्ठान मिळालं पाहिजे. निवडणुकीत 'येन केन प्रकारेण' निवडून आला किंवा वर्तमानपत्रात फोटो छापवून आणला म्हणजे नेता होता येतं हा विकृत गैरसमज लोकमनातून काढून टाकला पाहिजे. मी पुन्हा पुन्हा गांधीजी आणि आंबेडकर या नावांचा उच्चार एवढ्यासाठी करतो की,नेतृत्वाचे अनेक तेजस्वी घटक या दोन व्यक्तित्वात एकवटलेले होते. हे नुसते राजकीय नेते नव्हते. ते सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण घडवणारे शिल्पकारही होते. त्यांच्यापासून आजच्या नेतृत्वानं थोडीतरी प्रेरणा घ्यावी. नेतृत्व हे टाकसाळीतून जन्माला येत नाही. ते घडावं आणि घडवावं लागतं. लोकांची स्तुतिस्तोत्रं गाऊन किंवा त्यांच्या भावना भडकावून नेतेपण मिळत नाही. 'इष्ट असेल ते बोलणार आणि न्याय्य असेल ते करणार' हा आगरकरी बाणा म्हणजे नेतृत्वाचा कणा आहे. या देशाच्या प्रगतीची भव्य स्वप्नं जो पाहू शकत नाही त्याला नेता तर नाहीच पण सामान्य कार्यकर्ताही होता येणार नाही.

कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे एका श्रीमंत नबाबानं आपला एक आचारी पाठवून दिला. त्यानं नबाबी ढंगाचं उत्तम, रुचकर भोजन तयार केलं. दोनतीन घास खाल्ल्यानंतर महाराजांनी ताट बाजूला सारलं. ते म्हणाले, 'असलं राजविलासी भोजन मी घेणं हा अपराध आहे. माझी प्रजा चटणी-भाकरी खाऊन राहते. तुम्ही बनवलेलं हे शाही जेवण माझ्या घशाखाली उतरत नाही. मी गरीब प्रजेचा राजा आहे.' अशी लोकांशी समरसता असणारा माणूस हाच खरा लोकनेता असतो. तो लोकांची भाषा बोलतो. लोकभावना समजून घेतो. लोकांपासून तो दूर जात नाही. एअरकंडिशंड बंगल्यात राहायचं आणि मी गरीबांचा सेवक आहे असं म्हणायचं ही जनतेची निर्दय आणि निर्लज्ज वंचना आहे. नेतेपण बाजारात विकत मिळत नाही. ते सेवेतून, त्यागातून आणि लोकाभिमुख विचारांतून मिळत असतं. नेतृत्वाच्या मुळाशी ज्ञान आणि लोकप्रेम या वृत्ती नसतील तर त्या तथाकथित नेतृत्वाला अर्थ उरत नाही. ज्ञानवंत याचा अर्थ पुस्तकात रमलेले, पुस्तकी पंडित नव्हेत. पुस्तकांपेक्षा लोकांचं जीवन आणि सुखदु:खं ज्याला वाचता येतात त्याचाच नेतृत्वावर अधिकार असतो. स्वत:ला नेते समजून घेणारे बरेचसे पुढारी म्हणजे

समाजवृक्षावर वाढलेली बांडगुळं आहेत. ती बांडगुळं वृक्षाचाच जीवनरस शोषून घेतात. या प्रकारचे नेते उदंड झाले ! आता प्रामाणिक नेत्यांची लोक वाट पाहत आहेत. ध्येयाच्या काटेरी वाटेवरून चालताना जो थांबत नाही, प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात येण्यासाठी जो सोंगढोंग करीत नाही, ज्याच्या डोळ्यांत सहानुभूतीचं, प्रेमभावनेचं पाणी आहे आणि दृष्टीत आदर्शाचं स्वप्न आहे अशा नेत्याचा शोध आम्ही घेत आहोत. ज्याच्या नेतृत्वाचं आणि कर्तृत्वाचं नाणं खणखणीत आहे असा नेता पाहिजे आहे. उदंड झालेल्या नकली नेत्यांची जरूर नाही.

●●●

# प्रेम कोणावर करावे ?

प्रेम ही एक विलक्षण उत्कट भावना आहे. प्रेमाच्या दृष्टीनं पाहिलं तर रखरखीत वाळवंट देखील नंदनवनासारखं दिसतं. कुरुपतेला सुरूपता देणारी ही भावना तर्कबुद्धीच्या चौकटीत बसूच शकत नाही. प्रेमाला तर्क नसतो. ते अतर्क्य असतं. वास्तवातले सर्व संकेत आणि नियम मोडून प्रेम अद्‌भुताच्या वाटेनं अनिर्बंध प्रवास करीत असतं.

माझ्या एका मित्राचं एका स्त्रीवर प्रेम बसलं. तो तिचं वर्णन नेहमी अतिशयोक्त भाषेत करीत असे. एकदा त्याची प्रेयसी पाहण्याचा योग आला. अगदीच सामान्य रूपाची ही बाई याच्या प्रेमाचा विषय का झाली असावी याचा मी विचार करू लागलो. साधारणपणे सुंदर दिसणाऱ्या मुलींवर तरुणाचं मन जडतं हा नियम माझ्या या मित्रानं खोटा ठरवला होता. त्या अतिसामान्य वैशिष्ट्यहीन स्त्रीवर त्या वेड्या प्रेमिकानं अनेक सुंदर कविता लिहिल्या होत्या. 'जे न देखे रवी, ते देखे कवी' असं म्हणतात. माझ्या कविमित्राला त्या साधारण स्त्रीच्या ठायी कोणतं अलौकिकत्व आढळलं कुणाला ठाऊक ? मी त्याला विचारलं तेव्हा तो हसून म्हणाला, 'लैला दिसायला अगदी सामान्य होती. पण ती मजनूच्या डोळ्यांना नितांत सुंदर दिसत होती. तुम्हा व्यवहारी लोकांच्या सौंदर्यविषयक कल्पना अगदीच सांकेतिक आहेत. गुलाबाच्या फुलासारखे गाल, कमळासारखे नेत्र, धनुष्याकृती भुवया, पातळ गुलाबी ओठ ही सगळी सामुग्री म्हणजे सौंदर्य ! ही तुमची ठराविक ठशाची विचारसरणी मला मान्य नाही. मी माझ्या प्रेयसीच्या डोळ्यांत तिच्या अंत:करणातले स्निग्ध भाव पाहू शकतो. तिच्या शब्दांत तिचं प्रामाणिक प्रेमोत्कट मन मला दिसतं. ती गोरी नाही. पण अष्टमीच्या सावळ्या रात्रीसारखी तिची कांती आहे. माझ्या मनातला विचारभावनेचा लहानसा तरंगसुद्धा ती समजून घेते आणि त्याच्याशी समरस होते. शरीरसौंदर्याची मिजास दाखवणाऱ्या सुंदरींच्या बेईमान वृत्तीबद्दल मला कल्पना आहे. बाह्य सौंदर्याचा रंग चार दिवसांत उडून जातो. पण अंतरंगाचं सौंदर्य अखेरपर्यंत टिकून राहतं. मी माझ्या अंतरंगानं तिला पाहतो तेव्हा ती एखाद्या अप्सरेसारखी मला वाटते. बाकी हे तुझ्यासारख्या अरसिकाला काय

कळणार ? म्हणून तर माझे पूर्वजन्मीचे मित्र कवी भवभूती यांनी म्हणून ठेवलं आहे की, 'अरसिकाला कविता वाचून दाखवण्याचं संकट हे परमेश्वरा, माझ्या भाळी लिहू नकोस.'

प्रेम या विषयावरचं आपलं भाषण त्यानं माझ्या सुदैवानं आवरतं घेतलं. हा मित्र प्राध्यापक होता. एकदा बोलायला लागला की पंचेचाळीस मिनिटं तो श्वास घेण्यासाठी सुद्धा थांबत नव्हता. आता तो लवकरच थांबला आणि मी निर्धास्तपणे श्वास घेतला. पण तो म्हणत होता त्यात विचार केला तर पुष्कळच तथ्य होतं. माणसं बहिरंगावर भुलतात. प्रथमदर्शनी प्रेमात पडणं म्हणजे दुसरं काय असतं ? केवळ 'दर्शन' महत्त्वाचं नसतं. सुंदर दिसावं हे जितकं खरं त्यापेक्षा अधिक मनानं आणि विचारानं सुंदर असावं हेच खरं ! माझ्या कविमित्राला ज्याअर्थी तिनं मोहिनी घातली त्याअर्थी तिच्या मानसिक सौंदर्याची साक्ष त्याला पटली असावी. या कवीनं तिच्यातल्या रसिकतेला आपल्या प्रेमानं साद घातली. हे एका अर्थानं बरोबर होतं. जिथं हृदयाच्या तारा जुळतात तिथंच प्रीतीचं संगीत सुरू होतं. प्रेमाबद्दल सर्वच कवींनी काहीतरी लिहून ठेवलं आहे.

प्रेमाचा रस्ता सरळ कधीच नसतो अशा अर्थाचं विधान शेक्सपिअरनं आपल्या अनुभवातून केलं आहे. हा कवी देखील तऱ्हेवाईक होता. आपल्यापेक्षा सहा-सात वर्षांनी मोठ्या असलेल्या स्त्रीवर त्याचं प्रेम बसलं. ती स्पष्ट नकार देत होती. पण या महाकवीनं (त्यावेळी तो कवी किंवा नाटककार नव्हता) सरळ लग्नपत्रिका वाटल्या. अखेर निरुपायानं त्या स्त्रीला त्याच्याशी विवाहबद्ध व्हावं लागलं अशी आख्यायिका आहे. नाटककारालाच अशी युक्ती सुचणं शक्य आहे. इतरांनी त्याचं अनुकरण करू नये. नाहीतर 'नाटक झाले जन्माचे' असं म्हणण्याची आपत्ती येईल.

'हा प्रेमाचा ओढा संथ सरळसा कदापि वाही ना। सूक्त महाकवीचे हे सत्य जहाल्याविनाचि राहीना।।' जे सरळ असतं त्याला प्रेम म्हणण्यात काय अर्थ आहे ? प्रेमात नाट्य असावं, काव्य असावं, निदान काहीतरी आगळं वेगळं असावं अशी प्रेमासंबंधी प्रेमळ लोकांची अपेक्षा आहे. एकदा प्रेमाचे पिसे अंगी भरले म्हणजे दुसरे तिसरे काही सुचत नाही. कोणी एक कवी (कदाचित तुलसीदास) वरच्या मजल्यावर असलेल्या पत्नीला भेटण्यासाठी रात्रीच्या वेळी एका दोराला धरून वर गेला. आपल्याला वर येता यावं म्हणून पत्नीनं दोर बांधून ठेवला या

कल्पनेनं तो खूष झाला. पण तो दोर नव्हे तर एक सर्प होता. तिनं त्याला भेटण्याची काहीच तरतूद केली नव्हती. प्रेमाच्या उन्मादात विषारी सर्पसुद्धा दोरासारखा साहाय्यक होतो. हा प्रेमदृष्टीचा प्रभाव नव्हे काय ?

'प्रेम कुणावर करावं ?' या नावाची कुसुमाग्रजांची एक कविता आहे. ती वाचताना मला माझ्या एका सहाध्यायाची आठवण होते. आम्ही बी. ए. च्या वर्गात होतो. अभ्यासासाठी नेमलेल्या पुस्तकांची नावं त्याला माहीत नव्हती. पण वर्गातल्याच काय, कॉलेजातल्या एकूणएक मुलींची नावं आणि पत्ते त्याला तोंडपाठ होते. या बाबतीत त्याची स्मरणशक्ती अपूर्व होती. विष्णुसहस्रनामाप्रमाणं त्याला सहस्रसुंदरींची नावं मुखोद्‌गत होती. (विष्णूचं नाव मात्र त्याला अवगत नव्हतं) दररोज एखाद्या मुलीशी बोलण्याचा तो चिवटपणानं प्रयत्न करायचा. कोणत्याही देवतेनं त्याच्याकडं ढुंकूनही पाहिलं नाही पण हा ध्येयनिष्ठ महात्मा अत्यंत प्रयत्नवादी होता. अनेक जणींचे शिव्याशाप घेऊन देखील तो आशावादी राहिला. (आशा हे त्याच्या प्रेयसीचे नाव) अशा अनेक आशा मनात बाळगून त्याचा प्रेमप्रवास चालू होता. पाचसहा वेळा बी.ए.ची परीक्षा त्यानं दिली. प्रेयसीप्रमाणंच पदवीही त्याला भेटली नाही. प्रेमाच्या कुरुक्षेत्रावर हुतात्मा झालेल्या या प्रणयवीराला वंदन असो. सध्या तो एका नर्सबरोबर सुखानं संसार करीत आहे. ती त्याची सेवा शुश्रूषा करीत आहे ड्यूटी म्हणून.

प्रेमाच्या क्षेत्रातल्या किती गोष्टी सांगाव्यात ! एकतर्फी प्रेमाचं 'फॅड' आजचं नाही. ते प्राचीन काळापासून चालू आहे. कर्णाच्या मनातही द्रौपदीविषयी प्रेमभावना होती असा उल्लेख आहे. पण द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी त्यानं द्रौपदीविषयी जे अधमपणाचे उद्‌गार काढले ते मात्र कर्णाच्या चारित्र्याला कलंक लावणारे आहेत. याबाबतीत विचार करताना मला रावणासारख्या खलपुरुषात देखील सज्जनता आढळते. रावण हा सीतेचा प्रेमिकाप्रमाणं अनुनय करीत राहिला. त्या सत्ताधीशाला तिच्याशी बळानं दुर्व्यवहार करणं शक्य होतं. पण ही उन्मत्त कृती रावणानं कधीच केली नाही. सीतेसंबंधीच्या त्याच्या भावना शुद्ध नसल्या तरी तो अधमतेच्या किनाऱ्याकडं कधीच गेला नाही. रावणाच्या दुष्टपणालाही सुजनतेची एक बारीक किनार होती असं म्हटलं पाहिजे.

आज एकतर्फी प्रेम करणाऱ्या काही तरुणांनी आपल्या प्रेयसीच्या अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळल्याची उदाहरणं वृत्तपत्रांतून वाचतो तेव्हा याला प्रेम

म्हणतात काय असा प्रश्न मनात उभा राहातो. असलं हिंस्त्र, निर्दयी प्रेम खऱ्या प्रेमाच्या जवळ कधीही येऊ शकणार नाही. विकृत आणि रोगट प्रेमाची ही उदाहरणं संस्कृतीवर वाढलेल्या विषारी बांडगुळासारखी आहेत. आपल्या प्रिय व्यक्तीचा जाळून किंवा भोसकून खून करणारे हे अधम लोक जगाच्या कल्याणासाठी फासावर लटकावले पाहिजेत.

प्रेम म्हणजे केवळ स्त्री-पुरुषांचं प्रेम इतकाच आकुंचित अर्थ करणाऱ्या लोकांच्या बौद्धिक दारिद्र्याविषयी मला तिटकारा वाटतो. तरुणतरुणींच्या प्रेमात मोहकता, मादकता आणि तीव्रता असेल पण आपल्या अपत्यावर आपलं सारं जीवन ओवाळून टाकणाऱ्या मातेचं वत्सल प्रेम हे जगातल्या सर्वात सुंदर प्रेमाचं उदाहरण आहे.

हिरकणी गवळणीची कथा प्रसिद्ध आहे. दूध द्यायला गेलेल्या हिरकणीला रात्री उशीर झाल्यावर गावात कसं जायचं हा प्रश्न पडतो. वेशीचे दरवाजे बंद झालेले असतात. आपल्या लहानश्या बाळाचं भुकेलं आक्रंदन तिच्या मनाला ऐकू येऊ लागलं. त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा रस्ता तर बंद झाला होता. अखेर व्याकुळ झालेल्या त्या आईनं काट्याकुट्यांची, खाचखळग्यांची अंधारानं माखलेली अवघड वाट शोधली आणि ठेचकाळत अडखळत एका दुर्गम किल्ल्याच्या बुरुजावरून ती खाली उतरली. अंग ठिकठिकाणी रक्ताळलं. पाऊल पुढं पडत नव्हतं. पण आपल्या तान्हुल्याच्या अदम्य ओढीनं तिला घरापर्यंत खेचून आणलं. रडून रडून निपचित पडलेल्या आपल्या बाळाला तिनं विलक्षण आत्मीयतेनं आपल्या छातीशी कवटाळलं. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. आणि स्तनांतून वात्सल्याची धार झिरपत होती. दूध मिळाल्यामुळं ते मूल ताजं टवटवीत झालं. त्याच्या मुद्रेवरची प्रसन्नता पाहून हिरकणी सुखावली, तृप्त झाली. अजिंक्य समजल्या जाणाऱ्या गडावरची अवघड, अशक्य वाट तिच्या मातृप्रेमानं पार केली होती. शिवाजी महाराजांनी या साहसाबद्दल तिचा सन्मान केला आणि त्या बुरुजाला त्यांनी 'हिरकणी' हे नाव दिलं. प्राथमिक शाळेत विद्यार्थी असताना वाचलेली ही गोष्ट आजही मला रोमांचित करते.

आईच्या प्रेमात नि:स्वार्थ भावनेचं सात्त्विक माधुर्य असतं. इतकी गोडी इतर प्रेमात असते काय ? यावर विचार केला पाहिजे. प्रेम हे भोगाचं नव्हे तर त्यागाचं सोज्ज्वळ रूप आहे. ज्या प्रेमात त्यागाचा प्रकाश असतो ते व्यक्तीवरचं

असो की देव, धर्म अथवा राष्ट्र यावरचं असो, ते मंगलच असतं. पण दुर्दैव असं की कित्येक माणसांच्या प्रीतीला अहंकाराच्या, द्वेषमत्सराच्या आणि स्वार्थी वासनेच्या मर्यादा पडलेल्या असतात. ज्या व्यक्तीवर नितांत प्रेम केलं त्याच व्यक्तीचा तिरस्कार करणं हे मला तरी रोगट वृत्तीचं लक्षण वाटतं.

एका प्रख्यात संगीत दिग्दर्शकानं लिहिलेलं आत्मचरित्र माझ्या वाचनात आलं. एका सुप्रसिद्ध गायिकेशी त्याचे प्रेमसंबंध होते. काही कारणानं हे संबंध पुढे दुरावले. त्या संगीतकारानं आपल्या पूर्वप्रेयसीविषयी बीभत्स लेखन केलं. या कलावंताला मी म्हणालो, 'ज्या व्यक्तीबरोबर प्रीतीचे आणि आनंदाचे उच्च क्षण तुम्ही अनुभवले त्या व्यक्तीबद्दल ओंगळ लेखन करताना तुमची लेखणी थोडीसुद्धा थरथरली नाही याचं आश्चर्य वाटतं. कलावंत म्हणून तुम्ही अपुरे आहात. ज्याला निखळ प्रेम करता येत नाही तो कलावंत असूच शकत नाही.' हे ऐकून त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत त्यानं तो मजकूर गाळून टाकला. मला पाठवलेल्या पत्रात तो म्हणाला, 'प्रेम हे मूल्य म्हणजे परमेश्वरच आहे. या भावनेचा कधीही अनादर होणार नाही हे मी पाहीन.'

प्रेम हीच माणुसकीची शक्ती आहे. प्रेमाची ज्योत विझून गेली तर सारं जग अंधारात बुडून जाईल. प्रेम कोणावर करावं या प्रश्नाचं उत्तर कवी कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून दिलं आहे. त्यात भर घालण्याचा मला अधिकार नाही. या जीवनावर आणि जीवनाचं सामर्थ्य वाढवणाऱ्या सर्व सुंदरतेवर मन:पूर्वक प्रेम करण्याची शक्ती आणि वृत्ती विकसित व्हावी इतकंच मी म्हणेन. आयुष्याच्या प्रवासात परस्परांचे हात हातात घेऊन वाट चालत राहू. वाटेवरही प्रेम करू आणि संगती सोबतीनं चालण्यावरही प्रेम करू. ज्याला प्रेम करता येतं तो या सृष्टिजीवनाचा एक जिवंत घटक असतो. माझ्यावर कुणी प्रेम करीत नाही. ही वांझ तक्रार करू नये. स्वत:वर प्रेम करता करता ते ज्याला जगापर्यंत पोहोचवता येतं त्याच्यातच परमेश्वर नांदत असतो.

●●●

# माय मराठीची विटंबना

एका महाविद्यालयात मला मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केलं होतं. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संदर्भात मी काही विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावं अशी प्राचार्यांची अपेक्षा होती. ते प्राचार्य माझे मित्रच होते. त्यामुळं या कार्यक्रमासाठी जाणं मला अपरिहार्य होतं. सभागृहात पोहोचलो तेव्हा सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनी माझ्या स्वागतासाठी उभे राहिले. दोन - चार प्राध्यापकांनी हसत हसत मला 'गुड मॉर्निंग सर' असं म्हटलं आणि आपला हात पुढे केला. मी खुर्चीवर स्थानापन्न झालो. एका चुणचुणीत विद्यार्थिनीनं समोर येऊन आपल्या हातातला पुष्पगुच्छ मला देत म्हटलं. 'वेलकम सर', 'ग्लॅड टू सी यू'

माझा परिचय करून देण्यासाठी एक प्राध्यापक उभे राहिले. ते म्हणाले, 'आजचे आपले चीफ गेस्ट साऱ्या महाराष्ट्रात वेल्नोन असल्यामुळं त्यांची इंट्रॉडक्शन करून देण्याची जरूर नाही. त्यांच्या ओरेटरीबद्दल मी काय सांगू ? त्यांना आम्ही केवळ फोनवरून इनव्हिटेशन दिलं. आणि ते त्यांनी ताबडतोब ॲक्सेप्ट केलं. आपल्या कॉलेजबद्दल त्यांना जी ॲफिनिटी वाटते त्याचा हा पुरावा आहे. त्यांची किती पुस्तकं पब्लिश झाली हे सांगून मी तुमचा वेळ घेणार नाही. त्यांनी अनेक कॉन्फरन्सेस अटेन्ड केल्या आहेत. अनेक स्टेट ॲवॉर्डस् त्यांना मिळालेले आहेत. मी त्यांना आता मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल त्यांचे विचार त्यांनी एक्सप्रेस करावेत अशी विनंती करतो. बाय द वे मराठी लिटररी असोसिएशनचं ओपनिंग झाल्याचंही त्यांनी डिक्लेअर करावं.'

सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. परिचय करून देणाऱ्या प्राध्यापकाचं 'उत्कृष्ट' मराठी ऐकून मी बेशुद्ध कसा पडलो नाही याचं मला आश्चर्य वाटलं. पाठीमागे भिंतीवरच्या फलकावर लिहिलं होतं, 'माझा मराठाचि बोलु कवतुके। परि अमृताते ही पैजासि जिंके।' ओळीच्या खाली श्री एकनाथ असं लिहिलं होतं. ज्ञानेश्वरांची सुप्रसिद्ध ओळ त्यांच्या संमतीशिवाय एकनाथांना उदारतेनं देण्यात आली होती. ज्ञानेश्वरांची काहीही तक्रार नव्हती. असणार नाही. कारण तो

संत शांतिब्रह्माचा अवतार होता. अशी आगळिक तुकारामांच्या बाबतीत घडली असती तर - 'तुका म्हणे ऐशा नरा, मोजूनि माराव्या पैजारा' अशी अवस्था आली असती. सुदैवानं हे तिघेही संत तिथं उपस्थित नव्हते.

मी क्षमाशील दृष्टीनं त्या फलकाकडं पाहिलं आणि सौजन्यानं त्यात झालेल्या चुकीचा उल्लेख केला नाही. कारण त्या सभेचा मी आदरणीय पाहुणा होतो. यजमानाची चूक चारचौघात बोलून दाखवू नये म्हणून शांत राहिलो. माझा परिचय करून देणारं 'मराठी' भाषण मात्र मराठी भाषेला घायाळ करून गेलं. आमच्या ज्ञानेश्वर-तुकारामांची मराठी या प्राध्यापकानं किती कंगाल केली हे पाहून मी फार अस्वस्थ झालो. पण उपाय नव्हता. माझ्या भाषणात मी मराठीचं 'माहात्म्य' विवरून सांगितलं. या भाषेतून किती उत्तमोत्तम साहित्यकृती निर्माण झाल्या आणि त्यामुळं महाराष्ट्राच्या संस्कृतीला कसं सामर्थ्य आणि सौंदर्य लाभलं याची मीमांसा केली. कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना गंभीर भाषणं नको असतात. 'चीफ गेस्टनं' काहीतरी इंटरेस्टिंग बोलावं. काही जोक्स सांगावेत. वाटल्यास एखादी सिनेस्टोरी सांगावी आणि फंक्शन सक्सेसफुल करावा, अशी त्यांची अपेक्षा असते. कोणे एके काळी होऊन गेलेल्या ज्ञानेश्वर-तुकारामांत त्यांना इंटरेस्ट नसतो. प्राध्यापकांनाही बोअर करणारी भाषणं नको असतात. कारण त्यामुळं सभेची डिसिप्लिन बिघडते. सध्या प्राध्यापकही फारसं वाचन चिंतन करण्याच्या नसत्या उपद्व्यापात पडत नाहीत. दोन पिरियडस् घेतले आणि रेडिमेड नोटस् गाइडमधून लिहून दिल्या की त्यांचं कर्तव्य संपतं. मग स्टाफरूममध्ये पे स्केल आणि डियरनेस अलाउन्स यासंबंधी भरघोस चर्चा करता येते. नाहीतरी हे ज्ञानेश्वर-तुकाराम वगैरे संत आपले प्रॉब्लेम्स सॉल्व्ह करू शकत नाहीत असं प्राध्यापक मंडळींचं कॅलक्युलेशन असतं.

मी तळमळीनं तासभर बोललो. विद्यार्थ्यांना कंटाळा येऊ नये म्हणून दोन-चार माफक विनोदही करून सभेतलं वातावरण खेळकर ठेवलं. माझं भाषण संपल्यावर मराठी वाङ्मय मंडळाचा सचिव आभार मानण्यासाठी उभा राहिला. तो म्हणाला, 'आपल्या चीफ गेस्टचे थँक्स् मानण्यासाठी सेक्रेटरी या नात्यानं मी उभा आहे. आजचं भाषण फारच ब्रिलियंट होतं. आपल्या लर्नेड गेस्टनी 'मराठीवर प्रेम करा.' असा संदेश दिला. त्यांचा ॲडव्हाइस खरोखरच बहुमोलाचा आणि व्हॅल्युएबल आहे. चीफ गेस्टना कॉलेजच्यावतीने रिक्वेस्ट करतो, नेहमी येऊन असंच आम्हाला गाईड करीत चला.'

आता माझी सहनशीलता संपत आलेली होती. मराठी वाङ्मय मंडळाचं उद्घाटन मी खरोखर केलं काय हा प्रश्न मला सारखा टोचू लागला. मराठीच्या प्राध्यापकांना देखील अजून मराठी भाषा कळलेली नाही हेच खरं. एखादं साधं मराठी वाक्यसुद्धा पूर्ण मराठीतून बोलता न येणं यापेक्षा दुसरी लाजिरवाणी गोष्ट कोणती ? महाराष्ट्रातच मराठी रुग्णशय्येवर पडलेली आहे. हे दृश्य दिसत असताना मराठीचं भवितव्य उज्ज्वल आहे असं विधान आम्ही कोणत्या तोंडानं करायचं ? आपल्याच मायभाषेची मोडतोड करून तिच्यात चुकीचे इंग्रजी शब्द घुसडण्यात अभिमान बाळगणारे हे मराठी लोक मातृघातकी आहेत. समारंभ मराठी भाषेसंबंधीचा आणि त्या सोहळ्यात बेदरकारपणे इंग्रजी शब्दांची अनाठायी उधळण करण्यात आपल्या बुद्धीचं आणि स्वाभिमानशून्यतेचं केविलवाणं प्रदर्शन केलं जातं.

परवा दूरदर्शनवर एका मराठी नटीची मुलाखत ऐकली. दहाव्या इयत्तेपर्यंत तिचं उच्च शिक्षण झालं होतं. ती आपल्या मुलाखतीत सांगत होती, 'मला लहानपणापासूनच ॲक्टिंगचं फॅसिनेशन होतं. डॅडी-मम्मीनं मला अेनकरेज केलं. आज मला मिळालेली पब्लिसिटी त्यांच्या ॲडव्हाइसप्रमाणे मी वागले म्हणूनच मिळाली. माझा रोल मी नेहमीच डिव्होशन ओतून करते.' मी दूरदर्शनची कळ दाबून ती मुलाखत बंद केली. जेमतेम दहावीपर्यंत ढकलली गेलेली आणि पडद्यावर सुमार भूमिका करणारी ही फडतूस नटी डिव्होशनबद्दल सांगत होती. मध्येच बोलता बोलता ऑस्पिशस् ऑकेजनच्या ऐवजी ती सस्पिशस् ऑकेजन असं म्हणाली तेव्हा तर मला हसू फुटलं. इंग्रजी भाषेची ती लक्तरं लोंबवीत होती. मधून-मधून कुठंतरी ऐकलेले पण अर्थ माहीत नसलेले इंग्रजी शब्द ती मूर्ख धाडसानं खुशाल टाकीत होती. हे शब्द शेक्सिपअरच्या कानावर पडले तर तो थडग्यातून उठून तिच्यावर हल्ला चढवील असं मनात येऊन गेलं. त्या नटीला मराठी धड येत नव्हतं. इंग्रजीतले दहा-वीस शब्द तिने जिभेवर बाळगले होते आणि ही म्हणे तरुणपिढीची आवडती नटी ! सवंग देहप्रदर्शन करणारी एक टारगट नर्तकी दूरदर्शनवर मुलाखत द्यायला येते हाच चमत्कार आहे.

आपल्या बोलण्यात अधूनमधून इंग्रजी शब्द टाकले म्हणजे आपली प्रतिष्ठा वाढते असा भयानक गैरसमज करून घेणारे वेडे लोक 'इये मराठीचिये नगरी' इंग्रजी शब्दांचा सुकाळु करतात. 'थँक्स', 'सॉरी', आणि 'हॅपी बर्थ डे टु यू' असं अडखळत म्हटल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. काही दिवसांपूर्वी एका तालुक्याच्या गावात

एक दिवस एका हॉटेलात राहण्याचा मला प्रसंग आला.

उतारूंची नोंद करणाऱ्या वहीत मी माझं नाव मराठीत लिहिलेलं पाहून तिथला व्यवस्थापक मला म्हणाला, 'पाव्हणं, इंग्रजी शिकला न्हाई काय ? अवं, मराठीत काय लिहिता ? इयाक इंग्रजीत ल्हेलं फायजे. सगळ्यांनी कसं लिवलंय बगा.'

मी म्हणालो, 'माझे आई-बाप मराठी आहेत. त्यांचे इंग्रजी असतील.'

पण त्या व्यवस्थापकानं मी अगदीच खेडवळ आहे अशा दृष्टिकोनातून पाहिलं. एकूण काय, इंग्रजांना जाऊन साठ वर्षं होत आली. पण इंग्रजीचं पिशाच्च मात्र मानगुटीवरून खाली उतरलं नाही.

मराठी पहिलीच्या एक वर्गशिक्षिका मला अभिमानानं सांगत होत्या, 'एक पोरगं उशीरानं शाळेत आलं. आणि मला 'नमस्कार बाईसाहेब' म्हणालं. मी त्याला बाहेर उभं केलं. खेडवळासारखा 'नमस्कार बाईसाहेब', म्हणत होता. मी त्याला सांगितलं 'गुड मॉर्निंग मॅडम' असं शहाण्यासारखं म्हणत जा. ते नमस्कार - बिमस्कार असले शब्द मला चालत नाहीत.'

त्यावर मी मॅडमला कोपरापासून नमस्कार केला. इंग्रजीचं शिक्षण अवश्य घ्यावं. शुद्ध आणि स्वच्छ इंग्रजी बोलता यावं या मताचा मी आहे. पण आपल्या आईच्या भाषेचा तिरस्कार करून दाईच्या भाषेपुढं गुडघे टेकणं हे लाचारीचं आणि अज्ञानाचं लक्षण आहे. उत्कृष्ट इंग्रजी बोलण्यासाठी अभ्यास आणि परिश्रम केले पाहिजेत.

मी पंडित नेहरूंचं, बॅ. जयकर आणि बॅ. नाथ पै यांची उत्कृष्ट इंग्रजी भाषणं ऐकली आहेत. नाथ पै लोकसभेत बोलू लागले की पंडित नेहरू आपल्या चेंबरमधून लगबगीनं लोकसभेत येत असत. नाथ पैं चं भाषण ते मन:पूर्वक ऐकत असत. चिंतामणराव देशमुखांचा जन्म इंग्रजी लिहिण्यात आणि बोलण्यात गेला. त्यांचं विद्यापीठीय शिक्षणही इंग्लंडमध्ये झालं. पण ते जेव्हा मराठीतून भाषणं करीत असत तेव्हा त्यांच्या बोलण्यात एकही इंग्रजी शब्द येत नसे. शुद्ध आणि स्वच्छ मराठीतून झालेली त्यांची कित्येक व्याख्यानं मी ऐकली आहेत. आमचे मराठीचे प्राध्यापक मात्र निर्दोष मराठीतून बोलू शकतात काय ? हा प्रश्न आहे.

एकाला मी विचारलं - एक शंका आहे, तेव्हा तो म्हणाला, 'काही प्रॉब्लेम असेल तर फ्रँकली सांगा कुठलीही डिफिकल्टी असू द्या. मी सॉल्व्ह करीन !' त्याचं

हे भव्यदिव्य मराठी ऐकल्यावर माझा प्रॉब्लेम आपोआपच सुटला.

महाराष्ट्रातल्या प्रत्येक लहान-मोठ्या गावात लहानशा गल्लीतल्या दुकानावर देखील इंग्रजी फलक प्रामुख्यानं दिसतात. दुकानात येणारं गिऱ्हाईक बहुतेक मराठी भाषिक असतं पण दुकानावरचा फलक 'दि नॅशनल प्रोव्हिजन स्टोअर्स' असा, ऐटबाज इंग्रजीत लिहिलेला असतो. एका लहानशा आडवळणी गावात मी धोब्याचं दुकान कुठं आहे अशी चौकशी केली. त्याला माझ्या प्रश्नाचा अर्थच कळला नाही. थोडं समजावून सांगितल्यावर त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. 'हाँ हाँ ! लॉण्ड्री पाहिजे व्हय तुमाला ? अवो मग लॉण्ड्री म्हणा की सरळ मराठीत !'

त्याच्या सरळ मराठीची मला नंतर कल्पना आली. मराठीवर इंग्रजीनं केलेलं आक्रमण आता खोलवर गेलं आहे. आई-बाबा ऐवजी मम्मी-डॅडींनी संसार थाटला आहे. त्यांच्या जोडीला अंटी आणि अंकलही आले. कौटुंबिक मराठीची देखील दयनीय अवस्था झालेली पाहून तुकोबा-शिवबाची मराठी महाराष्ट्रातच निर्वासित होत चालली आहे हे लक्षात येतं. इंग्रजी संस्कृतीच्या संपर्कामुळं काही इंग्रजी शब्द मराठीत येणार यात शंका नाही. पण पाहता पाहता इंग्रजीच्या लोंढ्यात आमची मायमराठी वाहून जात असताना आमचं भाषिक आणि सांस्कृतिक कर्तव्य काय आहे याचा जोपर्यंत गंभीरपणानं विचार होत नाही तोपर्यंत मराठी भाषेचा अध:पात अटळपणे होतच राहणार ! तो टाळण्यासाठी आपल्या भाषेचा अभिमान आपल्या रक्ताच्या बिंदूतून नाहीसा होऊ न देणं हे आपलं कर्तव्य आहे-नव्हे तो आपला धर्म आहे.

मंत्रालयात दोन अधिकारी एकमेकांशी इंग्रजीत बोलत होते. त्यांच्या इंग्रजीत कित्येक व्याकरणदोष होते. एखादा अन्वर्थक इंग्रजी शब्द सापडला नाही म्हणजे ते सरळ मराठी शब्द वापरीत होते. त्यापेक्षा सरळ मराठीत त्यांना बोलणं सहज शक्य असूनही आपण इंग्रजीतून संभाषण करीत आहोत हा अहंगंड त्यांच्या मनात होता. मराठी बोलणं कमी प्रतीचं पण इंग्रजी शब्द उच्चारणं हे मात्र उच्चतेचं द्योतक आहे हा भिकार भ्रम त्यांच्या डोक्यात होता.

थोडा वेळ त्यांचा संवाद ऐकल्यावर मी त्यांना म्हणालो, 'सद्गृहस्थांनो, आपल्या आईची भाषा बोलताना आपल्याला न्यूनगंड का वाटावा ? मराठी ही आता राजभाषा बनली आहे. कवी कुसुमाग्रजांच्या भाषेत सांगायचं तर

मायमराठीच्या मस्तकावर राजमुकुट आहे. पण तिच्या अंगावरची वस्त्रं मात्र फाटलेली आहेत. मंत्रालयाच्या पायऱ्यांवर ती खिन्नपणानं उभी आहे. तुम्ही उच्चभ्रू अधिकाऱ्यांनी आमच्या मराठीला मंत्रालयात येऊ दिलेलं नाही. जगातल्या कोणत्याही देशात तिथल्या मातृभाषेतूनच राज्यकारभार चालतो. प्रत्येक देशात शिक्षणाचं माध्यम मातृभाषा हेच आहे. फक्त आमच्या देशात इंग्रजी भाषेतून शिक्षणाचे किंवा ज्ञानाचे चमचे भरून विद्यार्थ्यांच्या तोंडात भरवले जातात. मी तर संस्कृतसुद्धा इंग्लिशमधून शिकलो. 'कमलनेत्रा शकुंतला' म्हणजे Lotus-Eyed Shakuntala असं शिकावं लागलं. आईच्या भाषेवर बहिष्कार टाकणारा देश जगाच्या पाठीवर दुसरा कोणता असेल काय ?

ज्ञानेश्वर-तुकारामांनी आणि मुक्ताई-जनाईंनी श्रीमंत केलेली मराठी भाषा मराठी माणसांनीच कशी कुरतडून टाकली आहे याचं दर्शन ठिकठिकाणी होतं. मराठी वाङ्मय मंडळाच्याच उद्घाटन समारंभात मायमराठीचं वस्त्रहरण झालेलं मी पाहिलं आणि अस्वस्थ मनानं घरी परतलो.

●●●

# भोगरसिक आणि भोगलंपट

एकदा एक तरुण संन्यासी भगवान बुद्धाला म्हणाला, 'भन्ते, संन्यास घेण्यापूर्वी मी अनेक सुखांचा आत्यंतिक उपभोग घेतला. त्यातून आनंदापेक्षाही मला उद्वेगाचीच अधिक अनुभूती आली. म्हणून मी संन्यास घेतला. कठोर तपस्या आणि अनेक नियम यामुळं आनंदाचा अनुभव येत नाही. भोगानंही शरीर आणि मन दुबळं झालं. आता त्यागातही हीच अवस्था मी अनुभवतो आहे. जीवनाच्या आनंदासाठी भोग आणि त्याग हे दोन्ही मार्ग अयशस्वी ठरतात. मला आपण या बाबतीत मार्गदर्शन करा.'

भगवान बुद्धांनी स्मित केलं. त्या संन्यासाकडं नीट पाहिलं. तो अत्यंत कृश झाला होता. शरीरदंडनामुळं त्याचं स्वास्थ्य बिघडलं होतं.

बुद्ध म्हणाले, 'हे साधो, तुम्हाला वीणा, सतार, वगैरेसारखं वाद्य वाजवता येतं का ?'

संन्याशानं होकारार्थी उत्तर दिलं.

बुद्धांनी विचारलं, 'खुंट्या पिळून वीणेच्या तारा अत्यंत ताणल्यावर त्यातून मधुर स्वर निघेल काय ? अर्थातच नाही. वीणेच्या तारा सैल सोडल्या तर त्यातून सुस्वर निघेल का ? या दोन्ही कृती आत्यंतिक टोकाच्या आहेत. मधुर संगीतासाठी तारा फार ताणायच्या नाहीत. किंवा त्या फार सैलही सोडायच्या नाहीत हे वीणावादक जाणतो. भोगालाही मर्यादा आहे, असलीच पाहिजे. तशीच ती त्यागालाही असावी. आपल्या शारीरिक आणि मानसिक शक्तींचा मध्यबिंदू शोधावा आणि मध्यम मार्गानं प्रवास करावा. भोग आणि त्याग यांचं विचारपूर्वक संतुलन साधावं.'

भगवान बुद्धाचे हे विचार जीवनाच्या सफलतेसाठी अत्यावश्यक आहेत. माणसांचे आचारविचार मर्यादा सोडून अतिरेकाच्या सीमेपलीकडे धावत जातात आणि त्यातूनच दु:खांची एक मालिका निर्माण होते. शरीर, मन आणि बुद्धी यांच्या तारा अविचारी मनुष्य सैल तरी सोडतो किंवा त्या ताणून तरी धरतो. त्यामुळं त्याच्या जीवनात उमटणारे स्वर दु:खाचे आणि निराशेचेच असतात. सुवर्णमध्य साधण्याची विवेकशक्ती हीच जीवनाच्या आस्वादासाठी आवश्यक असते. पण माणूस हा

मूलत:च अतिरेकाचा भोक्ता आहे की काय कुणास ठाऊक! संगीताचे सूर रसिकतेनं ऐकणं हादेखील कित्येक कर्मठांना अपराध वाटतो. संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, साहित्य या कलांची अभिरुची असणं आणि त्यामुळं आनंद मिळवणं यात अनैतिक काय आहे? पण नृत्य, गायन, नाटक इत्यादी कलांच्या दर्शनश्रवणावरही धर्माच्या नावाखाली काही ठिकाणी बंदी होती. या कलांच्या माध्यमातून मिळणारा आनंद खरं तर जीवनाची रुचिरता वाढवणारा असतो. आस्वाद आणि उपभोग या गोष्टी जीवनपोषक असतात. जे जे सुंदर आणि आकर्षक असेल ते ते त्याज्य मानून केवळ आत्मस्वरूपात मग्न असावं हा अतिरेकी मार्ग दु:खाचाच आहे. पण त्याबरोबरच वाटेत येणाऱ्या प्रत्येक मोहाला कवटाळण्याचा विचार आणि आचार माणसाला विनाशाकडे नेतो. भगवान बुद्धाचंच एक सुंदर वचन आहे :

नत्थि रागसमो अग्नि नत्थि दोससमो गहो।
नत्थि मोहसमं जालं नत्थि तण्हासमा नदी॥

आसक्तीसारखी आग नाही. द्वेषासारखी मगर नाही. मोहासारखं जाळं नाही आणि तृष्णेसारखी नदी नाही. मोहाच्या जाळ्यात सापडून तृष्णा नदीच्या प्रवाहाबरोबर बहुसंख्य माणसं वाहवत जातात. आसक्तीच्या धगीत होरपळण्यापेक्षा जीवनात सारासार विचारानं संतुलित राहण्याचा जो प्रयत्न करतो तो जीवनानंद घेऊ शकतो. हा तोल सांभाळणं कठीण आहे. पण ज्याला तो साधतो त्याला खऱ्या अर्थानं 'धार्मिक' म्हणायला हरकत नाही. आपल्या जीवनाची वीणा मधुर स्वरांनी झंकारित व्हावी आणि त्या स्वरांतून पाझरणारा आनंद निकोप मनानं घ्यावा यासाठी या वीणेच्या तारा फार ताणू नयेत. किंवा फार सैलही सोडू नयेत. नाहीतर आपण भोगांचा भोग घेण्याऐवजी आपण भोगांचे भक्ष्य बनू. तृष्णा जीर्ण होण्याऐवजी आपणच जराजीर्ण होऊ. काळ निघून जाण्याऐवजी आपणच निघून जाऊ. मी भोक्ता आहे ही भूमिका सुटता कामा नये. भूमिका वठवताना ती अतिरेकी होऊ नये ही दक्षता घेणं आवश्यकच असतं. मध्यबिंदूला सुवर्णमध्य म्हटलं जातं. ते एका अर्थानं उचितच आहे. समतोलाचा विचार हाच धर्म आहे असं विधान करता येईल. हा विचार नुसता तर्कशुद्ध नाही तर जीवन आनंददायक करणारा आहे.

एका तरुणानं या विचाराला तीव्रपणानं विरोध केला. तो म्हणाला, 'हे जुने झालेले, कालबाह्य झालेले फाजील सोवळे विचार आहेत. जीवनाचा उपभोग सर्व अंगांनी, मनसोक्तपणानं, धुंदपणानं घेत राहिलं पाहिजे. तोल सांभाळण्यात

सुख नाही. बेताल होण्यात खरा रंग आहे. जो धुंदपणानं गातो त्याचं गाणं रंगतं. ताल आणि लय सांभाळून, दक्षता घेऊन गाण्यात खरा रंग भरत नाही. आयुष्य हे मस्तीत जगलं पाहिजे. शिळपट नीतीनियम लावून त्या आयुष्याला बांधून टाकणारे तुमचे हे पारंपरिक विचार आता बासनात गुंडाळून ठेवा. उगीच बुद्ध महावीराची हजारो वर्षांपूर्वीची उदाहरणं देऊ नका. या दोन्ही महात्म्यांनी राज्यवैभव सोडलं. ते रानावनात हिंडले. त्याग आणि संयम यांचे धडे त्यांनी जगाला दिले त्या रामाच्याही त्यागाचं तुम्ही लोक स्तुतीस्त्रोत्र गाता. हाती येणारं राज्य सोडून वनवासात गेलेल्या रामाचं जीवन सफल झालं का ? मी त्यांच्या ठिकाणी असतो तर राज्याचा, ऐश्वर्याचा, गडगंज संपत्तीचा पुरेपूर उपभोग घेतला असता. राजा ययाती ज्याप्रमाणं पुन्हा-पुन्हा तरुण होऊन विषयसुखात डुंबत राहिला. तसं मी केलं असतं. उगीच धर्माच्या आणि त्यागाच्या भाकडकथा आम्हाला सांगू नका. माझ्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत भोगभावनेची तहान आहे. बस्स ! भोग, संपूर्ण भोग, धुंद होऊन घेतलेला भोग हाच खरा धर्म आहे. भोगाची उपासना करण्यातला बेदरकार आनंद ज्यांना घेता येत नाही ते त्यागाचं तुणतुणं वाजवीत बसतात. आम्हाला असला शिळा झालेला धर्म नको आहे. विषयसुखाच्या रथात बसून आम्ही मिरवत मिरवत जीवनमार्गावरून जाणार आहोत. तुमचे जुने-पुराणे, आंबलेले शिळपट विचार तरुणांनी कधीही स्वीकारू नयेत.'

त्या तरुणानं भोगवादाची वकिली फार जोरदारपणानं केली. पण आंधळा भोगवाद विकृतीकडं आणि रोगटपणाकडं माणसाला घेऊन जातो. हे साधं व्यवहारज्ञान त्याला नव्हतं. महाविद्यालयातून शिकलेल्या या तरुणाला त्याग आणि संयम हे जुनाट झालेले शब्द वाटावेत हा त्याच्या अडाणीपणाचा पुरावा आहे. पुस्तकं वाचून आणि परीक्षा उत्तीर्ण होऊन ज्ञान मिळत असतं तर मूर्खपणा जगात उरलाच नसता. आज अशिक्षित लोक जेवढे शहाणे आहेत तेवढं शहाणपण डबल ग्रॅज्युएट झालेल्या लोकांत सापडत नाही. पदवीधरांच्या अज्ञानाच्या सुरस आणि चमत्कारिक कथा वाटेल तितक्या सांगता येतील.

संत कबीर हा निरक्षर होता. लिहिता वाचता न येणाऱ्या या साधूच्या प्रत्येक शब्दांतून ज्ञानाची गंगा वाहत होती. माणसांच्या सुखदु:खाचं निरीक्षण आणि चिंतन समतोल बुद्धीनं करण्याची शक्ती त्याच्यात होती.

भोगवादाचं समर्थन करणाऱ्या त्या तरुणाला भोगातलं अल्प सुख कळलं

होतं परंतु भोगाची परिणती रोगात झाल्याशिवाय राहत नाही; हे उघडं सत्य मात्र त्याच्या दृष्टीला दिसलं नव्हतं. क्लबमध्ये दारू पिऊन धुंद झालेला, मस्तवाल बनलेला एखादा लोकप्रिय नट त्या नशेत आपली गाडी भरधाव वेगानं चालवतो आणि दोनचार लोकांना गाडीखाली चिरडून टाकतो हे पशुतुल्य भोगी प्रवृत्तीचं लांछनास्पद उदाहरण आहे. मुंबईसारख्या महानगरातच नव्हे तर खेड्यापाड्यांत सुद्धा दारूच्या गुत्त्यात धुंद होऊन पडलेली जनावरं आढळतात. काही घरात बालकाला पाजण्यासाठी दुधाचा थेंब नाही म्हणून अश्रू ढाळणारी गृहिणी असते. मूल रडत असतं. आणि मुलाचा बाप बारमध्ये एखाद्या धंदेवाईक बारबालाच्या हातून हसत हसत दारूचा प्याला घेत असतो. शंभर रुपयाची नोट तिच्या हातात देताना हाताचं स्पर्शसुख अनुभवीत असतो. दुधाच्या घोटासाठी रडणारं मूल बाजूला सारून मद्याचे घोट घेणारा त्याचा बाप हे सुसंस्कृत वृत्तीचं केवढं उज्ज्वल उदाहरण आहे ! भोगवादाचा विजय असो ! त्याग आणि संयम ही जुनीपुराणी मूल्यं आता झिजून गेली. त्यांचा पार कोळसा झाला. ते प्रभू रामचंद्र, भगवान महावीर आणि भगवान बुद्ध हे त्यागवादी होते. तिघेही राज्यवैभव सोडून रानावनात गेले. भोगाकडं त्यांनी पाठ फिरवली. हा अविचार मघाशी व्याख्यान देणाऱ्या भोगवादी तरुणाला करायचा नव्हता. तो म्हणाला, 'भोग हाच आमचा धर्म आहे.' माणसं किती भोगलंपट असतात याची असंख्य उदाहरणं प्रत्येकाला आठवतील.

एकेकाळी रुपेरी पडद्यावर कारुण्याची देवता म्हणून गौरविली गेलेली मीनाकुमारी ही नटी अनेकांच्या स्मरणात असेल. ती सुंदर होती. अभिनयकुशल होती. कविता लिहायची. पण ती दारूच्या आहारी गेली. दु:ख विसरायचं म्हणजे दारू पिऊन धुंद व्हायचं हाच मुक्तीचा मार्ग आहे ही तिनं समजूत करून घेतली. तिचा दररोजचा दिवस मद्याच्या बाटलीतून उगवायचा. अखेर त्या बाटलीतच लपून बसलेल्या मृत्यूनं तिला मुक्ती दिली. कुंदनलाल सैगल नावाचा असामान्य गायक याच बाटलीत बुडून गेला. कित्येक कलावंत संयम नावाच्या मूल्याचं पार वस्त्रहरण करतात आणि स्वत:च नागडे - उघडे होऊन पडतात. या लोकांनी जीवनातल्या आनंदाचा योग्य दिशेनं शोध केला असता आणि संयमानं आनंदाचा आस्वाद घेतला असता तर त्यांना जीवनातलं सौंदर्य नीटपणानं कळलं असतं.

तोल सुटल्यानंतर एक पाऊलही टाकता येत नाही याचं प्राथमिक ज्ञान नसलेल्या या भोगवाद्यांना काय म्हणावं ? तारुण्याच्या मस्तीत आणि पैशाच्या

धुंदीत उदात्त मूल्यांची नासाडी करीत नंगानाच करणाऱ्या या मूर्खांना शहाणे बनवणारे शब्द जगातल्या कोणत्याही शब्दकोषात सापडत नाहीत. संत तुकारामांचा एक अभंग मला आठवतो. त्यात त्यांनी म्हटलं आहे, 'साधूंचं दर्शन न घेणारा हा माणूस रांडेच्या दर्शनासाठी' तिच्या दारात तासन्तास उभा राहतो. आईबापांना शिव्या घालणारा हा चांडाळ दासीच्या पोराचं चुंबन घेतो.'

खरोखरच अशा माणसाला भोगही कळला नाही आणि त्यागही समजला नाही. जीवनातल्या प्रत्येक रसाचा रसिकतेनं जरूर आस्वाद घ्यावा पण त्या आस्वादाच्या मुळाशी तारतम्य पाहिजे. पोहण्याचा आनंद पाण्यात मिळतो पण पाण्यात बुडणाऱ्याला तो मिळत नाही. तरंगण्याचं कौशल्य नसेल तर पाणी बुडवणारच. सुखाकडं पाठ फिरवू नये यात शंका नाही. पण जे सुख दु:खाकडं खेचून नेणारं असतं त्या क्षणिक सुखाला कठोर संयमानं बाजूला सारण्याची निग्रहशक्ती माणसात असलीच पाहिजे. वीणेच्या तारा फार सैल सोडू नयेत किंवा त्या फार ताणू नयेत. वीणावादनाचा हा नियम ज्याला माहीत नाही त्याच्या जीवनाची वीणा कधीही सुस्वर निर्माण करू शकणार नाही. संगीताला ताल पाहिजे. गाण्याला सूर पाहिजे. जगण्याला अर्थ पाहिजे. त्यागाचं अवडंबर माजवू नये पण भोगाच्या चिखलात फसू नये. हा संतमहंतांचा उपदेश सनातन आहे. तरीही तो लक्षात घेतला पाहिजे. महापुरुषांची चेष्टा करणं पार सोपं आहे पण त्यांना समजून घेणं आणि त्यांच्या विचारांचं अनुकरण करणं हे अवघड आहे. जीवनाचा शेवट चांगला होण्यासाठी संपूर्ण जीवन चांगलं ठेवावं लागतं.

गौतमबुद्धासारखा महान तत्त्वचिंतक जेव्हा, 'आसक्तीसारखी आग नाही आणि तृष्णेसारखी नदी नाही' असं सांगतो तेव्हा त्याच्या शब्दांतून व्यक्त झालेलं ज्ञान आदरानं स्वीकारलं पाहिजे. भोगाची आंधळी लाट आयुष्याची वाट लावते. म्हणून मी म्हणेन, भोगरसिक व्हा. पण भोगलंपट होऊ नका. हे शब्द आजच्या प्रचंड भोगवादी लाटेबरोबर वाहून जाऊ नयेत. इतकंच माझं मागणं आहे.

●●●

# अजून यौवनात मी !

निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे असलेले माझे एक मित्र प्रा. विश्वनाथ मला अत्यंत निराश स्वरात म्हणाले, 'दोन महिन्यांनी मला साठ वर्षे पूर्ण होतात. आयुष्यातला कर्तृत्वाचा, उत्साहाचा कालखंड तर संपून गेला. म्हातारपणाच्या भेसूर सावल्या अंगावर पडत आहेत. जे थोडे दिवस उरले असतील ते माझ्या पदरात काय काय घेऊन येणार आहेत हे सांगता येत नाही. जगण्याचं वय निघून गेलं, मरणाची वाट पाहत बसणं इतकंच माझ्या हातात आहे. इथला तर खेळ संपला.'

आत्यंतिक वैफल्याचे हे उद्‌गार ऐकून मला हसू आलं. साठ वर्षं संपली आणि व्यवसायातून निवृत्ती पत्करली की पुष्कळ माणसं मनानं आणि विचारानं खचून जातात. जीवनाकडं जणू ती पाठ फिरवतात. वार्धक्याची काही अंशी भीती वाटली तर ती थोडीफार स्वाभाविक असली तरी म्हातारपणात सारा आत्मविश्वास हरवून ही माणसं एकदम अंतिम निरोपाची भाषा का बोलतात. हे मला कळत नाही.

वृद्धपणातही त्याचं स्वत:चं एक आगळं सौंदर्य असतं. सॉक्रेटिसचं एक वचन मला आठवतं. तो म्हणत असे, 'Age has its beauty'. या वचनात निश्चितच तथ्य आहे. कोणताही विचारशील मनुष्य वृद्धत्वाला भिणार नाही. मी तर वृद्ध होणं याचा अर्थ वृद्धिंगत होणं म्हणजे विकास पावणं असा करतो. जीवनाचा अनुभव घेतल्यामुळं विचार आणि दृष्टी विकसित होत असते. जीवनसौंदर्याचा आस्वाद अधिक रसिकतेनं आणि प्रगल्भ वृत्तीनं घेता येण्याची अवस्था वार्धक्यात आपण अनुभवू शकतो. आयुष्याचा प्याला अर्ध्यापेक्षा अधिक रिकामा झाला हे वास्तव पत्करून सुद्धा आपण म्हणू शकतो अजून कित्येक घोट उरले आहेत. प्याल्यातल्या प्रत्येक थेंबाची रुची मला समरसतेनं घ्यायची आहे. हे पात्र केव्हातरी रिकामं होईलच पण त्याच क्षणाचं सारखं भजन करीत मला बसायचं नाही. मी निवृत्त झालो ते माझ्या व्यवसायातून. जीवनातून नव्हे. अजून कितीतरी स्वप्नांचा मला पाठलाग करायचा आहे. अपुरे राहिलेले कितीतरी मनोरथ नव्या उत्साहानं सजवायचे आहेत. जीवन संपलेलं नाही. त्यानं केवळ सांधा बदललेला आहे. ही नवी वाट देखील सुंदर आहे. या वाटेवरही काही फुलं फुललेली असू शकतील.

काटे तुडवीत फुलांचा शोध घेण्यात स्वारस्य आहे. साठी उलटली तरी मनातलं काव्यमय भावनांचं चांदणं मावळणार नाही. मनातले जीवनप्रेमाचे सूर बेसूर होणार नाहीत. लौकिक अर्थानं मी जुना झालो, पण जुन्यातलं तारुण्य जोपर्यंत मला मोह घालतं तोपर्यंत मी वृद्ध होणार नाही.

गोल्डस्मिथचं एक आशावादी सुभाषित उद्‌धृत करतो. 'I love everything that's old. Old friends, old times, old manners, old books, old wine' जे जे जुनं आहे ते मला प्रिय आहे. जुने मित्र, जुना काळ, जुन्या चालीरीती, जुनी पुस्तकं, जुनं मद्य. जुन्याकडं पाहणारी गोल्डस्मिथची ही जीवनदृष्टी मात्र नवीन आहे. तरुण आहे. तिच्यातल्या ताजेपणाला एक अर्थ आहे.

प्रा. विश्वनाथ हे विज्ञानशास्त्राचे प्राध्यापक. त्यामुळं काव्यमय कल्पनेला ते पोरकट म्हणून हिणवायचे. कल्पना कितीही काव्यमय असली तरी तिला वास्तवाची बैठक असू शकते. दु:खदायक विचार मनात आणून कुढत बसण्यापेक्षा कल्पनासुंदर विचारात रममाण व्हायला काय हरकत आहे ? जे पोरकट वाटतं त्यातही सुंदरतेचे रंग असतात. नवं खेळणं दिसलं की बालकाच्या मुद्रेवर हास्याचे रंग उमटतात. गंभीरपणानं विचार करू लागलो तर बालकाचा आनंद अगदीच बालिश आहे असं म्हणता येईल. बालिशपणात जीवनानंद भरपूर असतो. पोरवयात आम्ही फुलपाखरांच्या मागं धावत होतो. झाडावर चढून पेरू तोडत होतो. एखाद्या पोराची किंवा माणसाची वेडीवाकडी नक्कलं करून हसत होतो. शाळेत शिक्षकाच्या खुर्चीवर त्याला दिसणार नाही अशा बेतानं शाई टाकत होतो. पण या पोरकट खेळांत आनंद होता. आज प्रौढपणातही या गोष्टींची आठवण मनाला आनंद देते. वृद्ध होत चाललेल्या माणसाच्या स्मरणात जीवनातल्या कितीतरी कडूगोड घटनांची गर्दी झालेली असते. त्या साऱ्या अनुभवांचा पुन:प्रत्यय घेण्यात आनंद नाही काय ? गतायुष्यातील दु:खं देखील वार्धक्यात एक प्रकारचा अस्वस्थ आनंद देऊ शकतात. या अनंत आठवणी हेच आपलं धन असतं. आठवणींचा खजिना कधी रिकामा होत नाही. कोणाशी तरी कित्येक वर्षांपूर्वी केलेलं कडाक्याचं भांडणदेखील आठवलं तर पुन्हा ते क्षण सजीव होतात.

पुनरावृत्तीत देखील काही नवीनता असते. सगळंच जुनं होत नाही. तसं असतं तर जीवनाला काहीच अर्थ उरला नसता. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत सारं 'तेच ते' असतं पण त्यात सतत नावीन्यही असतं. प्रत्येक अनुभव, प्रत्येक सुख

आणि दु:ख जसंच्या तसं असत नाही. त्यात वेगळे संदर्भ असतात. अनुभूती घेताना वेगळी मन:स्थिती असते. हे जीवन आणि त्यातले अनुभव जितके सांकेतिक आहेत. त्यापेक्षा ते अनेक पटीनं नवीन आणि अर्थपूर्ण असतात. कितीही जगलो तरी जगण्याचा हव्यास किंवा ओढ कमी होत नाही. कारण या जीवनाला नवीनतेची बैठक आहे. एखाद्या सुंदर युवतीच्या लावण्यशोभेत ज्याप्रमाणं रसिकाला नित्यनूतनता आढळते त्याप्रमाणं या जीवनाला नित्य नावीन्याचं वरदान लाभलेलं आहे.

भगवान गौतम बुद्ध जीवनाच्या अंतिम क्षणी आपल्या शिष्यांना म्हणाले होते, ''ही सृष्टी रमणीय आहे. अस्ताला चाललेल्या सूर्याची कोवळी किरणं झाडांच्या फांद्यांवर पसरली आहेत. पानं त्या प्रकाशात चमकत आहेत. नदीच्या प्रवाहावर पडलेले किरण किती आकर्षक वाटत आहेत. पक्ष्यांचे चित्रविचित्र आवाज आनंद देत आहेत. मानवी जीवन खरोखरच सुंदर आहे.''

बुद्धाचे हे उद्‌गार त्यांच्या सौंदर्यदृष्टीवर आणि चिंतनशीलतेवर प्रकाश टाकतात. आपल्यालाही अशी रससृष्टी मिळवली पाहिजे. जशी दृष्टी असेल तशी सृष्टी दिसते. साठी उलटली किंवा सत्तरी उलटून गेली म्हणून काय झालं. कवी अनिलांनी म्हटलं आहे -

अजून यौवनात मी मुले फुले सभोवती
विकासती विलासती हसून हासवीत ती
प्रलोभनात प्रीतीच्या कुणी हसे झुरे जिथे
तिथे सखे नि सोबती कुणी इथे कुणी तिथे

मुलं आणि फुलं सभोवताली हसत असली, खेळत असली म्हणजे सुरकुतलेल्या वृत्ती पुन्हा टवटवीत होतात. प्रौढपणाचं ओझं नेहमी मस्तकावर घेऊन चाललेली केविलवाणी माणसं नकोशी वाटतात. वाढत्या वयाचं आणि म्हातारपणाच्या कल्पनेचं ओझं फेकून देऊन स्वच्छंदानं चालावं. खळखळून हसावं. आपल्या नातवंडांत रमून जावं. मुलांत मूल आणि फुलात फूल व्हावं. हे ज्याला जमतं तो कधीच निवृत्त होणार नाही. निवृत्तीच्या विचारांनी उत्पन्न झालेली पोकळी सहज भरून काढता येते. माझे एक मित्र संगीतप्रेमी आहेत. नामांकित गायक-गायिकांच्या ध्वनिमुद्रिका ते तासन् तास ऐकत बसतात. एका नवोदित गायकानं एका मैफलीत मातब्बर गवयावर कशी ताण केली आणि ती मैफल कशी रंगवली

याची कथा अनेक वेळा सांगण्यात त्यांना गंमत वाटते. जणू ती मैफल ते पुन्हा अनुभवीत आहेत असं वाटतं. कोणाला क्रिकेटचं वेड असतं, कोणी पुस्तकांत बुडालेला असतो. आपापले छंद आणि रंग उत्कटतेनं जपायला लागलो तर म्हातारपण लवकर येत नाही. बहुसंख्य माणसं ऐन तारुण्यातच म्हातारी होतात. मग कुठल्यातरी बुवाच्या नादी लागतात. क्रियाकांडांवर विश्वास ठेवतात. आणि पाहिजे ते मिळत नाही म्हणून जीवनाचा द्वेष करू लागतात. हे मात्र म्हातारपणाचं प्रमुख लक्षण आहे.

पंचाहत्तरी गाठलेले एक वृद्ध गृहस्थ दररोज शहरातल्या एखाद्या रुग्णालयात तास दोन तास घालवतात. रुग्णांना देण्यासाठी ताजी फळं घेऊन जातात. एखाद्या बालरुग्णाला हसवणारी गोष्ट सांगतात. वृद्धांची आपुलकीनं चौकशी करतात. हा त्यांचा नित्यक्रम होऊन बसला आहे. ते म्हणाले, 'रोगपीडितांचं दुःख थोडंतरी माझ्यामुळं कमी व्हायला मदत व्हावी हीच माझी तळमळ असते.' माझ्या गोष्टीमुळं बालकाच्या मुखावर हास्यरेषा उमटली की मला फार आनंद होतो. हॉस्पिटलमधले रुग्ण मला 'हसवणारा बाबा' म्हणून ओळखतात. दुःखितांचे अश्रू टिपणं यासारखा दुसरा आनंद नाही. औषधासाठी कित्येकांजवळ पैसे नसतात. मला जमेल तेवढी मी मदत करतो. सर्वांनी सुखी असावं हेच माझं परमेश्वराजवळ मागणं आहे. मी किती दिवस जगणार ? पण जगत आहे तोपर्यंत इतरांच्या जगण्याला शक्य तितका हात द्यावा असं मला वाटतं.'

या माणसाला जीवनाचा अर्थ कळला होता, आपल्या आजूबाजूचं जग आनंदी करावं यासाठी त्याची धडपड चालली होती. या धडपडीत त्याला स्वतःचंही सुख सापडलं होतं. कुणीतरी पत्रकार त्याच्यावर लेख लिहिणार होता. तेव्हा त्यानं ठामपणानं नकार देऊन म्हटलं, 'हे प्रसिद्धीसाठी मी करीत नाही. दुसऱ्याच्या दुःखाशी समरस होताना मला कर्तव्य केल्याचं समाधान मिळतं. यापेक्षा अन्य कोणताही भाव माझ्या मनात नाही.' रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरण्यातलं सौख्य आगळं असतं. सुखी माणसाला सारेच सोबत करतात. पण दुःखितांना साथ देणं हे माणुसकीचं सुंदर दर्शन आहे. निवृत्त झाल्यावर अशी उदारदृष्टी ठेवून जगणारा माणूस समाधानी होतो यात शंका नाही. माझ्यासारख्या निवृत्त प्राध्यापकाकडं काही मुलं मुली अभ्यासातले प्रश्न घेऊन येतात. त्यांच्याशी चर्चा करताना वेळ कसा निघून जातो ते समजत नाही. आठवड्यातून चार-पाच तास मी त्यांच्यासाठी काढून

ठेवतो. शिकवताना शिक्षकाच्या मनोवृत्ती प्रसन्न होतात. आपण विद्यार्थ्यांचं मन घडवीत आहोत आणि त्यांच्याबरोबर आपणही घडत आहोत ही जाणीव सुख देणारी असते. तल्लीन होऊन शिकवताना, गाणं ऐकताना, पुस्तक वाचताना लहान मुलांबरोबर चेंडूफळी खेळताना जीवनानंदाचा प्रत्यय येतो.

एक पेन्शनर म्हणाले, 'कसं जगावं ?' या प्रश्नाचं उत्तर स्वच्छंदानं जगावं असं आहे. भोवतालच्या लोकांशी सहकंप पावून जगावं. दु:खं आहेतच. म्हातारपण आणि मृत्यू आपल्याबरोबर चालत आहेत. पण त्यांना भिऊन जगण्यात अर्थ नाही. त्यांना सोबती समजून त्यांच्या बरोबर चालत राहावं. त्यांच्यावरही प्रेम करावं. खरं सुख आणि आनंद प्रेमभावनेतच असतो. एखाद्या कुत्र्याच्या पिलावर प्रेम केलं तरी ते आपल्याभोवती पिंगा घालू लागतं. जीवनाचा खेळ म्हातारपणातही तरुणाच्या उर्मीनं खेळत राहण्याचा आशावाद माणसाला पुन्हा तरुण करतो. मनाचं आणि भावनांचं तारुण्य जतन केलं पाहिजे.'

रँग्लर परांजपे वयाच्या ८० व्या वर्षी एका सभेत भाषण करताना म्हणाले होते, 'कोण म्हणतो मला म्हातारा ? मी तर ८० वर्षांचा तरुण तुमच्यासमोर उभा आहे.' सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला.

निवृत्तीनंतरच्या प्रवासात 'अजून यौवनात मी' असं म्हणायला शिकलं पाहिजे. तारुण्य आपल्याला मनात पकडून ठेवता येतं. यापेक्षा अधिक काय सांगणार ?

●●●

# शिवछत्रपतीशी 'संवाद'

हे हिंदवी स्वराज्याच्या शिल्पकारा, आपल्या समशेरीच्या टोकाने स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा इतिहास लिहिणाऱ्या इतिहासनिर्मात्या, क्षात्रधर्माची ध्वजा फडकवणाऱ्या पराक्रमी राजा, धर्म आणि नीती यांच्यावर निष्ठा ठेवणाऱ्या महापुरुषा, सामाजिक न्यायाच्या रक्षणकर्त्या, परकीयांची गुलामगिरी नष्ट करून 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' असा घोष करणाऱ्या युगकर्त्या, तुला अनंत वंदनं करताना तुझ्याशी थोडा 'संवाद' करायचा आहे.

हे राजाधिराजा, मी दरबारी अदब सांभाळून तुझ्याशी बोलू शकत नाही. तुझ्यावर मन:पूर्वक प्रेम आणि भक्ती यांचा वर्षाव करणाऱ्या असंख्य भारतीयांचा मी एक सामान्य प्रतिनिधी आहे. तुझ्या सिंहासनासमोर उभा राहून तुला मुजरा करण्याचं भाग्य मला मिळणं शक्यच नव्हतं. तुझ्या - माझ्यात काळाचं अंतर आहे. मी तुला कधीही पाहिलं नाही. पण तरीही तुझी पावनमूर्ती माझ्या हृदयात आहे. तू केवळ महाराष्ट्राचं स्फूर्तिदैवत नाहीस तर अखिल भारताच्या पराक्रमाचा आणि स्वातंत्र्यभावनेचा मेरुमणी आहेस. राष्ट्र घडवणारा आणि राष्ट्राला बळ देणारा तू खरा राष्ट्रनायक आहेस. तुझ्या समशेरीला रामायण, महाभारतातल्या वीरांच्या शौर्याचं आणि ज्ञानेश्वर-तुकारामांसारख्या संतांच्या वाणीचं पाणी मिळालं आहे म्हणूनच शिवछत्रपतीच्या समशेरीनं अधर्म आणि अन्याय यांचा कोथळा बाहेर काढला. आज एकविसाव्या शतकात आम्ही पावलोपावली अन्याय निमूटपणानं सहन करीत आहोत. शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या घामाला व अश्रूंना आज किंमत उरली नाही. पण सतराव्या शतकात तू शेतकरी कामकरी यांच्या श्रमाला प्रतिष्ठा देऊन त्यांच्या कल्याणासाठी सत्ता राबवली. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारी कृत्यांना कठोर पायबंद घातलास. ज्ञानाला आणि चारित्र्याला उजाळा दिलास. तू होतास म्हणून महाराष्ट्राचं महानपण अभंग राहिलं. भारताचं भारतीयत्व सुरक्षित राहिलं. माणूसपणाची प्रतिष्ठा वाढवणारी तुझी 'शिवशाही' आजच्या 'लोकशाहीपेक्षा' निश्चितच अधिक श्रेष्ठ होती. भ्रष्ट आचार करणाऱ्या पुत्राला देखील शासन करणारा 'न्यायी राजा' सतराव्या शतकात होऊन गेला. हे आजच्या राज्यकर्त्यांना अजून

कळलेलं नाही. सत्ता आणि भ्रष्टाचार यांचं समीकरण झालेल्या आजच्या युगात तुझ्यासारख्या न्यायनिष्ठुर, चारित्र्यसंपन्न, लोककल्याणकारी राजाची आम्हाला फार गरज आहे. तुझ्यासारखं नेतृत्व पुन्हा या देशाला केव्हा मिळणार कुणास ठाऊक ?

हे छत्रपती शिवराया, वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी श्री रोहिरेश्वराच्या मंदिरात तू हिंदवी स्वराज्य स्थापण्याची शपथ घेऊन ईश्वराकडे आशीर्वाद मागितला आणि उत्कट भावनेनं महत्त्वाकांक्षी शब्द उच्चारलेस की, 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे.' श्रींची इच्छा प्रमाण मानून आपल्या म्यानातून तू तलवार उपसलीस ती दुष्टांचं पारिपत्य केल्याशिवाय म्यान केली नाहीस. आपल्या ओजस्वी वाणीनं मावळे, हेटकरी, कुणबी आणि सर्व जाती-पातींच्या तरुणांत स्वातंत्र्याची आणि स्वाभिमानाची ठिगणी टाकली. लाचारी आणि गुलामगिरी यांचं लाजिरवाणं पर्व तू त्या ज्वाळात जाळून टाकलंस. 'जी हाँ, जी हुजूर' ही लोचट भाषा तुझ्यामुळं संपून गेली. 'अरेला कारे' आणि 'ठोशाला ठोसा' ही मर्दुमकी दिसू लागल्यावर परकीय राज्यकर्ते हादरून गेले. मंदिरं उद्ध्वस्त करणं, देवदेवतांच्या मूर्ती फोडणं, स्त्रियांवर अत्याचार करणं, जुलुम जबरदस्तीनं धर्म बदलायला लावणं, ही 'क्रूरकृत्ये' आक्रमकांनी वर्षानुवर्षे राजरोसपणे चालवली होती. अशा भेकड, अन्यायी सुलतानशाहीसमोर हातात आपली न्यायी समशेर घेऊन तू उभा राहिलास तेव्हा या परक्या लोकांना पळता भुई थोडी झाली.

तुला ठार करण्याची प्रतिज्ञा करून विजापूरच्या अदिलशाहीतून अफझलखान हा मातब्बर सरदार प्रचंड सैन्य घेऊन आला. त्यानं तीर्थक्षेत्रं मोडली. देवमूर्ती पायदळी तुडवल्या. जिकडे तिकडे लुटालूट केली. तुला पकडण्यासाठी त्यानं जंगजंग पछाडले. अफझलखान मस्तीत होता. सत्तेची धुंदी त्याला चढली होती. ज्याला भेटायला जायचं त्याच्या मुलखात लुटालूट आणि कत्तली करीत तो बेदरकारपणे निघाला होता. शिवाजी नावाचा एक उंदीर आपण सहजपणे आपल्या पंज्यात पकडू शकतो अशी घमेंडखोर वल्गना करीत त्यानं शिवाजीची भेट घेतली आणि तिथंच इतिहासानं एक वळण घेतलं काही इतिहासकार म्हणाले. 'प्रतापगडावर भेटायला आलेल्या पाहुण्याला शिवाजीनं विश्वासघातानं ठार केलं' काय अजब शोध लावतात हे इतिहासकार ! भेटायला आलेला पाहुणा मंदिरं आणि तीर्थक्षेत्रं उद्ध्वस्त करीत येतो. रयतेची मालमत्ता लुटीत येतो. आणि भेटलेल्या यजमानावर त्याला घट्ट आवळून भेटीचं नाटक करीत कट्यार चालवतो. हा अतिथीधर्म

इतिहासकारांना मान्य आहे काय ? घरी बोलावलेल्या पाहुण्याला मारणं नैतिकदृष्ट्या बरोबर नाही असा आक्षेप प्रसिद्ध गांधीवादी नेते मुरारजीभाई देसाई यांनीही घेतला होता. मुरारजीभाईंच्या इतिहास विषयक (अ) ज्ञानाचं कौतुक केलं पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या दीडशे निरपराधी मराठी माणसांना गोळ्या घालून ठार मारण्याची त्यांची कृती मात्र नैतिक दृष्ट्या अगदी बरोबर होती. धन्य ते मोरारजी! त्यांना देखील नीती आठवली ! जी नीती प्रतिपक्ष प्रमाण मानतो त्याच नीतीनं आपणही त्याच्याशी वर्तन करावं ही राजनीती शिवराया, तुला माहीत होती. म्हणूनच तू विश्वासघातकी आक्रमकांशी जन्मभर झुंज देऊन विजयी झालास.

राजनीती आणि युद्धनीती यांच्यातलं तुझं नैपुण्य पाहून मोगलांनाही तोंडात बोट घालावं लागलं. शिवराया, तुझ्यावर रामायण, महाभारताचे संस्कार झाले होते. महाभारतात म्हटलं आहे, 'कपटबुद्धी शत्रूंचा नाश त्यांच्या शस्त्रानेच केला पाहिजे' त्यांनी कपट करायचे आणि आपण हातात जपमाळ घेऊन उभे राहायचे हा सूज्ञपणा नव्हे. राष्ट्राची उभारणी करताना स्वातंत्र्याचे आणि समाजाचे जे शत्रू आहेत त्यांना ठेचून मारलेच पाहिजे. तण उपटून काढल्याशिवाय पीक येत नाही. स्वातंत्र्याचे शत्रू असलेल्यांना नष्ट केल्याशिवाय स्वातंत्र्याची पहाट उजाडत नाही. हे शिवाजी राजा, लोककल्याणाची उत्कट इच्छा मनात ठेवून तू आमरण शत्रूशी संघर्ष करीत राहिलास म्हणूनच भारताच्या सर्व प्रदेशात तुझ्यामुळे स्वातंत्र्याची चळवळ सतराव्या आणि अठराव्या शतकांत पसरली. इतिहासाचा वेगवान प्रवाह आपल्या बलिष्ठ बाहूंनी तू वळवलास. तुझ्यामुळे भारताच्या आकाशातला सूर्य नव्या तेजाने तळपू लागला. न्याय आणि धर्म यांना नवं बळ आलं. राजपूत आणि शीख यांच्यातही स्वातंत्र्याची ज्वलंत भावना तुझ्यामुळं पेटून उठली. औरंगजेबासारखा मातब्बर शत्रूही तुझ्या साहसामुळं आणि बुद्धिचातुर्यामुळं तेजोहीन झाला.

आग्रा येथील दरबारात सरदारांच्या तिसऱ्या रांगेत तुझ्यासारख्या धीरवीराला औरंगजेबाने उभे केले. तेव्हा तो अपमान तुझ्यासारख्या पुरुषोत्तमाला सहन होणे शक्यच नव्हते. मनाचा प्रक्षोभ कसाबसा लपवून निषेधाचे शब्द बोलून त्या आलमगीराकडे पाठ फिरवून तू दरबारातून बाहेर पडलास. महाराष्ट्राच्या तेजाची, स्वाभिमानी चुणूक बादशहाला पाहायला मिळाली. आणि त्याची झोपच उडाली. हजारो सैनिकांनी रात्रंदिवस तुझ्याभोवती जागता पहारा ठेवला असताना अत्यंत हिकमतीने संभाजीसह मुघल सैनिकांच्या हातावर तुरी देऊन तू निसटलास. ही

केवळ तुझ्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासातली एक विलक्षण नाट्यपूर्ण घटना आहे. शिवाजी ही काय चीज आहे याचं प्रत्यंतर बादशहाला आलं.

आपली मनगटं चावीत बसलेल्या त्या शहेनशहानं हिंदूंवर जिझिया कर बसवला. त्यानं आपला हिंदुद्वेष जणू पुन्हा जाहीर केला. तेव्हा हे छत्रपती शिवराया, त्याला तू जे पत्र लिहिलंस ते तुझ्या उदार, न्यायप्रिय, धर्मनिष्ठ, मानवतावादी उच्च वृत्तीची साक्ष देणारं आहे. त्या पत्रातून तू म्हटलं होतंस, 'तुम्ही आपल्या राज्यातील हिंदूंवर जिझिया कर बसविलात म्हणून माझ्या राज्यातील मुसलमानांवर तसा कर मी मुळीच बसवणार नाही. कारण दोघेही एकाच ईश्वराची लेकरे आहेत. हिंदू मंदिरात घंटा वाजवितात, पूजा करतात आणि मुसलमान मशिदीत बांग देतात, नमाज पढतात. दोघेही एकाच देवाची लेकरे नव्हेत काय ?'

तुझे हे महनीय विचार धर्मवेड्या लोकांना समजणं शक्य नव्हतं. पण सर्वधर्मसहिष्णुतेचं एक परमोच्च कोटीचं उदाहरण तुझ्या रूपानं जगाला पाहायला मिळालं. आदर्श राज्यकर्ता कसा तत्त्वनिष्ठ आणि उदारमनस्क असतो याचा वस्तुपाठ तू जगाला दिलास. औरंगजेबाला तू लिहिलेलं हे उदात्त विचारांचं पत्र म्हणजे तुझ्या वैचारिक उंचीचा सुवर्णकलश आहे.

संतांच्या मालिकेत आणि राजांच्या मालिकेत 'शिवा झालासे कळस' असं म्हटलं तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. कधीही तू पवित्र कुराणाची अवहेलना होऊ दिली नाही. हिंदू संतांप्रमाणं मुस्लिम संतांनाही तू पूज्य मानलंस. हिंदू आणि मुसलमान तुझ्या राज्यात सुखी राहिले. धर्माच्या नावाखाली रक्त सांडण्यात शौर्य मानणाऱ्या आजच्या प्रगत जगाला तुझं उदार धर्मप्रेम अजून समजलं नाही. तू केवळ मराठ्यांचा किंवा हिंदूंचा राजा नव्हतास. तू अवघ्या महाराष्ट्राचा आणि भारताचा अत्यंत गुणवान नेता होतास. इतिहासानं तुझ्या नावाभोवती कृतज्ञतेनं लक्षावधी प्रकाशदीप अक्षय उजळत ठेवावेत अशी तुझी योग्यता आहे. कित्येक शतकांतून असा स्वयंभू कर्तृत्वाचा युगप्रवर्तक महापुरुष जन्माला येतो. तू विकसित केलेली राजेशाही आज अधोगतीला गेलेल्या लोकशाहीपेक्षा कितीतरी उन्नत आणि अनुकरणीय होती. असंख्य लोकांच्या हृदयसिंहासनावर आरूढ झालेला तुझ्यासारखा छत्रपती आम्हाला पुन्हा केव्हा मिळणार ?

हे राजा शिवछत्रपती, तू राजा असूनही एखाद्या महान संताप्रमाणं जीवन जगलास. ज्या कालखंडात राजे - महाराजे नाचरंगात आणि भोगविलासात गुंतून

पडले होते, त्या काळात प्रजेच्या कल्याणासाठी तू रात्रंदिवस जागरूक राहून न्यायाचा आणि शांतीचा ध्वज उभा केलास. तुझ्याइतकं निष्कलंक चारित्र्य असलेला राजा आणि लोकनेता इतिहासाच्या पानांत सापडत नाही. सृष्टीनं तुला घडवताना अनेक उत्तमोत्तम गुणांच्या रसायनांतून तुला निर्माण केलं. सरदारक्या आणि जहागिऱ्या मिळवल्या की आपलं जीवन कृतार्थ झालं असं मानणाऱ्या ध्येयहीन वातावरणात तुझ्यासारखा महत्त्वाकांक्षी महावीर उत्पन्न झाला. पण तू स्वत:च निरीक्षणातून, चिंतनातून, अनुभवातून स्वत:ला घडवीत गेलास. राज्याचा स्वामी असूनही तू उपभोगशून्य राजा होतास. श्रीमंत असून योगी होतास. तेज आणि ओज, पौरुष आणि पराक्रम, साहस आणि ध्येयवाद, स्वप्नवाद आणि व्यवहार, भक्ती आणि शक्ती या उत्तम गुणांची उपासना करून भारताच्या इतिहासाला एक नवं वळण दिलंस. म्हणूनच लोकनायक, छत्रपती, धर्मप्रतिपालक ही विशेषणं तुझ्या व्यक्तिमत्त्वाला साजून दिसतात. तुझी राजमुद्रा देखील तुझ्या सुंदर, सुसंस्कृत दृष्टीचं प्रतीक आहे. त्या राजमुद्रेवरचा संस्कृत श्लोक वाङ्मयीन गुणानं नटलेला आहे.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
शाहसूनो: शिवस्येषा मुद्रा भद्राय राजते॥

प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणं तुझं राज्य कलेकलेनं वाढत गेलं. तुझी ही राजमुद्रा लोककल्याणाच्या हेतूनं शोभिवंत झाली. तुझ्या राजकारणात परकीयांप्रमाणे स्वकीयांनी देखील तुझ्याशी शत्रुत्व केलं. पण प्रत्येक पाऊल विकासाच्या वाटेनं निर्धारानं तू टाकत राहिलास. स्वराज्य आणि सुराज्य ही दोन्ही ध्येयं तू गाठलीस.

हे छत्रपती युगप्रवर्तक शिवराया, तुझ्या भव्य जीवनातून आणि अलौकिक कर्तृत्वातून आजच्या राज्यकर्त्यांनी थोडी जरी प्रेरणा घेतली तरी हा भारतदेश पराक्रम आणि समृद्धी यांची शिखरं काबीज करू शकेल. शिवराया, स्वार्थभावनेनं पछाडलेल्या आमच्या तथाकथित लोकनेत्यांना सद्बुद्धी दे. राज्य करणे म्हणजे श्रींची सेवा करणे आहे हे त्यांना शिकव. तुझ्या महत्तम, गुणवंत, यशवंत, वरदवंत, व्यक्तित्वाला वंदन करून हा संवाद संपवतो.

●●●

# विद्येच्या क्षेत्रातली बांडगुळे !

महाराष्ट्रातल्या एका विद्यापीठाच्या इतिहास विभागात घडलेली एक लज्जास्पद घटना वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली वाचून एक सद्गृहस्थ मला म्हणाले, 'काय चाललंय हे आमच्या विद्यापीठांत ? एक प्राध्यापक आपल्या पीएच.डी. च्या विद्यार्थिनीवर बलात्कार करतो. यापेक्षा संस्कृतीला काळिमा लावणारी दुसरी घृणास्पद घटना काय आहे ? हे डॉक्टरेट मिळवलेले प्राध्यापक समाजात मोठे विचारवंत म्हणून मिरवतात. पाच आकड्यांचा पगार घेतात. स्वत:ला ब्रह्मदेवाचे बाप समजतात. आणि आपल्याच विद्यार्थिनीवर घृणास्पद अत्याचार करतात. असले प्राध्यापक म्हणजे विद्यापीठाला आणि आपल्या संस्कृतीला लागलेली कीड आहे. माझ्या हातात सत्ता असती तर याला जाहीरपणानं फटके मारले असते. विद्येच्या क्षेत्रात अनैतिकतेचा उकिरडा माजवणारे हे विद्यावंत काय शिकवणार ? ज्यांच्याकडून शहाणपणाच्या चार गोष्टी शिकाव्यात त्यांचं हे शहाणपण पाहून आमच्यासारखे फारसे न शिकलेले लोक अधिक चांगले म्हणायचे. पशूलाही शरम वाटेल अशा घटना शिक्षणाच्या क्षेत्रात घडतात. याबद्दल मी तुम्हाला जाब विचारायला आलो आहे.'

त्या गृहस्थानं माझ्यासमोर वृत्तपत्राचा अंक टाकला आणि आवेशानं म्हणाला, 'जाब द्या.' मी काय बोलणार ? प्राध्यापकवर्गाचा प्रतिनिधी म्हणून तो माझ्याकडं पाहत होता. यात त्याची चूक नव्हती. घडलेली घटना इतकी असंस्कृतपणाची होती की तिचं वर्णन करणारं एखादं अन्वर्थक विशेषण मला सुचत नव्हतं. त्यातून एका अध्यापकानं असलं कृत्य करावं हे विशेष दु:खदायक होतं. पीएच. डी. ची विद्यार्थिनी गुरूकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करते आणि गुरू तिला बळजबरीनं वाममार्गाकडं घेऊन जातो हा प्रकार कोणाचंही मन सुन्न करणारा आहे. माझ्या ओळखीचे ते सद्गृहस्थ तीव्रपणानं बोलले ते यथोचितच होतं. अन्याय पाहिल्यावर जो चिडत नाही तो माझ्या मते माणूसच नव्हे. आजूबाजूला दुर्गंध येत असताना कपाळाची तिडीक उठली पाहिजे. कुणीतरी उदात्त मूल्यांचे क्रूर लचके तोडत असताना निदान एखादी शिवी तरी संतापानं उच्चारता आली पाहिजे. पण

अलीकडं हे देखील घडत नाही. कोणी बंड करून उठत नाही. इतकं रक्त थंड का व्हावं ते कळत नाही. आम्ही वृत्तपत्रांतल्या असल्या संतापजनक बातम्या चहाचे घोट घेत घेत शांतपणानं वाचतो आणि मित्राला म्हणतो,

चालायचंच ! हे काही नवीन नाही. असे प्रकार नेहमीच घडतात. मनाला त्रास करून घेऊ नये. वाचावं आणि विसरून जावं. द्रौपदीचं वस्त्रहरण तटस्थपणानं पाहणारे आचार्य कौरवांच्या दरबारात होतेच. त्यांनी शब्दानेही विरोध केला नाही. कारण ते शहाणे होते. कुठं काय बोलावं आणि कुठं काय बोलू नये याचं त्यांना भान होतं. पण आज वृत्तपत्राचा अंक घेऊन माझ्याकडं आलेले ते सद्‌गृहस्थ बेभान झाले होते ते पाहून सारीच माणसं 'थंड' नसतात, काहींच्या रक्तात अन्यायाविरुद्ध उष्णता निर्माण होते, अजून समाज काही अंशानं जागा आहे याचं समाधान वाटतं.

त्या विद्यापीठीय विद्वानानं आपल्या विद्यार्थिनीच्या अगतिकतेचा असा गैरफायदा घ्यावा आणि स्वत:चा अध:पात करून घ्यावा हा शोचनीय प्रकार डोक्यातून लवकर जात नव्हता. एखाद्या बदमाष गुंडासारखं त्या अध्यापकाचं वर्तन होतं. त्या विद्यार्थिनीचा पीएच. डी. चा विषय 'अठराव्या शतकातील स्त्रियांची परिस्थिती' असा आशयाचा होता. २१ व्या शतकात त्या बिचारीला जो अनुभव आला तो मात्र तिच्या हळव्या मनावर आणि जीवनावर डागण्या देणारा होता. पीएच.डी. होण्याच्या इच्छेनं ती विद्यार्थिनी लेखन वाचन करीत होती. टिपणं काढीत होती. प्रबंधात येणाऱ्या विचाराबद्दल तिला मार्गदर्शकाबरोबर चर्चा करायची होती. पण स्वत: मार्गदर्शकच विद्यार्थिनीचा घात करतो आणि विद्यार्थिनीनं तक्रार केल्यानंतर हे माझ्या विरुद्ध केलेलं कारस्थान आहे असं सांगतो; हे सारंच धक्कादायक आहे. आपण ज्ञानाची आणि ज्ञान देणाऱ्या विद्यापीठाची अप्रतिष्ठा करीत आहोत ही जाणीवदेखील त्याच्या मनात निर्माण होऊ नये ही त्याची नव्हे तर संस्कृतीची शोकांतिका आहे. विद्येच्या वृक्षावर वाढलेली अशा प्रकारची बांडगुळं कितीतरी असतील. ज्यांनी संस्कृतीचं रक्षण करायचं त्यांनीच तिचं बिनदिक्कत वस्त्रहरण करायचं याला काय म्हणायचं ? मला बर्ट्रांड रसेल या तत्त्वचिंतक लेखकाचं आणि प्राध्यापकाचं एक अर्थपूर्ण विधान आठवतं. तो म्हणाला होता, 'कोणत्याही इतर समाजघटकांपेक्षा शिक्षक हा समाज आणि संस्कृती यांचा पालक आहे.' त्याच्या प्रज्ञेनं आणि प्रतिभेनं संस्कार उन्नत व्हावेत. मूल्यांची उंची वाढावी आणि माणूसपण अधिक समर्थ व्हावं ही भूमिका शिक्षकांनी पार पाडण्याचा प्रामाणिकपणानं प्रयत्न

केला पाहिजे. कारण शिक्षणाचं क्षेत्र स्वच्छ आणि पवित्र ठेवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. असं मानणाऱ्यांनी या क्षेत्रात पाऊल टाकावं. ही जबाबदारी केवळ शिक्षकांच्याच खांद्यावर आहे असं नाहीतर शिक्षणाशी संबंधित असलेल्या सर्वांवर हे उत्तरदायित्व आहे. आज साऱ्याच क्षेत्रांत मूल्यांची प्रचंड पडझड चालू आहे. हे लोण विद्यापीठापर्यंत पोहोचलं यात आश्चर्य नाही.

पीएच.डी. या पदवीचं अकारण प्रस्थ माजवून ठेवलेलं आहे. विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवणं ही प्रतिष्ठेची गोष्ट आहे. ज्ञानवंताला ही पदवी मिळाली पाहिजे हे मान्य करूनही मध्यंतरी महाराष्ट्राचे कुलपती आणि गव्हर्नर यांनी गेल्या पाच-दहा वर्षांत पीएच.डी. साठी मान्य झालेल्या प्रबंधांचं पुन्हा परीक्षण करावं असं गंभीरपणानं म्हटलं होतं. याचा अर्थ सारेच प्रबंध पदवीच्या योग्यतेचे नसतात असा नव्हे. पण येन केन प्रकारेण पीएच.डी. ही पदवी पदरात पाडून घेण्याच्या काही सवंग युक्त्या तयार होऊ लागल्या आहेत. एका पीएच.डी. झालेल्या प्राध्यापकाचं अभिनंदन करून मी त्याला विचारलं, 'आपण लेखनासाठी कोणते महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ वाचले होते ? एकदोन ग्रंथांची मला माहिती द्या. ते मला वाचायचे आहेत' प्रबंधलेखक गडबडले. एकाही ग्रंथाचं नाव त्यांना सांगता आलं नाही. फार काय प्रबंधाचं संपूर्ण शीर्षकही त्यांना आठवत नव्हतं. या चमत्कारानं मी चकित झालो. कदाचित लेखकाला विस्मरण झालं असावं असं मला वाटलं. पण माझ्या एका मित्रानं तो प्रबंध दुसऱ्याच एका अभ्यासकानं लिहून दिला आहे असं सांगितलं तेव्हा मात्र परमेश्वराचं स्मरण करीत 'देवा, तुझी लीला अगाध आहे' असं म्हणावं लागलं. ऑर्डरप्रमाणे प्रबंध लिहून मिळतात. ही शिक्षण क्षेत्रातली प्रगती आम्हाला माहीतच नव्हती. ते असो. माझा मूळ मुद्दा विद्यापीठात किंवा अन्य शिक्षणसंस्थांत जे गैरप्रकार घडतात त्यामुळं शिक्षण क्षेत्रात अनैतिकतेचा अधिकाधिक प्रवेश होण्याचा संभव आहे, याबद्दल सर्वांनी सावध राहिलं पाहिजे हा आहे. काही शाळा, महाविद्यालयांत आणि विद्यापीठातही अध्यापक मद्यपान करून वर्गात येतात अशीही वदंता अनेकांनी ऐकलेली असेल. त्याबद्दलही माझ्याकडं आलेल्या सद्गृहस्थांनी टीकाटीप्पणी केली. मी त्यांना खेदपूर्वक इतकंच म्हणालो की, 'हे सगळे प्रकार भयानक आहेत. परंतु सर्वच शिक्षक आणि प्राध्यापक यात सहभागी आहेत असा आपला गैरसमज झालेला दिसतो. सर्वांच्या वतीनं समाजाची क्षमा मागितली पाहिजे. आजच्या भोगलंपट वातावरणात सर्वच क्षेत्रांत अनैतिकतेची लागण थोडीफार होत असताना समाजानं

सावध राहिलं पाहिजे. एकदा अन्याय खपवून घेण्याची मुर्दाड सवय झाली म्हणजे ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत जाईल. संस्कृतीचं वस्त्र एकदोन ठिकाणी फाटलं असेल तर ते ताबडतोब शिवण्याची तत्परता घेतली पाहिजे. समाजाचं होणारं मानसिक अध:पतन रोखणारी शक्ती जोपर्यंत आपल्याला उभी करता येत नाही तोपर्यंत ही घसरण अशीच चालू राहाणार.'

स्त्रीच्या दुर्बलतेचा गैरफायदा सर्वच क्षेत्रांत स्वार्थी आणि कामांध प्रवृत्ती घेत असते. आपली मानसिक दुर्बलता सोडून स्त्रीशक्तीनं अन्यायाविरुद्ध प्रत्येकवेळी तुटून पडण्याचं ठरवलं तर अन्यायाची प्रवृत्ती पुष्कळअंशी कमी होईल. त्या दुर्दैवी विद्यार्थिनीला विद्येच्या वातावरणात देखील स्वच्छ मनाचा अध्यापक भेटू नये हे जितकं तिचं दुर्दैव आहे तितकंच ते आपल्या समाजाचंही दुर्भाग्य आहे. विद्येतून माणूस घडतो असं म्हटलं जातं. पण विद्येतूनच माणसांपेक्षा लांडगे आणि कोल्हे यांची निपज अधिक होऊ लागली तर आपलं जीवन आहे यापेक्षा कितीतरी पटीनं अधिक भयाण, अधिक निराशाजनक होत जाणार आहे. कधीकधी अशा घटना ऐकल्या किंवा वाचल्या म्हणजे मनात एकच विचार घोळत राहतो. माणूस अद्यापी 'माणूस' झालाच नाही. त्याच्या मनाच्या वारुळात वासनेच्या नागिणी फणा काढून उभ्या आहेत. संधी मिळाली की दंश करायला मागंपुढं पाहत नाहीत. पीएच.डी. चा अभ्यास करणारी ती विद्यार्थिनी या प्रकारामुळं उद्ध्वस्त होऊन जाईल. शिक्षणाची आणि सुखी जीवनाची स्वप्नं पाहत उमललेल्या त्या निरपराध स्त्रीला पुढचं आयुष्य जगणं तापदायक वाटेल.

सर्वच क्षेत्रांत सध्या असे असंस्कृत अधम प्रकार काही अंशी घडतात असं भगिनी वर्गाचं म्हणणं आहे. समाजात स्त्रीला मोकळेपणानं वावरता येऊ नये यापेक्षा अधिक लाजिरवाणी परिस्थिती कोणती असेल ? शील आणि चारित्र्य, सभ्यता आणि चांगली अभिरुची यांचा दुष्काळ पडलेल्या या जगात अब्रूनं कसं जगायचं ? आम्ही स्त्रियांनी विश्वासानं समाजात कसं वावरायचं ? आमच्या अब्रूचे लचके तोडणाऱ्या विषयांध प्रवृत्तीला जबरदस्त शिक्षा नि:पक्षपाती वृत्तीनं देणारं शासन निर्माण झालं आहे असं आम्हाला वाटत नाही. हा विचार एका भगिनीनं पोटतिडिकेनं बोलून दाखवला. तेव्हा त्यावर समाधानकारक उत्तर मी तरी देऊ शकलो नाही.

छत्रपती शिवाजी महाराज वयानं लहान होते. सतरा-अठरा वर्षांचं वय

असेल. एक गुन्हेगारी प्रकरण न्यायनिवाड्यासाठी आलं. महाराजांनी ते प्रकरण स्वत: हाताळण्याचं ठरवलं. गावच्या पाटलानं एका स्त्रीवर अत्याचार केला होता. पाटील मातब्बर होता. आजूबाजूच्या गावात त्याचा दबदबा होता. महाराजांनी 'पाटलाच्या मुसक्या बांधून आमच्यासमोर हजर करा' अशी आज्ञा देऊन सैनिकांना रवाना केलं. जेरबंद झालेल्या पाटलाला 'गुन्हा कबूल आहे का ?' असं विचारलं. सारे पुरावे तो गुन्हेगार असल्याचं सांगत होते. पाटलानं मग्रूरीनं कबूल केलं. महाराज त्याच्यावर विजेसारखे कडाडले आणि म्हणाले, 'तुमच्यासारख्या वडिलधाऱ्यांनी रयतेवर असा जुलूम केला तर आमच्या लेकी बहिणींनी कुणाच्या आधारानं जगावं? याचे दोन्ही हात तोडा. आमच्या आया-बहिणींची इज्जत लुटणाऱ्यांना आम्ही दया दाखवणार नाही.' हुकमाची अंमलबजावणी झाली. शिवाजी राजांना रयतेनं दुवा दिला.

आज गुन्हेगाराला वाचवणाऱ्या शक्ती बलवान होत आहेत. याचा परिणाम गुन्हेगारीत प्रत्यही वाढ होत आहे. सामान्य मनुष्य भयग्रस्त आहे. आणि गुंड बदमाश निर्भयपणानं वावरत आहेत. ही परिस्थिती आपणही बदलू शकतो. भयगंड सोडून स्त्री-पुरुष निर्भय बनले तर गुन्हेगारीला ओहोटी लागेल. संस्कृती आणि ज्ञान यांची केंद्रं स्वच्छ आणि शुद्ध ठेवण्यासाठी सरकारनंच नव्हे तर समाजानंही जागरूक राहिलं पाहिजे.

●●●

# जाऊनिया तीर्था तुवा काय केले ?

आमच्या शेजारी राहणारे जनार्दनपंत दर वर्ष सहा महिन्याला एखादी तीर्थयात्रा करून येतात. भारतातलं एखादंही तीर्थक्षेत्र आता त्यांनी शिल्लक ठेवलं असेल असं वाटत नाही. गृहस्थ मोठा भाविक आहे. अनेक संतांचे अभंग त्याला तोंडपाठ आहेत. परवा ते हरिद्वारहून परतले. गंगा नदीत त्यांनी स्नान केलं होतं. हरिद्वारचं वातावरण किती प्रसन्न आहे आणि तिथं गेल्यावर मनातली अध्यात्माची ओढ कशी वाढत जाते, याचं साद्यंत ०००००वर्णन त्यांनी केलं. शेवटी ते म्हणाले, 'तीर्थयात्रा केल्यानं आपल्या सांसारिक विवंचना नाहीशा होतात. गंगेन स्नान करताना माझ्या मनात विचार आला की, किती क्षुद्र गोष्टीत आपण स्वत:ला गुंतवून घेतो ! हा प्रपंच खोटा आहे. तो माणसाला नागवणारा आहे. त्याच्यापासून काही दिवस तरी अलिप्त व्हायचं असेल तर तीर्थयात्रेसारखं दुसरं औषध नाही. मी आत्तापर्यंत शेकडो तीर्थयात्रा केल्या. देवदेवतांची मंदिरं पाहिली. मन कसं आनंदानं भरून आलं. तुम्ही मात्र तीर्थयात्रेला जाण्याऐवजी कुठल्यातरी पिकनिकला चार उडाणटप्पू मित्रांबरोबर जाता. पत्ते खेळता. आणखी काय काय करता कुणास ठाऊक? यापेक्षा तीर्थयात्रेला जावं आणि शुचिर्भूत मनानं परतावं यासारखं सुख नाही.'

या आशयाचं त्यांचं भाषण मी बऱ्याच वेळा ऐकलं आहे. हे भाषण ऐकल्याशिवाय माझ्यासमोर चहा आणि फराळाचे पदार्थ येत नाहीत याची जाणीव असल्यामुळं जनार्दनपंतांच्या व्याख्यानाला न कंटाळता किंवा कंटाळलो आहे असं न दाखवता भरघोस प्रतिसाद देतो. काही वेळा, 'इतक्या तीर्थयात्रा करून तुम्ही भरपूर पुण्य संपादन केलं त्यातला थोडा वाटा आम्हां पामरांना द्यावा.' असंही स्तुतिपर बोलतो. त्याचा परिणाम साजुक तुपातला शिरा मिळण्यात होतो. आणि मग त्यांचं रटाळ प्रवचन ऐकून घेण्याच्या कष्टांचं चीज होतं. पण तीर्थयात्रेमुळं मनाला शांती मिळते असं ते वारंवार म्हणत असले तरी वेळी-अवेळी त्यांच्या घरातून भांडणाचे तीव्र पडसाद माझ्या अभ्यासाच्या खोलीपर्यंत येतात. इतक्या तीर्थयात्रा झाल्या तरी जनार्दनपंतांची भांडणाची मुळातच असलेली खुमखुमी अद्यापी कमी झाली नाही. ते बायकोबरोबर भांडतात, मुलांबरोबर भांडतात. भांडणासाठी एखादा

महत्त्वाचा विषय असला पाहिजे अशी त्यांची अट नसते. तीर्थयात्रा करणाऱ्या या 'तीर्थरूपांच्या' शिव्या ऐकून त्यांची दोन मुलं अत्यंत वैतागलेली आहेत. बायकोला नेहमी रागावणं हा त्यांच्या करमणुकीचा विषय आहे. दाराशी आलेल्या एखाद्या गरीब भिकाऱ्यालाही अर्वाच्य शिव्या देऊन घालवणं यातही त्यांना समाधान मिळत असावं. त्यांनी आपल्या बंगल्याचं नाव 'परमशांती' असं ठेवलेलं आहे. पण शांती कुठं अदृश्य झाली ते कळत नाही. जनार्दनपंतांचे व्यवहारही सरळ नसतात. एकेका पैशासाठी ते इतका वितंडवाद करतात की ऐकणाऱ्याला तो मानसिक छळ सहन होत नाही. मला प्रश्न पडतो तो हा की, भाविकतेनं तीर्थयात्रा करणाऱ्या या भक्ताच्या जीवनात कसलाही फरक का पडू नये ? तीर्थाटनामुळं मन प्रसन्न आणि शांत होतं असं सांगणारा हा माणूस नेमका विरोधी स्वभावाचा कसा आहे ? मग इतक्या केलेल्या तीर्थयात्रा फुकट गेल्या काय ? आमच्या पिक्‌निक्‌वर टीका करणारा हा माणूस पवित्र तीर्थस्थळांना सतत जाऊन देखील कोणत्याही अर्थानं बदलला नाही हा चमत्कार नव्हे का ?

संत तुकारामांचा एक मार्मिक अभंग मला आठवतो. ते म्हणतात,

जाऊनिया तीर्था तुवा काय केले ।
चर्म प्रक्षाळिले वरीवरी ॥
अंतरीचे शुद्ध कासयाने झाले ?
वृंदावनफळ घोळिले साकरा ॥
भीतरील थारा मोडेचिना ।
तुका म्हणे नाही शांती क्षमा दया ।
तोवरी कासया फुंदा तुम्ही ॥

जीवनाचं आणि मानवी स्वभावाचं सूक्ष्म निरीक्षण केलेले संत तुकाराम या अभंगातून माणसाच्या मनोवृत्तीवर भेदक प्रकाश टाकतात. तुकोबांचे शब्द खणखणीत असतात. आणि त्या शब्दांची चव झणझणीत असते. लक्षावधी माणसं तीर्थयात्रेला जातात आणि तिथं एखाद्या नदीत बुचकुळ्या घेतात. त्यामुळं फार तर अंगावरचं कातडं धुतलं जातं. मनाचा मळ मात्र आहे तसाच राहतो. अंग स्वच्छ, सुगंधी करणारे अनेक प्रकारचे साबण बाजारात मिळतात. मनाला स्वच्छता देणारा साबण मात्र जगाच्या बाजारपेठेत कुठंही उपलब्ध नाही. तुकारामांनी घेतलेला दृष्टांत अत्यंत अन्वर्थक आहे. कारल्याला साखरेत घोळलं तरी ते कडूच राहतं. त्याच्यात

तिळमात्रही गोडी येत नाही. जोपर्यंत शांती, दया, क्षमा हे भाव चित्तात नसतील तर तोपर्यंत ही तीर्थयात्रा निरर्थक आहे.

तीर्थयात्रा करणारे लोक जितके भारतात आहेत तितके कदाचित साऱ्या जगात नसतील. याचा अर्थ जगातल्या लोकांपेक्षा भारतीय लोक अधिक धर्मनिष्ठ आहेत आणि पवित्र नद्यांत स्नान केल्यामुळं ते अधिक पावन झाले आहेत असं म्हणता येईल काय ? तीर्थात स्नान केल्याचा परिणाम जनार्दनपंतांच्या स्वभावावर किंचितही झाला नाही. दुसरा प्रश्न असा उद्‌भवतो की मानसिक शांतीसाठी तीर्थयात्रे व्यतिरिक्त दुसरी साधनं नाहीत काय ? मी अनेक वेळा मित्रांसमवेत पिक्‌निक् म्हणून - आनंदाची सहल म्हणून दूरदूरच्या स्थळी गेलो आहे. एखादं टुमदार गाव असावं. हवापाणी स्वच्छ असावं. जवळच समुद्रकिनारा असेल तर दुधात साखर पडली. सागरांच्या लाटांचं नृत्य पाहत बसणं हा देखील मानसिक शांतीचा चांगला मार्ग आहे. समोर क्षितिजापर्यंत पसरलेला तो अथांग समुद्र आणि माथ्यावरचं निळंभोर आकाश, विश्वाच्या विराटतेची आणि सुंदरतेची ग्वाही देत असतं. चार निवडक रसिक मित्रांबरोबर आवडलेल्या कवितेच्या ओळी गुणगुणणं आणि त्यावर खोडकरपणाचं भाष्य करणं मला नेहमीच आनंदाचं वाटतं. देवमूर्तीचं मंदिरात जाऊन दर्शन घेणं यात आनंदाचा भाग आहे हे मी मान्य करतो. पण त्यापेक्षाही संध्याकाळच्या सुखद गारठ्यात एखाद्या नावेतून जलविहार करणं कदाचित अधिक आनंदाचं असतं.

देवाचं अस्तित्व तीर्थक्षेत्रातच असतं असं मला वाटत नाही. सागराच्या उचंबळत्या लाटेतून तो परमेश्वर दर्शन देतो. आकाशाच्या निळाईत, डोंगरदऱ्यात, खळखळणाऱ्या झऱ्यात आणि भिरभिरणाऱ्या वाऱ्यात परमेश्वर असतो. तीर्थक्षेत्रातही तो असतो पण तो पाहायला प्रामाणिक भक्तीचे डोळे असावे लागतात. माणसं केवळ उपचार म्हणून, कर्तव्य म्हणून किंवा व्रत म्हणून तीर्थाला येतात आणि हजेरी लावून जातात. मनानं तिथल्या वातावरणाशी कधी समरस होत नाहीत. एक कर्मकांड म्हणून काशीला किंवा रामेश्वराला जाणाऱ्या यात्रेकरूंना शारीरिक यात्रा घडते. मनाचा आणि भावनेचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

स्वामी विवेकानंदांचं एक मार्मिक वचन मला आठवतं, 'तासभर देवपूजा करीत बसण्यापेक्षा अर्धातास फुटबॉल खेळणं अधिक चांगलं.' या वाक्यातलं मर्म विचार करणाऱ्यांच्या लक्षात येईल.

जनार्दनपंतांची कोर्टकचेरीत नेहमी कामं असायची. त्यांची थोडी शेती होती. पण शेतीवरून अनेक वादविवाद व्हायचे. शेती पाहायला ठेवलेले शेतमजूर प्रामाणिकपणे काम करीत नाहीत ही त्यांची सतत तक्रार असायची. तर मालक आमच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. नेहमी शिव्या देऊन बोलतात ही सेवकांची तक्रार असायची. जनार्दनपंतांना आपल्या विशिष्ट स्वभावामुळं मानसिक समाधान मिळत नव्हतं. ते कधीतरी शांत मनानं ज्ञानेश्वरी वाचत आहेत किंवा भजनात रंगले आहेत असं दृश्य फार क्वचित दिसायचं. रामेश्वरापासून हिमालयापर्यंत असलेल्या अनेक तीर्थस्थळी जाऊन त्यांनी पूजा केली होती. गंगेत कित्येक वेळा स्नान केलं होतं. पण या तीर्थयात्रा त्यांना मन:शांती देऊ शकल्या नाहीत. खरं तर यात्रांच्या निमित्तानं देशातला विविधतेनं नटलेला विस्तृत प्रदेश त्यांना पाहायला मिळाला होता. खळाळणाऱ्या नद्या, उंच डोंगरावरची मंदिरं आणि तिथून दिसणारं सृष्टीचं नानारंगी सौंदर्य त्यांनी कधीच डोळभरून पाहिलं नाही. अशा सौंदर्याचं आणि रंगगंधांचं दर्शन माणसाच्या मनात विचार-भावनांचा एक आगळा सुगंध निर्माण करतं. प्रपंचातल्या विवंचना आणि अप्रिय गोष्टी विसरण्यासाठी हे तीर्थाटन खरोखरच उपयोगी पडलं असतं.

मीही एकदा हरिद्वारला गेलो होतो. गंगा नदीच्या शुभ्र पाण्याचा तो वेगवान प्रवाह दृष्टी खिळवून ठेवीत होता. आजूबाजूला पसरलेलं हिरवंगार वातावरण मनाला शांतीचे सूर ऐकवीत होतं. देवळं पाहताना त्यांची रचना, भिन्नभिन्न आकार आणि गाभाऱ्यातल्या मूर्तींच्या मुद्रेवरची गाढ प्रसन्नता यामुळं मन चकित होत होतं. ईश्वरत्वाचं अस्तित्व जाणवण्यासाठी आपल्या मनात देखील भक्तीचं काव्य असलं पाहिजे. ही भक्ती सांकेतिक स्वरूपाची नको. हरिद्वारसारख्या ठिकाणी आजपर्यंत असंख्य लोक येऊन गेले असतील. गंगेच्या प्रवाहात त्यांनी आपली दु:खं बुडवून टाकली असतील, बहुसंख्य लोकांना हे शक्य होत नाही. पण हळुवार मनाचे, रसिक वृत्तीचे, कितीतरी लोक अशा ठिकाणी येऊन तिथला आनंदाचा प्राणवायू आपल्या छातीत भरून घेऊन गेले असतील.

जनार्दनपंतांसारखी माणसं तीर्थयात्रा पायांनी करतात. त्यांच्या मनाला यात्रा घडतच नाही. खरं सांगायचं तर प्रत्येक माणसानं आपलं मन हे एक तीर्थक्षेत्र बनवलं पाहिजे. पण हे जमत नाही. दोन दिवस क्षेत्रावर राहायचं. रूढी म्हणून नदीत अंग भिजवायचं. मंदिरात जाऊन देवाचा जयजयकार करायचा. पुजाऱ्याशी थोडाफार

वादविवाद करायचा. आणि मिळेल त्या गाडीनं परत निघायचं. परतीच्या प्रवासात भांडणं करायची. कोणाशी तरी हुज्जत घालायची. कोर्टाची तारीख केव्हा पडणार आहे हा विचार घोळवीत घरी परतायचं. हीच तीर्थयात्रा !

तीर्थी धोंडा आणि पाणी ! देव रोकडा सज्जनी ॥

हे तुकोबांचं वचन व्यापक आणि उदार आहे. आपल्या हृदयाच्या तीर्थक्षेत्रातच विठ्ठलाची स्थापना करता आली तर जीवन कृतार्थ होईल. संत सावता माळी आपली कामं सोडून तीर्थयात्रेला कधी गेले नाहीत. 'कांदा, मुळा, भाजी हीच माझी विठाबाई' असं म्हणून त्यानं 'भक्तीचा मळा' फुलवला. आमच्या जनार्दनपंतांना सगळ्या यात्रा करून देखील हे शक्य झालं नाही. तीर्थक्षेत्रातले पुरोहित, पंडित, पुजारी आणि ज्योतिषी यात्रेकरूंच्या अज्ञानावर जगत असतात. खरं तर चरत असतात. लोकांचं अज्ञान हेच त्यांचं भांडवल असतं.

एकदा एका प्रसिद्ध तीर्थक्षेत्रातल्या मंदिरात गेलो असताना 'तिथं पंचवीस रुपये ठेवा', 'इथं दहा रुपये ठेवा.', 'इथं आशीर्वाद घेण्यासाठी पन्नास रुपये द्या.' असं सांगण्यात येत होतं. सांगण्यात देखील विनंतीचा सूर नव्हता. दरडावणी होती. लोक शक्य तितके पैसे ठेवीत देवापर्यंत पोहोचत होते. पैसे नसलेल्यांवर पुजारी खेकसत होते. देवदर्शन विकत देत होते. तीर्थक्षेत्र हा जणू देण्याघेण्याच्या व्यवहाराचा बाजार होता. या बाजारात कितीही फिरलं तरी मानसिक शांती कशी मिळणार ? मोठमोठी तीर्थक्षेत्रं व्यापाराची केंद्र बनलेली आहेत. 'भाव तिथं देव' ही म्हण बदलून 'बाजारभाव तिथंच देव' असं म्हणण्याची आपत्ती आली आहे. चतुर माणसांनी आपल्या व्यवहार कौशल्याच्या बळावर तीर्थक्षेत्रात देखील दलाल नेमून पैसा गोळा करण्याचा बाजार उभा केला आहे. देवाला देखील हा बाजार बंद करता येणार नाही. म्हणूनच तीर्थयात्रा करणाऱ्या लोकांना मला तुकारामांच्या शब्दांत प्रश्न विचारावासा वाटतो.

जाऊनिया तीर्था तुवां काय केले ?

●●●

# लेखकाचा धर्म

ज्ञानाची साधना करणं हा ज्यांचा धर्म बनलेला असतो असे ज्ञानोपासक कोणत्याही स्थितीत आपल्या धर्माचं पालन करीत असतात. मंडालेच्या अत्यंत उष्ण हवेत तुरुंगाच्या कोठडीतही लोकमान्य टिळकांनी आपला 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. वयाच्या पंधराव्या वर्षापासून गीतेतल्या तत्त्वविचारांचं ते चिंतन करीत होते. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी राजकारणाच्या धावपळीतही अभ्यास केला होता. मंडालेच्या तुरुंगातही त्यांची ही साधना चालूच राहिली. साठी उलटली होती. मधुमेहाचा त्रास वाढत होता. भविष्यकाळ अंधारलेला दिसत होता. पण या महान बंदिवानाच्या मनात आशेची ज्योत तेवत होती. गीतेतला कर्मयोगाचा संदेश स्पष्ट करून देशातलं निष्क्रियतेचं वातावरण नाहीसं करावं म्हणून त्यांनी त्या प्रतिकूल उष्ण वातावरणात ग्रंथ लिहायला सुरुवात केली. प्रज्ञेला आणि प्रतिभेला सामाजिक जाणिवेचं अधिष्ठान असलं म्हणजे कोणत्याही प्रतिबंधाला न जुमानता ध्येयवादी माणूस काय करू शकतो, याचं उदाहरण म्हणजे 'गीतारहस्य' या ग्रंथाची निर्मिती.

कित्येक लेखकांना सर्व साधनांची सुविधा असते. वर पंखा फिरत असतो. टेबलावर गरम कॉफीचा कप तयार असतो. शेजारी असलेल्या सुसज्ज ग्रंथालयातून संदर्भासाठी हवी तितकी पुस्तकं मिळू शकतात. 'पण सध्या मूड लागत नाही' म्हणून लेखन लांबणीवर पडत जातं. सगळी साधनं हाताशी असली तरी लेखनाची किंवा वाचनाची उर्मी प्रबल होत नाही. याचं कारण लेखकाच्या मनात विचारांची भट्टी पेटत नाही. लिहिलंच पाहिजे अशी जिवंत लहर जोपर्यंत उचंबळून येत नाही तोपर्यंत प्रतिभावंतांची प्रतिभादेखील मरगळलेलीच राहाते. टिळकांनी फारसे संदर्भग्रंथ हाताशी नसताना त्या कठोर तुरुंगवासात एका जगन्मान्य ग्रंथराजाची निर्मिती करावी याचं आश्चर्य वाटतं. लेखकाचं मन कोणत्यातरी उदात्त विचारानं भारलेलं असावं लागतं. टिळक म्हणाले होते, 'गुळगुळीत कागदावर लिहिलेले बुळबुळीत शब्द म्हणजे साहित्य नव्हे' साहित्याची एका अर्थानं ही नकारात्मक व्याख्या त्यांनी केली आहे. बुळबुळीतपणापेक्षा प्रखरतेवर आणि प्रवृत्तीवर त्यांनी अधिक भर देऊन साहित्याची निर्मिती केली.

लोकमान्य टिळकांप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यालाही सामाजिक हिताची, संघर्षपूर्ण विचारांची आणि नवनिर्मितीची मजबूत बैठक आहे. त्यांनाही साहित्यलेखनासाठी अनुकूल वातावरण आणि सुविधा मिळाल्या नाहीत. दलितांच्या मनांत क्रांतिविचारांच्या ठिणग्या पेरायच्या या भावनेनं झपाटलेली त्यांची लेखणी होती. अनेक सामाजिक चळवळी त्यांनी उभ्या केल्या होत्या. देशाच्या राजकारणातही त्यांचा वैचारिक प्रभाव वाढत होता. त्यांच्याविरुद्ध प्रतिकूल विचारांची वादळं उठत होती. पण आंबेडकरांची लेखणी आणि वाणी किंचितही विचलित झाली नाही. कर्मयोगाचा विचार हाच त्यांच्याही जीवनाचा धर्म बनलेला होता. लोकजागृतीसाठी लिहिलंच पाहिजे या जिद्दीनं, आग्रहानं ते अखंड लेखन करीत होते.

एका मुलाखतीत डॉ. आंबेडकर म्हणतात, 'पुस्तके लिहीत असताना वेळ कसा निघून जातो व दिवसांमागून दिवस कसे निघून जातात हे मला कळून येत नाही. माझं लिखाण चालू असताना माझ्या साऱ्या शक्ती एकवटलेल्या असतात. मी जेवणाची पर्वा करीत नाही. मी कधीकधी तर रात्रभर वाचीत लिहीत बसतो. मला त्यावेळी कधी कंटाळा येत नाही की थकवा वाटत नाही. पण काम संपवून हातावेगळे झाले की मी अत्यंत निरुत्साही व असंतुष्ट होतो. मला चार मुले झाली असती तरी जेवढा आनंद झाला नसता तेवढा मला माझं पुस्तक प्रसिद्ध झालं म्हणजे होतो.' (नवयुग - मुलाखत)

ज्ञानसाधनेला कोणतंही कुंपण अडवू शकत नाही. डॉ. आंबेडकरांना अडवणाऱ्या अनेक प्रतिकूल शक्ती त्यांच्याभोवती दंड थोपटून उभ्या होत्या. पण या भिंती त्यांच्या लेखनाची गती अवरुद्ध करू शकल्या नाहीत. मनाचा पीळ आणि विचारांचं बळ हेच विचारवंत लेखकाचं खरं भांडवलं असतं. टिळक - आंबेडकरांसारखे ग्रंथकार, 'मूड लागेल तेव्हा लिहीन' असं म्हणाले नाहीत. धारदार लेखणी आणि धारदार विचार यातूनच त्यांनी ग्रंथसंपत्ती निर्माण केली. हे दोघेही केवळ लिहिणारे लेखक नव्हते. नुसते पत्रकार नव्हते. राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रांना आकार देणारे दुर्दम्य प्रवृत्तीचे नेते होते. दोघेही आपल्या विरोधकाशी झुंजत राहिले. आजच्या परिस्थितीत असे निर्भय विचारांचे नेते आणि विचारवंत का आढळू नयेत हा एक यक्षप्रश्न आहे. कदाचित संकटातूनच या प्रकारचं कणखर नेतृत्व जन्माला येतं. ज्या काळातलं वातावरण मचूळ आणि शिळपट असतं त्या काळात कागद गुळगुळीत असला तरी शब्द मात्र बुळबुळीतच उत्पन्न होतात.

लेखकासमोर कोणत्यातरी भव्य आदर्शाचं कल्पनाचित्र उभं नसेल तर त्याची लेखणी खऱ्या सौंदर्याची निर्मिती करू शकणार नाही. मरगळलेल्या जीर्ण वातावरणाचा निरास करून समाजाच्या अंगोपांगांत नवचैतन्याची सळसळ निर्माण करण्याची धडपड करणारा कृतिवंत लेखक आजच्या परिस्थितीत पाहिजे आहे. असे लेखक आणि विचारवंत टाकसाळीतून काढता येत नाहीत, त्यांचा साचा तयार करता येत नाही. पण समाजमनात नवं नेतृत्व देणाऱ्या विचारवंताबद्दल ओढ निर्माण झाली पाहिजे. गोठलेले विचार आणि थिजलेल्या कल्पना, वठलेल्या आशा आणि स्वप्नशून्य दृष्टी घेऊन चालणाऱ्या समाजाला पुन्हा कसे जळजळीत कृतीचे विचारवंत कसे भेटणार ? आजची परिस्थिती तर भयानक आहे. प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचे विषारी जंतू पसरले आहेत. समाजमन लुळं पांगळं झालेलं दिसत आहे. शारीरिक रोगावरची अनेक औषधं तयार होत आहेत. त्या औषधनिर्मितीत सुद्धा भ्रष्टाचारी प्रवृत्तीची रोगट बीजं रुजलेली आहेत. आता विचारवंत लेखक कुठून आणायचे ? विचारवंत आणि कलावंत यांची आयात करता येत नाही. कारण ते कोणत्या तरी टाकसाळीतून उत्पन्न करता येत नाहीत. आज स्वतःला लेखक आणि विचारवंत म्हणवून घेणारे लोक पैशाला पासरीभर मिळतात. चार अक्षरं खरडली की आपण कालिदासाचे आणि शेक्सपिअरचे डायरेक्ट वंशज आहोत अशी भ्रांतिष्ट कल्पना ते करू लागतात.

परवा एक कवी भेटले. आपण एकटेच कवी आहोत. प्रतिभेचे सम्राट आहोत. बाकी कोणाच्या काव्यात रस नाही आणि कस नाही. असं आढ्यतेनं सांगत होते. सर्व रसिकांनी आपल्या कवितेला पसंतीची पावती दिली आहे असं त्यांनी मला सुनावलं. 'तुम्ही माझी कविता वाचाल तर पूर्वीचे राहणार नाही', असंही बजावलं. पण मला पूर्वीसारखंच राहायचं असल्यामुळं त्यांच्या कवितेच्या वाटेला मी गेलो नाही. दुसऱ्याची निंदा आणि टवाळी करण्यात रमलेला हा माणूस कसलं काव्य लिहू शकणार ? माझं काव्य वाचल्यावर ज्ञानेश्वर-तुकाराम सुद्धा आपला पराभव मान्य करतील. हे त्यांचं विनोदवचन ऐकून मला राग आला नाही. ज्ञानेश्वर तुकारामांच्या वतीनं मीच त्याला शरणचिठ्ठी लिहून दिली. कसलंही अध्ययन नाही. चिंतन नाही. समाजाविषयी लेशमात्रही प्रेम नाही. स्वार्थाच्या वर्तुळापलीकडचं जग माहीत नाही. असे लेखक-कवी काय करू शकणार ? पैसा आणि कीर्ती यांच्या मृगजळामागे धावत राहिलेले कित्येक लेखक मला माहीत आहेत.

सहज मनात विचार येतो. टिळकांनी गीतारहस्य कीर्तीसाठी लिहिलं काय?

आंबेडकरांचे ग्रंथ कीर्ती आणि संपत्ती यासाठी निर्माण झाले काय ? ही माणसं स्वत:साठी काही मिळवू इच्छित नव्हती. त्यांना समाजमन बदलायचं होतं. आपल्या विचारांशी अत्यंत प्रामाणिक राहणाऱ्या या विचारवंतांनी कधीही तडजोड केली नाही. संधीसाधू लोक तात्पुरत्या यशासाठी सुद्धा तडजोड करतात. डॉ. आंबेडकरांनी लाहोरच्या जातपाततोडक मंडळासाठी 'जातिनिर्मूलन' या शीर्षकाचं एक भाषण तयार केलं. संयोजकाकडं ते पाठवण्यात आलं. त्या भाषणात परंपरागत जातिव्यवस्थेवर त्यांनी कठोर वैचारिक प्रहार केले होते. संयोजकांना त्यातली विचारसरणी सौम्य करून पाहिजे होती. आंबेडकरांनी ही मागणी धुडकावून लावली. लाहोरचं भाषण त्यांनी रहित केलं. पण आपल्या विचारात कोणताही फरक होणार नाही असं कळवून टाकलं. जातिबद्ध समाजरचनेवर डॉ. आंबेडकरांनी केलेले आघात तर्कशुद्ध आहेत. जे आपल्या अंत:करणप्रवृत्तीला प्रशस्त वाटतं, ते ब्रह्मदेव आडवा आला तरी त्यापासून आपण विचलित होणार नाही, विचारभ्रष्ट होणार नाही ही निष्ठावान लेखकांची भूमिका असते. अशा लेखकांच्या मालिकेत आणखी काही विचारवंतांची नावं उल्लेखिता येतात.

विचारनिष्ठ लेखक आज अभावानं दिसतात, आपलं लेखन आणि आपले विचार बाजारभावानं विकणाऱ्या दुकानदार लेखकाबद्दल काय बोलावं ? टिळक आणि आंबेडकर या दोन लेखकांची उदाहरणं मी प्रातिनिधिक म्हणून घेतली. असे व्रतस्थ लेखक नाहीसे होणं ही समाजजीवनाची आज शोकांतिक झाली आहे.

वि. स. खांडेकर यांना आयुष्यातली शेवटची तीनचार वर्षं दृष्टिहीन अवस्थेत काढावी लागली. दृष्टी होती तेव्हाही ती बरीच क्षीण होती. पण सामाजिक जीवनाबद्दलचे विचार मस्तकात घोळू लागले की ते लेखनिकाला तासन्‌तास मजकूर सांगत असत. अंत:करणाची आणि बुद्धीची दृष्टी या लेखकानं सदैव जपून ठेवली.

साने गुरुजींनीही आपलं पुष्कळसं लेखन तुरुंगात केलं. तुरुंगाच्या भिंती त्यांच्या ध्येयवादाला अडवू शकल्या नाहीत. आजच्या लेखकांची मानसिकता बदलली आहे. ही जुनी उदाहरणं त्यांना मानवणारी नाहीत. लेखन हा बाजारात ठेवण्याचा माल आहे ही पूर्ण अर्थवादी वृत्ती बिंबल्यामुळं लेखकही साहित्याचे लहानमोठे व्यापारी बनले आहेत. अस्तंगत झालेला लेखकांचा तो ध्येयवाद पुन्हा आमच्या सामाजिक जीवनात केव्हा येणार याची आम्ही वाट पाहत आहोत.

●●●

# कुठे आहे तो देव ?

देव आहे का ? असलाच पाहिजे. कारण त्याच्याशिवाय हे जग सुरळीत चाललं असतं काय ? झाडाचं प्रत्येक पान त्याच्या इच्छेनं हालतं. फुलांत सुगंध तोच निर्माण करतो. त्याच्या आज्ञेनं सूर्योदय होतो. आकाशाची असीम निळाई ही त्याचीच किमया आहे. सागरावरची प्रत्येक लाट त्याच्या आदेशानं उचंबळत असते. पावसाच्या धारा पडल्या की जमिनीत पेरलेली बीजं अंकुरू लागतात. केवळ त्याच्याच इच्छेनं. वाळवंटाचं नंदनवनात रूपांतर करण्याची सुंदर शक्ती देवाच्याच हातात असते. त्याची इच्छा असेल तर मुक्या माणसाच्या जिभेवर सरस्वती नृत्य करू लागते. पांगळ्याच्या पायी बळ येतं आणि तो पर्वत देखील चढू शकतो. चंद्रकिरणांतून अमृत पाझरतं त्याच्याच कृपेनं. कळ्या फुलतात, पानं हिरवी होतात, शेतं पिवळी होतात, अंधारलेलं आकाश उजळण्यासाठी पहाट येते. बालकाच्या मुखावर हास्याचं चांदणं फुलतं. या सर्व घटनांच्या मागे देव उभा आहे. तोच तर गती देतो. जीवनाच्या चक्राला तोच शक्ती देतो, तोच भक्ती देतो. 'देव आहे का?' हा काय प्रश्न झाला ? प्रश्न विचारण्याची बुद्धी कुणी दिली ? देवानंच ना. सारे प्रश्न सोडवण्याची अलौकिक बुद्धी एकट्या परमेश्वरापाशीच आहे. तोच या जगाचं आदिकारण आहे.

साऱ्या जगताची आधारशक्ती देव हीच आहे. या कल्पनेवर कोट्यवधी लोक श्रद्धा ठेवतात. काय असेल ते असो. देवाच्या अस्तित्वावर माझा मात्र विश्वास नाही. कुणी म्हणेल, 'हा देखील देवाचाच खेळ आहे.' देवाच्या भक्तांना मी एक प्रश्न विचारतो, 'काय हो, सारं चराचर जगत ईश्वरानं निर्माण केलं म्हणता तर मग त्या ईश्वराला कोणी निर्माण केलं ?' या प्रश्नाचं उत्तर मला अद्यापी कोणी दिलं नाही.

एक पुराणिक म्हणाले, 'शान्तम् पापम् असा नास्तिकासारखा प्रश्न विचारू नये. देवावर अविश्वास दाखवला तर नरकाच्या वाटेनं चालावं लागेल. पण देवावर श्रद्धा ठेवली तर स्वर्गाची प्राप्ती होईल. तुम्ही शिकलेले लोक फार शंका - कुशंका विचारता. शंकेचा जन्म अश्रद्धेतून होतो. देवावर श्रद्धा ठेवा म्हणजे तो तुम्हाला साहाय्य करील. साऱ्या विश्वाचं लालनपालन करणाऱ्या परमात्म्याचं अस्तित्व तुम्ही

नाकारता. हे महापाप कुठं फेडाल ? कोणत्या जन्मात फेडाल ?'

ते पुराणिकबुवा माझ्यावर संतापले होते. त्यांनी मला नास्तिक आणि पातकी, ही विशेषणं दिली. मला 'शिव्या' देण्याची बुद्धी पुराणिकाला देवानंच दिली होती काय ? मी हसलो, नास्तिक मनुष्य हा पातकीच असतो, हे पुराणिकाचं मत चुकीचं होतं. ईश्वरवादी हिंदुधर्मात नास्तिकवादी, निरीश्वरवादी विचारांची एक धारा प्राचीन काळापासून वाहत आहे. सांख्य मताप्रमाणं ईश्वर हा पदार्थ अस्तित्वातच नाही. कपिल, कणाद व चार्वाक या विचारवंतांनी देव संपूर्णत: नाकारलेला आहे. जैन आणि बौद्ध यांना तर 'नास्तिकदर्शन' असं संबोधण्यात येतं.

परेमश्वर कोणत्याही तर्काच्या चौकटीत राहू शकत नाही. तर्क आणि बुद्धी यांना बाजूला सारल्याशिवाय देवाचं अस्तित्व मान्य करता येत नाही. तो म्हणे दयाघन आहे. तोच दु:खाचं हरण करतो. जीवमात्राचं संरक्षण करतो. अनेक धर्मग्रंथांत आणि पुराणांत देवाच्या दयाळूपणाच्या गोष्टी आढळतात. मग या दयाळू देवाच्या सृष्टीत विषमता, हिंसा आणि रक्तपात, अन्याय व अत्याचार या गोष्टी वैपुल्यानं का आढळतात ? दुबळे भरडले जातात. बलदंड सुखानं जगतात. नीतिमान लोकांना वनवास घडतो. दुर्योधन आणि दु:शासन मात्र आपल्या महालात ख्याली - खुशालीत नांदत असतात. प्रत्येक देशात निरपराधी माणसाचं रक्त सांडत असतं. इतिहासाच्या प्रत्येक पानावर निरपराध माणसाचे अश्रू आणि रक्त सांडलेलं आहे. सुसंगतीपेक्षा जगात विसंगती प्रचंड प्रमाणात दिसते. मरण स्वस्त झालं आणि जीवन मात्र महाग बनलं. याची जबाबदारी तो देव स्वीकारणार आहे काय ? दु:ख, दारिद्र्य, निराशा आणि लाचारी यांचं अत्यंत भेदक दर्शन पावलोपावली जगात घडतं ही ईश्वराचीच करणी आहे काय ? ईश्वर म्हणजे जर न्याय, प्रेम, माणुसकी आणि सुसंगती असेल तर याच गोष्टी जगात इतक्या दुर्मिळ का झाल्या ? देवालाही ही जागतिक परिस्थिती सुधारता येणार नाही हे माणसांना कळलं पाहिजे. कोणे एके काळी देव होता म्हणतात. म्हणून नीत्शे नावाचा एक तत्त्ववेत्ता म्हणाला, 'गॉड इज डेड् लॉंग ॲगो'. म्हणजे देवाला देवाज्ञा होऊन फार वर्षे उलटली. जसजसा विचार करावा तसतशी देवकल्पना विरळ होते.

देवदेवता म्हणे रक्तामांसाचा नैवेद्य भक्ताकडे मागतात. बोकडाचा बळी दिला की दैवत संतुष्ट होतं. जे दैवत विराट सामर्थ्याचं निधान असतं त्याला कोंबड्या आणि बकरी कशासाठी लागतात ? आणि ती दिली नाहीत तर तो म्हणे क्रुद्ध होऊन

घरं आणि गावं नष्ट करतो. मी श्रद्धाळू माणसांना सांगेन की असं मानून तुम्ही देवाचा अपमान करीत आहात. कोणता देव तुम्हाला बकऱ्याचा बळी मागतो ते सांगू शकाल का ? सर्वसमर्थ देव कोणाचाही बळी घेणार नाही. उलट बळी जाणाऱ्या निरपराध जीवाचं तो संरक्षण करील. जो कळ्यांची फुलं करतो तो प्रतिभावंत देव शेळ्या-मेंढ्यांचा प्राण कशाला घेईल ? आपल्याच मनातली राक्षसी आकांक्षा पुरी करण्यासाठी देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली माणूसच हे लाजिरवाणं हत्याकांड घडवून आणतो. टेंभुर्णीला एका बालकाचा बळी देण्यात आल्याची बातमी वाचली तेव्हा मी सुन्न होऊन गेलो. अजूनदेखील आपण क्रूर हिंसेच्या युगातून माणुसकीच्या युगाकडे येऊ शकलो नाही.

ही देवाचीच इच्छा आहे काय ? कोणत्या देवळात देव आहे ? तो असेल तर भक्तांनी दिलेला पंचपक्वान्नांचा नैवेद्य घेत बसणार नाही. तो असेल तर शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याच्या मुखात अन्नाचा घास भरवील. भर उन्हात पाणी मिळवण्यासाठी चारसहा मैलांची पायपीट करणाऱ्या आमच्या भगिनींची पाण्याची इच्छा तो पूर्ण करील. झोपडी-झोपडीतून पसरलेल्या भयाण दारिद्र्यावर उपाययोजना करील. उपाशी माणसांसाठी तो देव भाकरी बनून त्यांच्यासमोर उभा राहील. रुग्णांसाठी तो औषध होईल. वादळात घरटं उद्ध्वस्त झालेल्या पाखरांना तो आसरा देईल. नवी घरटी निर्माण करील. हे जोपर्यंत घडत नाही तोपर्यंत देव आहे का ? या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकणार नाही. खरंतर कुणीच देऊ शकणार नाही. प्राचीन काळापासून एक गृहीत धरलेली श्रद्धा. भाबडी श्रद्धा म्हणून जगानं ती स्वीकारली आहे. परमेश्वर आहे या गोड भ्रमात माणसं स्वत:चं काल्पनिक समाधान करून घेतात. वास्तवाला सामोरं जाण्याची शक्ती कुणातच नाही. देव मानणं हा एक बौद्धिक दुबळेपणा आहे असं मत अनेक विचारवंतांनी मांडलं आहे. ते खोडून काढणं अशक्य आहे.

मुंबईच्या टाटा हॉस्पिटलमध्ये एका रुग्णाला भेटण्यासाठी मी गेलो होतो. बालवयातच कॅन्सर झालेल्या निरागस बालकांनी असं कोणतं पातक केलं होतं की त्यांना कर्करोगानं आपल्या क्रूर पंजात ओढून घ्यावं ? त्यांच्या डोळ्यांत मूर्तीमंत मरणाची सावली पडली होती. ती कोवळी बालकं अत्यंत करुण दृष्टीनं पाहत होती. जीवघेण्या यातनांतून आम्हाला सोडवा हो, अशी मूक याचना करीत होती. त्यांच्या वेदना आणि त्यांचे अशरण चेहरे पाहून माझ्या छातीत एक हुंदका दाटून आला.

एका बालकाची आई स्फुंदत स्फुंदत म्हणाली, 'देवा, मायबापा कोणत्या गुन्ह्याबद्दल माझ्या बाळाला तू मरणाच्या दाढेत लोटलंस ? या बाळानं तुझं काय वाईट केलं ? हे हसणारं खेळणारं आमचं बाळ तू निष्ठुरपणानं घेऊन जाणार. मग आम्हाला तरी कशाला जिवंत ठेवतोस ? त्यापेक्षा माझा बळी घे. पण माझ्या लेकराला सोडव. आता त्याचे हाल पाहवत नाहीत.' जमिनीवर लोळण घेऊन ती माता आक्रंदत होती. पण त्या देवाला तिची दया येण्याचं चिन्ह दिसत नव्हतं. ज्याला पालनकर्ता म्हणायचं तोच तिथल्या अनेक बालकांच्या हत्येला कारणीभूत होणार होता.

रोगराई, महामारीची साथ, रेल्वेगाड्या आणि विमानं यांचे अपघात, प्रचंड भूकंप, दुष्काळ आणि महापूर या साऱ्या उलथापालथी घडवून आणण्यात त्या दयावान परमेश्वराला काय मौज वाटत असेल ती असो. तो ईश्वर असेलच तर तो दयामूर्ती नसून साक्षात् दैत्य आहे आणि विनाशाचा खेळ खेळण्यात तो रंगून गेला आहे. हेच म्हणणं अधिक तर्कशुद्ध ठरेल. भक्तांचाही छळ करणारा हा परमेश्वर कसा काय भक्तवत्सल ठरतो ? हे कळत नाही. परमेश्वर ज्ञान आणि प्रेम यांच्यातच सामावला आहे. तो एखाद्या मूर्तीत किंवा होमहवनात, जपजाप्यात, तीर्थयात्रेत, गंगास्नानात किंवा भजनपूजनात असू शकत नाही. माणसाच्या हृदयातच जी माणुसकीची भावना असते तिलाच मी देव म्हणतो. देव माणसात असेल. देवळात मात्र तो वस्ती करतो यावर माझा विश्वास बसत नाही. देव न मानणारी काही 'देवमाणसं' मी पाहिली आहेत. अपार वात्सल्यानं अपत्याची शुश्रूषा करणाऱ्या आईच्या डोळ्यांतल्या अश्रूंत देवत्वाचा साक्षात्कार होतो.

मी देव मानत नाही पण 'देवत्व' मात्र मानतो. दया, क्षमा आणि शांती, करुणा आणि प्रेम ज्याच्या अंत:करणात असेल त्या माणसाच्या ठायी 'देवत्व' असतं. असे देव आम्हाला निर्माण केले पाहिजेत. पुराणातल्या देवांच्या भाकडकथा जुन्या पुराण्या झाल्या. आता अन्यायाचा वणवा आपल्या अश्रूंनी विझवण्याचा प्रयत्न करताना स्वत:च होरपळून गेलेली माणसं हीच दैवतासमान मानली पाहिजेत. इथं देवदेवतांच्या जत्रा आणि यात्रा प्रचंड गर्दीनं ओसंडून वाहतात. जनतेचं शोषण करणारे, काळाबाजारवाले, अन्नात आणि औषधात भेसळ करणारे लोक देवाचं मंदिर बांधण्यासाठी लक्षावधी रुपयांचा दानधर्म करतात. यज्ञ करतात आणि आपला भ्रष्टाचाराचा धंदा अबाधित चालू ठेवतात. सुदाम्याचे पोहे खाणारा 'वत्सलदेव'

आणि शबरीची उष्टी बोरं खाणारा 'दयाळूदेव' फक्त पुराणात आहे. तो कधी कुणाला दिसला नाही. जो दिसत नाही, जो कधी भेटत नाही. ज्याचा कधीच शोध लागला नाही त्याचा निरंतर जयघोष करीत बसलेल्या श्रद्धाळू माणसांना काय म्हणावे ?

संत तुकारामांच्या शब्दांत सांगायचं तर रंजल्या - गांजल्यांना, अनाथ - अपंगांना जो अत्यंत आपुलकीनं पोटाशी धरतो - 'देव तेथेचि जाणावा'. अशा सज्जनांमध्ये खरं देवत्व नांदतं. संत एकनाथांनी तापलेल्या वाळवंटात रडणाऱ्या अस्पृश्य मुलाला परमवात्सल्यानं आपल्या खांद्यावर बसवलं आणि गावकुसाबाहेरच्या त्याच्या झोपडीत त्याला पोहोचवलं. याच नाथांनी तहानेनं व्याकुळ झालेल्या गाढवाच्या तोंडात रामेश्वरला नेण्यासाठी आणलेलं गंगाजल ओतलं. इथं खरा देवत्वाचा झरा झुळझुळताना दिसतो. शेंदूर फासलेल्या दगडाला देवकळा येत नाही. माणसाच्या हृदयातच देवमंदिर उभं असतं.

आपल्याही अंत:करणात देवत्वाची एक सतार झंकारत असते. ती मनापासून ऐकावी आणि ती सतार सदैव सुस्वरांनी बोलत राहावी हा प्रयत्न चालू ठेवावा. देव नाही म्हणूनच तो आपल्या मनातच साकार करण्याचा प्रयत्न करावा आणि हा प्रयत्न करताना आपणच देव व्हावं इतकंच मला सांगायचं आहे. कुठे आहे देव ? असा प्रश्न कुणी विचारला तर माझ्यातच तो सामावला आहे. मीच आहे परमेश्वर, असं म्हणता यावं.

●●●

# कालाय तस्मै नमः।

कवी भर्तृहरीचा एक प्रसिद्ध श्लोक - खरं तर त्याचे अनेक श्लोक सर्वप्रसिद्ध आहेत. पण हा श्लोक मला विशेष आवडतो. कालप्रवाहाची अखंडता आणि जीवनाची क्षणभंगुरता यावर कवीनं विदारक प्रकाश टाकला आहे. तो म्हणतो, 'ती रमणीय नगरी, तो महान राजा, ते राजमंडळ, विद्वानांची ती सभा, त्या चंद्रमुखी सुंदर तरुणी, तो बलिष्ठ राजपुत्रांचा समूह, स्तुतिस्तोत्रं गाणारे ते भाट हे सारं आता ज्याच्यामुळं केवळ स्मृतिशेष झालं आहे. त्या काळाला वंदन असो.' 'कालाय तस्मै नम:' असं म्हणून कवीनं श्लोकाचा शेवट केला आहे. हा श्लोक अगदी माझ्या जिभेवर आहे. आणि त्याहीपेक्षा तो मनात रुजून बसला आहे.

खरोखरच काळ हा सर्वसमर्थ असतो यात शंका नाही. तो होत्याचं नव्हतं करू शकतो. नंदनवनाला उजाड स्मशानभूमी बनवू शकतो. फुलांचं निर्माल्य करतो. मोठमोठी साम्राज्यं उलथून टाकतो. त्याच्या वेगवान प्रवाहांबरोबर असंख्य सम्राटांचे मुकुट वाहून गेले. विद्वानांच्या विद्वत्तेवर, रूपगर्वितेच्या तारुण्यावर आणि बलवंतांच्या प्रबलतेवर सहजपणानं विनाशाची आणि विध्वंसाची अक्षरं लिहिणारा हा काळपुरुष अजिंक्य आहे. त्याचा प्रवाह कुंठित करण्याचं सामर्थ्य प्रत्यक्ष परमेश्वरात तरी आहे काय ? रणांगणात ज्यांना पराजय माहीत नव्हता अशा असंख्य वीरांना निमिषात पराभूत करणारा हा काळ हे विध्वंसाचं एक अदम्य प्रतीक आहे. ज्यांच्या प्रतिभेला कल्पवेलींच्या फुलांचा सुगंध येत होता ते कालिदास, शेक्सपिअरसारखे कवी काळानं गिळंकृत केले. त्यांची काव्यनाटकं काळावर मात करण्याइतकी प्रभावी आहेत असं आम्ही कितीही आढ्यतेनं म्हणालो तरी आजतरी ती इतिहासाच्या पेटीत बंद झाली आहेत. आजच्या जगात क्वचित कुठं त्याचं स्मरण होत असेल पण विस्मरणाच्या घनदाट धुक्यात या प्रतिभासम्राटांना फेकून देणारा काळ हाच विजयी ठरला आहे.

भर्तृहरीचा हा श्लोक जेव्हा जेव्हा मला आठवतो. तेव्हा एक प्रकारच्या उदासीनतेनं मन झाकळून जातं. काल एका व्याख्यानात मी म्हणालो होतो, 'विज्ञानाचे पंख लाभल्यामुळं आजचा माणूस उंच गगनात भरारी घेऊ शकतो.

काळालाही जिंकण्याची क्षमता आजच्या बुद्धिमान माणसांत आली आहे. उन्मत्तपणानं वाहणाऱ्या काळाच्या प्रवाहाला अडवण्याची हिंमत आता आमच्यात आली आहे. काळ अडेल. आम्ही अडणार नाही. आता 'कालाय तस्मै नम:' म्हणण्याची गरज नाही. आता काळच म्हणेल 'मनुष्याय तस्मै नम:' श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. क्षणभर मलाही बरं वाटलं. सभेहून परत येताना माझं विधान मलाच टोचू लागलं. काळाला जिंकण्याची भाषा मी बालिश उत्साहानं उच्चारली खरी; पण सर्वस्पर्शी, सर्वसंहारक काळ कोणाला जिंकता येईल असं मला वाटत नाही. हा केवळ कल्पनेचा विलास आहे. मद्याच्या कैफात माणसं आपल्या पराक्रमाच्या खऱ्या-खोट्या (बहुधा खोट्या) गप्पा मारतात. तो 'एकच प्याल्याचा' प्रभाव असतो. तसंच शास्त्रज्ञानाची मदिरा झोकलेला माणूस काळाला बंदिस्त करण्याची भाषा बोलतो. पण ते व्यर्थ आहे.

कवी भर्तृहरीचे शब्द तर्कशुद्ध आहेत. एकापेक्षा एक धीर-वीर सम्राट आपल्या शस्त्रबलानिशी जगाच्या रंगभूमीवर नाचून गेले. त्यातल्या कित्येकांची नावं इतिहासाच्या पानांत वाचायला मिळतात. असंख्य वीरांची नावं केव्हाच पुसली गेली. पूर्णपुरुष श्रीकृष्णाचं दिव्य चरित्र मला आठवतं. कृष्णानं आपल्या बुद्धीतून आणि बाहुबलातून द्वारकेचं राज्य उभं केलं. गवळ्यांच्या पोरांबरोबर खेळणारा गोपालकृष्ण द्वारकेच्या सिंहासनावर बसला. सारं भारतवर्ष त्याला वश झालं होतं. त्याच्या पराक्रमाचे पोवाडे शत्रूसुद्धा गात होते. अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करून आणि कौरवांना कंठस्नान घालून तो रथ हस्तिनापूरच्या सिंहासनापर्यंत नेऊन त्यावर धर्मराजाला अधिष्ठित करण्याचं श्रेय कृष्णाच्याच पदरात टाकलं पाहिजे. श्रीकृष्ण या नावाभोवती झगझगीत, प्रकाशाचं वलय होतं. पण तो कृष्ण कुठं आहे ? 'गीता सांगणारा तत्त्वज्ञ कृष्ण, युद्ध जिंकून देणारा मुत्सद्दी कृष्ण, भारताच्या भक्तीचा अनन्यसाधारण विषय झालेला कृष्ण, त्याचं काय झालं ? सारं यादवकुळ यादवीमध्ये उद्ध्वस्त झालं. यादवांचा अध:पात समर्थ कृष्णाला थांबवता आला नाही. द्वारका डोळ्यांदेखत जळून गेली. भर्तृहरीच्या श्लोकात 'सा रम्या नगरी' असा सुरवातीलाच उल्लेख येतो. ही रम्या नगरी कृष्णाची द्वारका असू शकेल. रावणाची लंकाही असेल. किंवा रामाची अयोध्याही असण्याची शक्यता आहे. एकेकाळची वैभवसंपन्न रोमनगरी किंवा अथेन्सही असू शकेल. आज त्यांची काय स्थिती आहे ? निराश झालेला श्रीकृष्ण वनात एका झाडाखाली पहुडला होता. दुरून एक बाण वेगानं

येऊन त्याच्या शरीरात घुसला आणि द्वारकाधीश श्रीकृष्ण तिथंच निजधामाला गेला. मरतेवेळी या चक्रवर्तीच्या तोंडात पाण्याचा थेंबही घालायला कोणी जवळ नव्हतं. म्हणूनच तर 'कालाय तस्मै नमः।' असं म्हणणंच भाग आहे. काळाला जिंकण्याची भाषा हे अतिशयोक्ती अलंकाराचं सुंदर उदाहरण आहे. कधी कधी तोंडाला चव यावी म्हणून माणसानं अतिशयोक्तीपूर्ण बोलायला हरकत नाही. म्हणूनच त्या सभेत मी तसं बोललो होतो.

काळाचं एक वैशिष्ट्य मला आवडतं. तो पक्षपात करीत नाही. राम-कृष्णासारखे, विवेकानंद, फुलेसारखे, टिळक-गांधीसारखे महात्मे असोत किंवा दुर्योधन-दुःशासनासारखे, नादिरशहा, हिटलरसारखे दुरात्मे असोत तो सर्वांकडे समदृष्टीनं पाहतो. एखादा क्रूरकर्मा राजा प्रजेवर अत्याचार करू लागला म्हणजे दुबळे लोक समाधानासाठी म्हणतात, 'सध्याचा काळ कठीण आहे. पण चांगला काळ आल्याशिवाय राहणार नाही. काळ केव्हातरी या सुलतानी प्रवृत्तीचं राज्य नाहीसं करील.' आणि तसंही घडून येतं. कित्येक सिकंदर आले. जगज्जेते झाले पण ते कालविजयी ठरू शकले नाहीत. सिकंदराचाही घास काळानं सहजपणानं घेतला. युगं आली आणि उलटून गेली. काळावर आपल्याला स्वार होता येईल का ? या प्रश्नाचं उत्तर मिळवलं पाहिजे. नुसती काळाची भाटगिरी करण्यात जर आम्ही गढून गेलो तर या काळाला कुणीच वेसण घालू शकणार नाही. तो साऱ्यांचा म्हणजे केवळ माणसांचा नव्हे तर साऱ्या उदात्त मूल्यांचाही चेंदामेंदा करीत बेहोष नाच करीत राहील. काळालाही भय निर्माण व्हावं असा बलिष्ठ हात निर्माण करता आला पाहिजे. हा विचार वरवर वेडेपणाचा वाटतो. पण त्यात आंतरिक सुसंगती आहे.

महाभारतात असा उल्लेख आहे की युधिष्ठिरानं एका ज्ञानवंत ऋषीला प्रश्न विचारला, 'हे पूज्य ऋषिवर्य, काळ राजाला घडवू शकतो का राजा काळाला आकार देऊ शकतो ? या प्रश्नाचं मला आपल्याकडून उत्तर पाहिजे आहे. काळच समर्थ व्यक्तीला घडवीत असतो. असं वाटतं.'

ऋषी म्हणाले, 'राजा, तुझी शंका बरोबर नाही. 'राजा कालस्य कारणम्' हेच माझं उत्तर आहे. काळ समर्थ आणि सर्वभक्षी असेल पण पराक्रमी व्यक्ती त्याचा प्रवाह बदलू शकते. जुन्या काळाचा अंत करून नवं युग निर्माण करण्याची हिंमत बलवंतांच्या बाहूत असते.'

हे उत्तर आशावादाचं द्योतक आहे. प्रयत्नाला आणि पुरुषार्थाला त्यातून

चालना मिळते. इतिहासाची पानं चाळून पाहिली तर चाणक्यासारखा एक बुद्धिप्रतापी ब्राह्मण नंदवंशाचा उच्छेद करून चंद्रगुप्त मौर्याला सत्ताधीश बनवतो. नंदाला अनुकूलं असलेला काळ चाणक्याच्या पुरुषार्थामुळं मागे हटला. युगान्तर झालं. चंद्रगुप्तानंही शौर्यानं राज्याचं साम्राज्यात रूपांतर केलं. मौर्यांची राजवट नव्या युगानं उचलून धरली. लहरी काळाला वळवावं लागतं. त्याच्या पाठीवर चाबकाचे आघात करून त्याला पळवावं लागतं. जोपर्यंत काळरूपी घोड्याचा लगाम आपल्या हातात आहे. तोपर्यंत काळ शूरांची चाकरी करीत राहातो. पण केव्हातरी लगाम ढिला पडतो आणि मग तो नाठाळ घोडा पाठीवरील स्वाराला फेकून देतो. पण काही काळ तरी काळपुरुषाला आपल्या हुकूमाचा ताबेदार बनवता येतं. रामायण महाभारतात हेच घडलं आहे. रावणाचा दास बनलेल्या काळानं पुरुषोत्तम रामासमोर लोटांगण घातलं. रावण संपला. रामराज्य उदयाला आलं. अंतिम विजय काळाचा असतो हे मान्य केलंच पाहिजे. कारण तो सृष्टीचा क्रम आहे.

'Time is a flowing river, happy those who allow themselves to be carried unresisting with the current' ख्रिस्तोफर मोर्ले याचं हे विधान आहे. काल ही एक वाहती नदी आहे. जे तिच्या प्रवाहाबरोबर प्रातिकार न करता वाहत जातात ते सुखी, असं त्याचं म्हणणं आहे. पण याचा अर्थ प्रवाहाबरोबर अगतिकपणानं वाहत जावं हे मात्र कोणीही महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी माणूस मान्य करणार नाही. कार्ल-मार्क्सनं लंडनच्या ग्रंथालयात बसून आपला जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. जागतिक अर्थविचाराला आणि कामगार चळवळीला त्याच्या ग्रंथानं नवं वळण दिलं. कष्टकऱ्यांच्या पायातल्या गुलामगिरीच्या बेड्या गळून पडू लागल्या. एक नवा काळ त्यानं जन्माला घातला. जगात सर्वत्र या काळानं क्रांतीची तुतारी फुंकली. पण परिस्थितीबरोबर, वातावरणाबरोबर जुन्या समजुतीच्या काळाबरोबर त्याला अखंड संघर्ष करावा लागला. ग्रंथलेखनाच्या काळात त्याचं मूल औषधासाठी पैसा नसल्यानं तडफडून मरण पावलं. मार्क्सलाही पोटभर अन्न नव्हतं. कुटुंब उपवासात दिवस काढत होतं. भुकेनं व्याकुळ झाला तरी हातातली लेखणी त्यानं सोडली नाही. नव्या विचारांचे उष्ण वारे त्याच्या डोक्यात वाहत होते. तो प्रतिकूल काळाला न जुमानता झगडत होता. झगडणाऱ्याला काळ वश होतो. इतिहासाची आणि संस्कृतीची रचना करणारे लोक काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्या काळाच्या कपाळावर आपल्या पुरुषार्थाची अक्षरं लिहून गेले.

ती शेकडो वर्षं काळाला पुसता येणार नाहीत. इथं मात्र माणसाच्या जिद्दीला, जीवनेच्छेला आणि क्रांतिकारक विचाराला काळपुरुष वंदन केल्याशिवाय राहणार नाही.

काळ आणि समुद्राच्या लाटा कुणासाठी थांबत नाहीत. अशी एक म्हण आहे. याचा अर्थ तो माणसापेक्षा अधिक सामर्थ्यवान असतो असाच केला पाहिजे वेगानं धावणारा काळ आपल्या पावलांचा आवाज करीत नाही. तो त्वरेनं निघून जातो. बालपण कधी संपलं कळत नाही. तारुण्य येतं न येतं तोच ते पुढं निघून जातं. चोरपावलानं म्हातारपण येतं. आपण वृद्ध झालो हे कबूल करायला देखील माणूस तयार होत नाही. क्षणाक्षणानं वय वाढतं. पण वाढतं वय चोरण्याची आणि लपवण्याची मनुष्य तयारी करीत असतो. पांढऱ्या केसाला काळा रंग दिला म्हणून म्हाताऱ्या मनाचा रंग बदलत नाही. सौंदर्यप्रसाधनं वापरून म्हातारपणाला पळवून लावता आलं असतं तर ती प्रसाधनं बनवणारे कारखानदार चिरतरुण राहिले असते. होरॅसनं म्हटलं आहे, 'आपलं बोलणं चालू असतानाच हा मत्सरी काळ पलायन करतो. त्याचं पलायन ध्यानातही येत नाही. म्हणून काळाच्या गतीचं आणि सामर्थ्याचं नीट आकलन करून घेतलं पाहिजे. आज शत्रूसारखा वागणारा काळ मित्रासारखा उद्या उपयोगी पडू शकेल याचं अवधान समयज्ञ लोक नेहमी ठेवीत असतात. योग्य काळ येताच शमी वृक्षाच्या ढोलीत ठेवलेली आपली शस्त्रं पांडवांनी काढून घेतली आणि युद्ध जिंकलं. समर्थ रामदासांनी,

'धीर्धरा धीर्धरा तकवा
हडबडू गडबडू नका'

असं म्हटलं आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रात या विचाराची प्रतीती येते. बदलत्या काळाचं भान ज्याला असतं तोच यशस्वी होतो.

प्रसिद्ध नाटककार भवभूती याच्या नाटकांची त्याच्या काळात उपेक्षा झाली. हे शल्य त्याला टोचत होतं. पण कालांतरानं लोक आपल्या नाट्यकृती मस्तकावर घेतील. काळ बदलताच अभिरुचीतही स्थित्यंतर होईल याची त्याला कल्पना होती. म्हणून आपल्या टीकाकारांना उद्देशून तो म्हणाला, 'तुमच्यासाठी माझा प्रयत्न नाही. माझा 'समानधर्मा रसिक' मला कुठेतरी भेटेलच. कारण पृथ्वी मोठी आहे आणि काळ अनंत आहे.' संस्कृत साहित्यात कालिदासाच्या बरोबरीनं भवभूतीचंही नाव रसिक आनंदानं घेऊ लागले. हा काळाचा महिमा नव्हे का ?

नाटकाला आलेल्या प्रेक्षकांची घोडी सांभाळणारा शेक्सपिअर रंगभूमीवर सम्राटाच्या ऐटीनं उभा राहिला. यालाही काळच कारण आहे. 'राजा कालस्य कारणम्' हे वचन जितकं तर्कशुद्ध तितकंच 'कालाय तस्मै नम:।' हे सुभाषित देखील सयुक्तिकच म्हटलं पाहिजे. सुखाचा काळ जसा संपतो तसे दु:खाचे दिवसही संपून जातात.

रामसीतेसारख्या वनवासी पाखरांना वनवास अधिक प्रिय झाला. राजप्रासादात सत्ता होती. संपत्ती होती. सेवक-सेविका हात जोडून उभ्या होत्या. पक्वान्ने होती. मृदुमृदुल शय्या होती. पण तरीही वनवासातला सकाळ-संध्याकाळी पक्ष्यांचा कलरव ऐकताना, झऱ्याची झुळझुळ ऐकताना आणि वाऱ्याबरोबर वृक्षांच्या पानांची सळसळ अनुभवताना जो आनंद व्हायचा त्याची अनुभूती राजवाड्यातल्या गीतगायनातून येत नव्हती. सृष्टीच्या अंगोपांगावर भिन्न भिन्न ऋतूंचं जे सौंदर्य वनात दिसत होतं. त्याचं रोमांचित करणारं दर्शन जनात मात्र होत नव्हतं. वनवासी जीवनाची चित्रं एका चित्रकारानं कुशलतेनं रेखाटली. तो चित्रपट पाहाताना रामसीता पुन:प्रत्ययाच्या आनंदानं व्याकुळ झाले. माथ्यावरचं निळं आकाश, वेगानं वाहणारी नदी, वनात फुललेली फुलं, त्यांचा तो मत्त सुगंध, तो आनंद इथं नव्हता. रामाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. आणि तो सीतेला म्हणाला, 'ते हि नो दिवसा गता:।' 'अरे, ते दिवस पाखरासारखे उडून गेले. वाऱ्याबरोबर आले आणि वाऱ्याबरोबर नाहीसे झाले.'

काळ बदलला होता पण हा बदललेला काळ राजा रामाला आणि राणी सीतेला फारसा सुखावह झाला नाही. काळ बदलत असतो आणि बहुधा तो आपल्यातही बदल घडवून आणतो. काळ हा जादूगार आहे. तो कळीचं फूल करतो. आणि दुसऱ्याच क्षणी फुलाचा पाचोळा करतो. म्हणून म्हणतो. काळाशी संवाद साधावा. भर्तृहरीच्या शब्दांत सांगायचं तर 'कालाय तस्मै नम:।'

●●●

# सूर्यावर थुंकणारे अतिशहाणे

महापुरुषांच्या प्रतिमेवर चिखलफेक करणारे काही महाभाग असतात. या नतद्रष्ट लोकांना कुणाचंही माहात्म्य सहन होत नाही. एखादा चारित्र्यसंपन्न तपस्वी दिसला की तो कसा चारित्र्यहीन, दांभिक आहे हे सिद्ध करण्यासाठी यांची तर्कबुद्धी तल्लख होते. शीलवती आणि पतिव्रता म्हणून एखाद्या स्त्रीला लोकमनात आदराचं स्थान असलं की ती शीलवती कशी व्यभिचारिणी आहे हे सांगण्यासाठी यांची जीभ वळवळू लागते. आजपर्यंत अशा दुर्जनांनी प्रत्येक श्रेष्ठ व्यक्तीचं चारित्र्यहनन केलं आहे. सुंदरता दिसली, शुद्धता आढळली की यांच्या मनात मळमळू लागतं. ही एक प्रकारची भयानक मानसिक विकृती आहे. अशा विकृत लोकांना आपण काय करणार ? परमेश्वरानं यांच्या मस्तकाची कवटी उलटीच बसवली असली तर त्याला ते तरी काय करणार ? आजपर्यंत ज्याची निंदानालस्ती झाली नाही अशा एखाद्या महापुरुषाचं नाव मला तरी आठवत नाही. जगाची रीत उफराटीच असते. माणूस जिवंत असेपर्यंत त्याची उपेक्षा करायची आणि तो मरण पावला की त्याच्या ताटीवर फुलं उधळायची या विपरीत कृतीला काय म्हणावं ?

मला आठवतं, एका मंदिरात राहणाऱ्या एका तपस्व्यावर एके दिवशी दोनचार गुंड लोक दगडधोंड्यांचा वर्षाव करीत होते. एक गुंड म्हणाला, ‘हा ढोंगी संन्याशी आहे. दिसायला सोज्ज्वळ दिसतो. पण दर्शनासाठी आलेल्या बायकांना बारीक दृष्टीनं न्याहाळीत बसतो. याची लक्षणं आम्हाला चांगली दिसत नाहीत. एक दिवस कुठल्यातरी बाईला हा गोसावडा पळवून नेईल. असलं पाप आपल्या गावात नको म्हणूनच आम्ही या साधूला गावाबाहेर घालवून देणार आहोत.’ तो साधूपुरुष अत्यंत शांत स्वरात म्हणाला, ‘मंदिरात येणाऱ्या भगिनींची हे दोनचार तरुण कुचेष्टा करीत बसतात. त्यांनी तसं करू नये म्हणून मी त्यांना समजावून सांगितलं. पण त्यांनीच उलट माझ्यावर प्रहार केले. माझी त्याबद्दल तक्रार नाही. पण आपल्या मायबहिणींचा त्यांनी छळ करू नये इतकीच माझी विनंती आहे.’ साधूच्या बोलण्यात सत्य होतं. दोनचार गुंड तरुणांचं एक टोळकं मंदिराच्या दारात उभं राहून मुलीबाळींची हीन कुचाळकी करीत राहायचं. आपल्या, आचार विचाराला

प्रतिबंध करणारा हा साधू त्यांच्या डोळ्यांत खुपू लागला. त्याच्यावरच वाटेल ते आरोप करून त्या गुंडांनी साधूला मंदिर सोडायला भाग पाडलं. गावातले लोक या प्रकाराकडं उदासीनतेनं पाहत होते. गुंडांच्या कानाखाली कोणीतरी आवाज काढला असता तर त्या असंस्कृत प्रकाराला निश्चित आळा बसला असता. पण सज्जनांची संघटना होत नाही. दुर्जन मात्र संघटनेच्या बळावर नेहमीच नंगानाच घालतात. हा इतिहास आहे. माझी टीका थोडी वेगळ्या प्रकारची आहे. महान व्यक्तींच्या महनीयतेला जाणूनबुजून छेद देणारी, अपशकुन करणारी रोगट प्रवृत्ती समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे.

सीतेच्या धवल चारित्र्याविषयी एका सामान्य माणसानं काही आक्षेपार्ह उद्‌गार काढले. त्या उद्‌गारातली धग पसरत गेली आणि एक दिवस राजा रामचंद्राच्या राजसभेतलं वातावरण गरम झालं. लोक कित्येक वेळा किती हलक्या कानाचे आणि हलक्या बुद्धीचे असतात याची प्रतीती येते. आपण कोणाची निंदा करीत आहोत याचं भानही अशावेळी बेभान झालेल्या लोकांना राहत नाही. चारित्र्याविषयीची निराधार अफवा सीतेचं जीवन उद्‌ध्वस्त करणारी ठरली. मत्सरी आणि मूर्ख लोकांच्या जगात वावरणं हाच एक अपराध असतो.

संत तुकारामांच्या सभोवताली त्यांचे कुटाळ निंदक वावरत होते. कित्येकांनी तर तुकोबांनी कीर्तनात म्हटलेला अभंग आपल्या नावावर खपवून आपल्या कवित्वाची जाहिरात केली. तुकोबा हे सर्व पाहत होते. हितशत्रू वेगवेगळ्या प्रकारांनी त्यांना छळत होते. आज या प्रकाराबद्दल विचार करताना इतकंच म्हणावंस वाटतं की साधूंच्या साधुत्वाचा, वीरांच्या वीरत्वाचा आणि प्रज्ञावंतांच्या ज्ञानाचा सुगंध सहन न होणारी रोगट माणसं जगात असतात. सूर्य उगवलेला पाहताच त्याच्यावरही थुंकणारे दुरात्मे असतातच. पण त्यांच्या थुंकण्यानं सूर्याची प्रभा मलिन होत नाही. थुंकणाऱ्याचं तोंड मात्र केवढ्या दुर्गंधीनं बरबटलेलं आहे हे स्पष्ट होतं. आता यातही काही लोकांना भूषण वाटत असेल तर त्यांचा मूर्खपणा पाहून आपण करमणूक करून घ्यावी. ते मूर्ख आपल्या स्वभावधर्माला अनुसरून वागतात. संत तुकारामांचाच एक प्रसिद्ध अभंग आहे.

पतिव्रतेची कीर्ती वारवाणिता। सिंदळीचा माथां तिडिक उठे।
आमुचे ते आहे सहज बोलणे। नाही विचारून केले कोणी॥

पतिव्रतेची स्तुती सिंदळीला ऐकवत नाही. त्याला काय करायचं ? ती

पतिव्रता कशी नाही यासाठी काही बाजारगप्पा पसरवून द्यायच्या आणि त्या केविलवाण्या समाधानात राहायचं हीच त्यांची मर्दुमकी. कदाचित असल्या निराधार भ्रांतिष्ट अफवा पसरवण्याच्या कृत्याला काही लोक 'इतिहाससंशोधन' असंही म्हणत असतील.

इतिहास म्हणजे वीरांची कथा. इतिहास म्हणजे शूरांनी आणि ज्ञानवंतांनी आपल्या पराक्रमावर केलेली नवरचना. आम्ही इतिहासाचा हाच मुख्यार्थ लक्षात घेतो. वीरपुरुष इतिहासाच्या प्रवाहाला गती देतो. त्या प्रवाहात चैतन्य ओततो. कोणी आपल्या समशेरीच्या टोकानं नवजीवनाची मंत्राक्षरं लिहितो. कोणी धर्माच्या, कोणी ज्ञानाच्या तर कोणी राष्ट्राच्या जीवनात नव्या युगाचा प्रकाश पेरतो. इतिहास घडवणारे सबळ आणि सुसंस्कृत हात जोपर्यंत आहेत तोपर्यंत नवनिर्मिती होत राहील. पण असं नवयुग निर्माण करणाऱ्या सूर्याला दोष देणारी, त्याची निंदा करणारी आणि अंधारातच सुखानं राहणारी काही दयनीय घुबडं असतात. ते प्रकाशाशी वैर करतात. अंधाराशी त्यांची घनिष्ठ मैत्री असते. या प्राण्यांनी इतिहास लिहिण्याचा आव आणला तरी त्याला इतिहास म्हणता येईल काय ?

मी छत्रपती शिवाजी महाराजांच्याविषयी काही प्रसिद्ध इतिहासकारांचे ग्रंथ वाचले आहेत. ते ग्रंथ वाचल्यावर शिवाजी महाराजांविषयीच्या माझ्या अभिमानाला अधिकच बळकटी मिळाली. महापुरुषाला त्याचे भक्त देव्हाऱ्यात बसवतात हे भावनेच्या दृष्टीनं सयुक्तिकच आहे. पण शिवाजीसारख्या युगपुरुषाच्या प्रतिमेवर चिखलफेक करून कोणी हाच इतिहास आहे असा आग्रह धरू लागला तर त्याच्या रोगटपणावर आणि अज्ञानावर प्रहार करायला इतिहाससंशोधकांनी पुढं आलं पाहिजे. विचारांचा मुकाबला विचारांनीच करावा हे ठीक आहे. पण घाणेरड्या प्रवृत्तीचा आणि अविचाराचा मुकाबला विचारांनी खरोखरच करता येईल काय याचा विचार केला पाहिजे. संतवचन सांगतं की भला भेटला तर कासेची लंगोटी देखील द्यावी. पण नाठाळाच्या माथ्यावर काठीचा प्रहार करण्यात काही चूक नाही. विकृतीनं पछाडलेल्या इतिहासकारांचं संशोधन किती रोगग्रस्त आहे हे सुबुद्ध लोकांनी जरूर पटवून द्यावं. पण वेड्याच्या इस्पितळातच राहण्याची ज्यांची योग्यता आहे त्यांना दयाबुद्धीनं तिथं जरूर पोहोचवावं. एखाद्या लेखकानं धर्मसंस्थापकाबद्दल काही विपरीत लेखन केलं तर त्याची गर्दन मारण्याचा फतवा काढू नये. कारण मेंदूचा रोग झालेले हे लेखणीबहाद्दर अशा फतव्यामुळं हुतात्मा ठरतील. विचाराला विचारानं

उत्तर द्यावं. पण शिवीला शिवीनंच उत्तर दिलं पाहिजे. ज्याला शिवी कळते त्याच्यासमोर ओवी गाण्यात काय अर्थ आहे ?

जेम्स लेन या पाश्चात्त्य इतिहासलेखकानं काही वर्षे भारतात राहून शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला असं त्याच्याविषयी सांगितलं जातं. पण इतिहाससंशोधकानं अस्सल पुरावा मिळाल्याशिवाय कोणताही निष्कर्ष काढू नये ही प्राथमिक गोष्टही त्याला माहीत नसावी. काही बाजारगप्पांचा आधार घेऊन छत्रपती शिवाजी आणि मातोश्री जिजाबाई यांच्यासंबंधी अधमपणाची विधानं करून आपल्या बौद्धिक दारिद्र्याचं त्यानं घाणेरडं प्रदर्शन केलं आहे. महापुरुषांविषयी कुजके, नासके, उद्‌गार काढणारे महामूर्ख असतातच. त्यांच्या बोलण्याचा आधार घेऊन महनीय व्यक्तीसंबंधी कोणी स्वत:ला इतिहासकार म्हणवणारा माणूस गंभीरपणानं लिहू लागला तर त्याच्या माजोरीपणाला आणि मूर्खपणाला समर्पक उत्तर मिळालं पाहिजे.

आता जेम्स लेननं क्षमायाचना करण्याची तयारी दाखवली आहे. आपला मूर्खपणा बऱ्याच उशीरानं का होईना त्याला कळला असेल तर ती एक चांगली घटना ठरेल. लेखनाचं स्वातंत्र्य सर्वांना आहे, पण म्हणून इतिहासाच्या नावाखाली कोणी आपल्या डोक्यातली घाण कागदावर ओतून सामाजिक वातावरण दुर्गंधी करण्याचा प्रयत्न करीत असेल तर सामाजिक आरोग्यासाठी त्याचं डोकं ताळ्यावर आणणं आवश्यक आहे. शिवाजी महाराजांविषयी निंदानालस्ती करणारं लेखन काही इतिहासग्रंथांतून आढळतं. असं असत्य, निंदाव्यंजक लेखन काही चुकीच्या पूर्वग्रहामुळं होत असतं. 'निंदकाचे घर असावे शेजारी' या उक्तीला अनुसरून असलं लेखन केलं जातं. त्याला इतिहास म्हणत नाहीत. इतिहास लिहिण्यासाठी मनाची शुद्धता अधिक आवश्यक असते. व्यक्तीचं आणि परिस्थितीचं मूल्यमापन करण्यासाठी बुद्धी स्वच्छ असावी लागते. इतिहासलेखन आणि संशोधन ही एक जबाबदारी आहे. पण काही अपरिपक्व लेखकांनी इतिहास म्हणजे पोरखेळ आहे अशी समजूत करून घेतली आहे. त्यांचा उपद्‌व्याप निषेधार्ह आहे.

वस्तुतः 'ना मूलं लिख्यते किंचित' ही इतिहासकारांची प्रतिज्ञा असली पाहिजे. 'बाजारगप्पातून मिळालेली माहिती' बाजारबुणग्या लेखकांनी इतिहास म्हणून वापरली तर त्यासारखा दुसरा भयानक मूर्खपणा नाही. जेम्स लेनच्या मनात मुळातच शिवाजी महाराजांसारख्या अत्यंत पराक्रमी वीराबद्दल काही पूर्वग्रह

असावेत. खरं तर बाजारगप्पांतून देखील कोणी छत्रपतींबद्दल अवमान करणारे उद्‌गार काढणार नाही इतकी शिवाजी राजांची प्रतिमा स्वच्छ आहे. जेम्स लेनच्या मनाचेच हे अमंगल खेळ आहेत. जेम्स लेन आणि आणखी कोणी त्याच्यासारखेच निंदक हातात लेखण्या घेऊन सरसावले तरी शिवाजी आणि जिजाऊ यांच्या तेजस्वी प्रतिमा कदापि मलिन होणार नाहीत.

सूर्यावर थुंकणाऱ्या अतिशहाण्यांची कींव करावी आणि त्यांना वाऱ्यावर सोडून द्यावे. त्यांच्या लेखनामुळं सूर्यप्रतिमा कशी कलंकित होईल ?

●●●

# अजून जग जिवंत आहे !

जन्म आणि मरण ही कधीही न उलगडणारी रहस्ये आहेत. आजपर्यंत अनेक संशोधकांनी, प्रज्ञावंतांनी, तपस्व्यांनी, धर्मपुरुषांनी या गूढावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. पण जन्म आणि मृत्यू हे विषय माणसाच्या आकलनात अद्यापि आले नाहीत. जेवढं त्याला कळलं ते केवळ प्राथमिक किंवा वरवरचं आहे. कोणाचा जन्म कुठं व्हावा याला काहीही नियम नाही. कित्येक महापुरुष कंगाल झोपडीत जन्माला आले आणि कित्येक कर्मकरंटे लोक राजप्रासादात जन्म घेते झाले. जन्ममृत्यूचं वेळापत्रक कोण तयार करतो ? कोणाचा तरी अत्यंत लहरी, चंचल मेंदू या वेळापत्रकाच्या मागे असला पाहिजे.

श्रीकृष्णासारखा युगपुरुष मध्यरात्री तुरुंगाच्या कोठडीत जन्माला येतो आणि त्याचा मृत्यू पुढे एका निर्जन वनात कोणा व्याधाच्या बाणानं होतो. ही चमत्कार कथा बुद्धीला थक्क करणारी नाही का ? ज्यानं रणांगणावर अर्जुनाला गीता सांगितली, ज्यानं आपल्या बुद्धिचातुर्यानं पांडवांना हस्तिनापूरचं सिंहासन मिळवून दिलं. त्या धीरवीराच्या जन्ममृत्यूबद्दल विचार करताना मन थकून जातं. जगाच्या कल्याणासाठी अवतरलेल्या येशू ख्रिस्ताच्याही जन्माची कथा तर्कबुद्धीच्या चौकटीत बसत नाही. त्याचा मृत्यू तर मन हेलावून टाकतो.

मुळात जन्म आणि मृत्यू या घटनांच्या स्वरूपाबद्दल काहीच सांगता येत नाही. बौद्धिकदृष्ट्या अत्यंत प्रगत झालेल्या माणसाला हे कोडं कधी उकलता येईल असं वाटत नाही. मृत्यू नावाची शक्ती काल जेवढी अगम्य होती तितकीच आजही आहे. उद्याही तशीच राहील. मृत्यूच्या शाब्दिक व्याख्या आम्ही करू शकतो पण ती केवळ शब्दांत गुरफटलेली कल्पना असणार. मरण म्हणजे काय या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर कोणी देऊ शकेल असं मला वाटत नाही. एक दिवस आपल्यालाही मरणाच्या वाटेनं जायचं आहे इतकंच आम्हाला माहीत आहे. मरणाविषयीचं ज्ञान एवढंच आहे. मरणाऱ्या माणसालाही त्याचं यापेक्षा अधिक आकलन होत नाही आणि मेल्यानंतर समजून घेण्याचा प्रश्नही उरत नाही. जन्म म्हणजे अनेक प्रश्नांची निर्मिती आणि मृत्यू म्हणजे सर्व प्रश्नांची समाप्ती, असंच

उत्तर निरुपायानं द्यावं लागतं.

रुग्णालयात एक वृद्ध गृहस्थ मृत्यूशय्येवर पडून होते. जीवनाची आशा मावळलेली होती. तज्ज्ञ डॉक्टर्स एक-दोन तासात रोग्याचा मृत्यू होईल असं दररोज सांगत होते. पण पंधरवडा उलटून गेला तरी मृत्यूची कृपादृष्टी त्या रुग्णाकडं वळली नाही. तो जगत होता हेही त्याला कळत नव्हतं. पण तो अजूनही कसाबसा जिवंत होता. जवळचे आप्तनातलग कंटाळले होते. वैतागले होते. मनातल्या मनात मृत्यूची प्रार्थना करीत होते. पण जीवन त्या रोग्याला चिकटून बसलं होतं. आणि मरण त्याच्याकडं ढुंकूनही पाहत नव्हतं. याचा अर्थ जीवनमृत्यू त्याच्याशी लपंडावाचा खेळ खेळत होते. या अवधीत ऐन तारुण्यातली काही माणसं त्या रुग्णालयात तडकाफडकी मरण पावली. पण तो वृद्ध मात्र मृत्यूच्या दाराशी खोळंबून उभा होता. बंद दार उघडलं जात नव्हतं. जन्म मरणाची ही दारं कोण उघडतो ? आणि कोण बंद करतो ? हे अधिकार माणसाकडं आले तर इच्छेप्रमाणं जन्म मिळेल आणि इच्छेप्रमाणं अंतही होईल. जगातल्या प्रवेशाची व प्रयाणाची अधिकारसूत्रं माणसाच्या हाती आली तर जगात फार मोठी क्रांती होईल असं मला वाटतं पण हे एक वेडं मनोराज्य आहे. जीवन-मरणाचं चक्र महान वीरांनाही आपल्या बाहुबलानं फिरवता आलेलं नाही. आम्ही सर्व त्या महाशक्तीपुढं शरणागती पत्करलेले क्षुद्र लोक आहोत.

वेगवान प्रवाहाबरोबर एखादी काटकी वाहवत जावी त्याप्रमाणं आम्ही सारे जीवजंतू जीवनमृत्यूच्या ओघाबरोबर वाहत आहोत. आम्हाला गती नाही. शक्ती नाही. पण स्वप्नं मात्र पाहतो जग जिंकण्याची. मृत्यूला पराभूत करण्याची. तो विराट विक्राळ मृत्यू खदखदा हसत असेल. गर्जना करून म्हणत असेल,

'अरे, ही घुंगुरटी कोणत्या वल्गना करीत आहेत ? या क्षुद्र जंतूंना भ्रम झाला आहे. रामकृष्णासारखे युगंधर मी गिळंकृत केले. पचवून ढेकर दिली. आता हे अंगुष्ठमात्र कीटक का उगीच आपल्या बुद्धीची बढाई मारीत आहेत ? मी सर्व जगाला भस्म करणारा वडवानल आहे. माझ्या एका तडाख्यात सगळी जीवन-व्यवस्था कोलमडून पडल्याशिवाय राहणार नाही. मला कोणी अडवू शकत नाही. मला कोणी मारू शकत नाही. मृत्यूला कधी मरण नाही. मी मरणाचं प्रचंड जातं फिरवीत बसलो आहे. तुमच्यापैकी काही जात्यात भरडले जात आहेत. काही सुपातले हसत आहेत. थोड्याच वेळात तुमचंही पीठ होईल. काही जण स्वत:ला मृत्युंजय म्हणवून घेतात. पण या जगात माझ्याशिवाय कोणीही अमर नाही. सर्वांची

राखरांगोळी मी करीत आलो आहे. मृतांची तुम्ही मंदिरं उभी करता. यात्रा-जत्रा भरवता. पण कोणाही मदोन्मत्त वीराचं गर्वहरण मी एका क्षणात करू शकतो. रूपवतीचं रूप, शक्तिमंतांचं सामर्थ्य, विद्यावंतांचं पांडित्य, सारं सारं धुळीला मिळवण्याचं बळ माझ्यात आहे. मी महाकाळ आहे. मला वंदन करण्यासाठी माझ्या पायाशी प्रत्येकाला यावं लागतं. मी सर्वांना एकाच मापानं मोजतो. माझ्या दृष्टीनं कुणी सम्राट नाही की कुणी भणंग भिकारी नाही. मी सर्वांना समान न्याय देतो. राम आणि रावण, धर्मराज आणि दुर्योधन यांच्यात मी कधी भेद करीत नाही.'

मृत्यूचे हे उद्‌गार खरे आहेत. त्याच्या बळकट पंजांतून कोणीही सुटला नाही. पण मृत्यूला जिंकणारं तत्त्वज्ञान मात्र माणसानं निर्माण केलं आहे. ते देखील चिंतनीय आहे. श्रीकृष्णानं गीतेत आत्म्याच्या अमरत्वाबद्दल जो सिद्धांत मांडला तो आशावादी आहे. कधीकधी मरणाचं भय वाटू लागलं तर मी गीतेतले श्लोक वाचू लागतो. जीवनाचं जयिष्णु तत्त्वज्ञान सांगणारे रसरशीत विचार त्या श्लोकांत आलेले आहेत. त्यात म्हटलं आहे :

'जन्माला आला तो एक दिवस मरणारच आहे. त्याला काय भ्यायचं ? शरीर मर्त्य आहे. पण आत्मा मात्र चिरंतन आहे. त्याचा छेद करणारी शस्त्रं अजून जन्माला आली नाहीत. त्याला जाळणरा अग्नी कुठेही अस्तित्वात नाही. त्याला बुडवणारं पाणी कुठेच नाही आणि त्याला शोषून घेईल असा वादळवारा देखील उद्‌भवत नाही. जीर्ण झालेली वस्त्रं टाकून आपण नवी वस्त्रं प्रावरणं घेतो. त्याप्रमाणे जुनी शरीरं सोडून आपला आत्मा नव्या शरीराची वस्त्रं धारण करतो.'

गीतेतलं हे तत्त्वनिरुपण मरणाचं भय नाहीसं करतं. मी अनादि आहे, मी अनंत आहे, मी अवध्य आहे, मला मारणारा शत्रू जन्माला आलेला नाही.' हा विलक्षण विश्वास 'गीता' नावाचा जीवनग्रंथ देतो. गीतेनं मरणाला पराभूत केलं आहे. जीवनवादाची ध्वजा फडकावणारा हा ग्रंथ श्रीकृष्णाच्या विजयी विचारातून साकार झाला आहे. त्यामुळं मृत्यूची भीती ओसरून जाते. मरणाचा विचार करण्यापेक्षा जीवनाचा विचार उत्साहानं केला पाहिजे. राम आणि कृष्ण यासारखे युगकर्ते आले आणि गेले. पण त्यांचीच मंदिरं उभारून आम्ही त्यांच्या मूर्तींची पूजा करीत आहोत. या अर्थानं आजही राम-कृष्ण आहेत. बुद्ध-महावीर आहेत. त्यांची शरीरं नसली तरी विचारांच्या रूपानं ते आम्हाला जीवनाचा संदेश देत आहेत.

एकदा एक सत्ताधारी मोठ्या ऐटीत मला म्हणाले, 'मी बोलतो आणि

जग मान डोलावतं ! दररोज माझ्या गळ्यात शेकडो सन्मानाचे हार पडतात. लोक माझ्या पायावर डोकं ठेवतात. मी भुवई चढवली की अधिकारी चळचळा कापतात. माझ्या सत्तेला अंत नाही. सत्ता गाजवण्यासाठीच मी जन्माला आलो आहे.' हे त्याचे गर्विष्ठ बोल सभोवताली जमलेल्या भाटांनी आणि चमच्यांनी उचलून धरले. सत्ताधाऱ्याचा जयजयकार केला. त्याच संध्याकाळी हृदयविकाराचा झटका आल्यामुळं सत्ताधीशाला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलं. जमलेल्या डॉक्टरांपुढे हात जोडून ते सत्ताधारी रडत रडत बोलू लागले, 'मला वाचवा, मला वाचवा. पैशांची काळजी करू नका. पण मला जीवदान द्या.' मी बोलल्यावर जग डोलतं असं सकाळी म्हणणारे लोकांचे तारणहार संध्याकाळी डॉक्टरांना शरण जात होते. 'मी आहे म्हणून जग चालतं.' हा त्यांचा अहंकार होता. पण ते नव्हते तेव्हाही जग चालतच होतं आणि ते नसतील तेव्हाही जग चालणारच आहे.

एका कवीनं म्हटलं आहे, 'रामकृष्णही आले गेले, त्याविण जग का ओसाचि पडले ?' महान वीर आणि महान विचारवंत आले आणि गेले पण जगाचं त्यांच्यावाचून काहीही अडलेलं नाही. असं वाटायचं की हा महापुरुष गेला तर जगात सर्वत्र अंधार पसरेल. जीवन निःसार होईल पण असं कधीही घडलेलं नाही. समुद्रकिनाऱ्यावरील वाळूचा एखादा कण कमी अधिक झाला म्हणून सागरात काय फरक पडणार आहे ? तो असंख्य लाटांनी उचंबळत राहतो. सूर्य नित्याप्रमाणं उगवतो आणि मावळतो. रात्रीमागून दिवस आणि दिवसांमागून रात्री पळतच असतात. पक्ष्यांचा कलरव चालू राहतो. त्यांच्या दैनंदिन गाण्यात खंड पडत नाही. याचा अर्थ कुणाचा जन्म किंवा मृत्यू या घटनेला विश्वाच्या व्यापारात काही महत्त्व नाही. माणसाच्या आठवणी काही दिवस उरतात. पुढे त्याही विस्मरणाच्या धुक्यात बुडून जातात. आपल्याला जीवनाचाही अर्थ कळत नाही आणि मृत्यूचंही स्वरूप समजत नाही. कोट्यवधी वर्षे हे आकाश असंच निळं आहे. सूर्य असाच वेळापत्रकाप्रमाणं उदयास्त पावतो. सृष्टीच्या या विराट चक्रातला एक अतिक्षुद्र असा तटस्थ साक्षीदार इतकीच माणसाची किंमत आहे.

हे विचार निराशावादी आहेत. जीवनाची व्यर्थता प्रकट करणारे आहेत. पण एक कवी मी या विचारात मग्न असताना माझ्याकडं आला. त्या तरुण कवीच्या मुद्रेवर हास्य, उत्साह आणि आनंद यांची सरमिसळ झालेली होती. तो म्हणाला, 'नुकतीच लिहिलेली एक कविता मी तुम्हाला वाचून दाखवतो' माझ्या संमतीची

वाट न पाहता त्यानं कविता वाचायला सुरुवात केली. तिच्यातला मध्यवर्ती आशय जीवनसौंदर्याचा गौरव करणारा होता. तो अर्थ असा होता. 'मरणाच्या कितीही विक्राळ लाटा जगावर आल्या तरी जग अजूनही जिवंत आहे. आम्ही हसत आहोत. प्रिय व्यक्तीचा हात जोपर्यंत माझ्या हातात आहे तोपर्यंत हे मृत्यो, तुझ्या दाहकतेला आणि क्रूरतेला मी भीक घालणार नाही. मरणांचा धुवाधार पाऊस पडला तरी जग त्यात बुडणार नाही. सृष्टीचं प्रेमगीत असंच अखंड चालू राहणार आहे. जोपर्यंत आईच्या स्तनात वात्सल्याचं दूध आहे आणि जोपर्यंत ते तान्हुल्याच्या मुखात पडत आहे तोपर्यंत मरणाला कोण भितो ? त्याच्याकडं पाठ फिरवून आम्ही जीवनाची वाट आनंदानं आणि आशेनं चालत राहू. मृत्यूनं विनाश करायचा पण जीवनानं नवनिर्मिती करायची आणि मृत्यूला लाजवायचं, पराभूत करायचं. हे चक्र आम्ही फिरवीतच राहू. जगाला कुरूप करणाऱ्या विक्राळ मरणालासुद्धा सुंदर बनवण्याची किमया आम्हा कवींच्या हातात आहे. हे मरणा, तू जहाल विष दिलंस तरी त्याचं आम्ही मधुर अमृतात रूपांतर करू शकतो. रामकृष्ण आले आणि गेले. तरीही हे जग जीवनाच्या संगतीत राहणार आहे. आम्ही नवे रामकृष्ण निर्माण करू. आमच्यातली सृजनाची हिरवी शक्ती हिरावून घेण्याचं सामर्थ्य मरणाच्या हातात नाही. दररोज हजारो सुगंधी फुलांचं निर्माल्य मृत्यू करीत असला तरी दररोज लक्षावधी सुंदर आणि सुवासिक फुलं जीवनाच्या वृक्षवेलीवर उमलत आहेत.'

त्याची ही कविता खरोखरच निराश मन:स्थितीला आशा देणारी आहे. मृत्यू समर्थ आहे ही गोष्ट खरी आहे. पण हे जीवन त्याच्यापेक्षा सहस्रपटीनं समर्थ आहे. मृत्यूलाही लज्जा वाटेल असे जीवनाचे सूर या जगात प्राचीन काळापासून भरलेले आहेत. अजून चंद्रोदय झाला की - सागर प्रेमातिशयानं उचंबळतो. मेघ दाटून आले की अजूनही मोरांचं नृत्य रंगात येतं. जीवनाचे जिवंत सूर निर्माण करणारी कृष्णाची मुरली अजूनही प्रत्येक राधेच्या हृदयात प्रीतीची हुरहूर निर्माण करते. पावसाचे थेंब पडले की धरित्री हिरव्या रंगाचा सुंदर शालू नेसून आकाशाला खुणावते. कोणी काही म्हटलं तरी अजून जग जिवंत आहे. मरण गृहीत धरूनसुद्धा जीवनाचं मोहन सुटत नाही की आटत नाही. पिऊ द्या आम्हाला आयुष्याच्या पात्रातून जीवन सौंदर्याची फेसाळणारी मदिरा. गाऊ द्या आम्हाला जीवनोत्सवाची धुंद गाणी.

●●●

# राजकारण आणि तत्त्वनिष्ठा

'राजकारण हा एक जुगाराचा खेळ आहे.' डिझरायली नावाच्या इंग्रज मुत्सद्यानं हे उद्गार काढले आहेत. तो पुष्कळ वर्षं राजकारणात मुरलेला होता. राजकारणाचे सगळे रंग आणि ढंग त्याला माहीत होते. या जुगारात त्याला कधी विजय मिळाला पण बहुतेक वेळा त्याचा पराभवही झाला. ग्लॅडस्टन् नावाचा त्याचा एक प्रतिस्पर्धी होता. इंग्लंडमधल्या दोन प्रमुख पक्षांचे हे नेते. राजकारणातल्या जीव घेणाऱ्या स्पर्धेत अटीतटीनं उतरले होते. राजकारणाचं जुगारी स्वरूप दोघांनाही अवगत होतं. दोघेही दंड थोपटून एकमेकांच्याविरुद्ध पार्लमेंटमध्ये झुंजत असत. ग्लॅडस्टन्चं वक्तृत्व अभ्यासू होतं. तर डिझरायलीचं मैदानी थाटाचं वक्तृत्व होतं. त्यांच्या काळात राजकारण अत्यंत नाट्यपूर्ण आणि रंगीबेरंगी बनलं ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळं आणि कर्तृत्वामुळं. राजकारणाचा जुगार खेळणाऱ्या माणसानं फार विचार करायचा नसतो. स्वत:ला त्या खेळात झोकून द्यायचं असतं.

सध्याच्या राजकारणात खरोखरच झोकून देणारी माणसं बरीच आहेत. काहीतरी झोकल्याशिवाय यांना राजकारण करताच येत नाही. भारतीय संसदेतली कित्येकांची भाषणं ऐकताना अशी भाषणं 'झोकल्यानंतरच' करता येतील असं वाटून जातं. ग्लॅडस्टन, डिझरायली किंवा अलीकडच्या काळात अॅटली आणि चर्चिल यांच्यासारखी सुसंगत, आक्रमक, साहित्यगुणांनी नटलेली भाषणं करणारे राजकीय नेते इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये क्वचितच झाले असतील. आपल्या लोकसभेतही काही चतुर वक्ते आणि कणखर नेते उत्कृष्ट विचार उत्तम भाषेतून व्यक्त करीत असत.

पंडित नेहरू हे साहित्यावर प्रेम करणारे कविवृत्तीचे नेते होते. त्यांच्या भाषणात काव्यकल्पना आणि वास्तव स्थितीचं विश्लेषण यांचा सुंदर संगम झालेला असायचा. एकदा विरोधी पक्षाच्या सदस्यानं त्यांच्यावर उपहासप्रचुर टीका केली. तेव्हा पंडित नेहरू ताडकन म्हणाले, 'आम्ही क्रांतीच्या तेजाची अपत्यं आहोत. त्या तेजाचा वारसा घेऊन आलो आहोत. तेजस्वी वारसा सर्वांनी स्वीकारावा अशी माझी इच्छा आहे.' या विधानानंतर लोकसभेत टाळ्यांचा कडकडाट झाला.

नेहरूंच्या कविमनाचे रंग त्यांच्या भाषणातून नेहमी प्रकट व्हायचे. काय असेल ते असो. भारताला आजपर्यंत लाभलेले बहुतेक पंतप्रधान कविमनाचे आणि साहित्याचे व्यासंगी होते. व्ही. पी. सिंग कवी आहेत. पी. व्ही. नरसिंहराव उत्तम लेखक आहेत. अटलबिहारी वाजपेयी कवी म्हणून ख्यातनाम आहेत. नेत्याला कवीचं अंत:करण असेल तर त्याला जनसामान्यांची दु:ख कळू शकतील. लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांच्याही मनात कवित्व दडलेलं होतं. प्रसंगविशेषी ते उफाळून यायचं.

आजच्या राजकारणात मात्र जुगाराचा खेळ खेळून खेळखंडोबा करणारे बरेच लोक घुसले आहेत. कसेही खेळा पण जिंकलंच पाहिजे. ही परंपरा अलीकडं दृढ होत चालली आहे. कसेही खेळा या विचाराला म. गांधींनी तीव्र विरोध केला होता. राजकारण करताना आपली साधनंसुद्धा शुद्ध आणि स्वच्छ असली पाहिजेत हा गांधींचा आग्रह होता. या गांधी विचारांचा खून त्यांच्याच अनुयायांनी करून कोणत्याही वाटेनं किंवा आडवाटेनं अथवा चोरवाटेनं जाऊन सिंहासन मिळवलं पाहिजे हा निर्धार सर्वच राजकारण्यांनी करून जुगाराचा डाव मांडलेला आहे. गांधीयुग मागासलेलं होतं. आता त्याची आठवण ठेवण्याचं कारण नाही. सर्वच पक्षांचं याबाबतीत एकमत झालेलं आहे. त्यामुळं राजकारणाच्या प्रांतात कुशल माणसांपेक्षा कुटिल माणसं भरपूर प्रमाणात आली आहेत. सत्तेतून संपत्ती मिळवायची आणि संपत्तीतून सत्ता मिळवायची असा किफायतशीर जुगार सर्वचजण रंगून खेळत आहेत. कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार करणं हा 'स्वधर्म' बनला आहे.

एका भाबड्या माणसानं मला प्रश्न विचारला, 'अहो, मग गांधी, नेहरू, शास्त्री यांच्या विचारांचं काय करायचं ?' त्याच्या प्रश्नाचं मला हसू आलं. मी त्याला म्हणालो, 'अति झालं अन् हसू आलं' गांधीजींचे विचार सभेतून बोलण्यासाठी उपयोगी पडतात. गांधी आणि त्यांचे विचार हा वापरण्याचा विषय आहे. आचरणाचा नव्हे. राजकारणात पडलेल्या माणसांचं वाचन चिंतन किती असतं याचं आता संशोधन करण्याची जरूर नाही.

खोटं मतदान करवून निवडून आलेल्या आणि राज्यमंत्री झालेल्या एका दहावीपर्यंत 'उच्च शिक्षण' घेतलेल्या नेत्याला मी विचारलं, 'तुम्ही आपल्या व्याख्यानात फुले आंबेडकरांचा बऱ्याच वेळा उल्लेख करता. त्यांची पुस्तकं आपण वाचलेली आहेत काय ? कोणत्या पुस्तकांचा आपल्या मनावर अधिक परिणाम

झाला ?' तो राज्यमंत्री माझ्याकडे पाहून अशा रीतीनं हसला की आता या अज्ञानी माणसाला काय सांगायचं! पान-तंबाखू चघळत आणि एक पिंक टाकीत तो जनतेचा पुढारी मला म्हणाला, 'पुस्तकं वाचण्याची रिकामटेकडी कामं तुमी मास्तरांनी करावीत. शाळेतल्या पोरांपुढं तुमाला काहीतरी बडबडायचं असतं. आमाला बुकं वाचायला वेळ कुठं असतो ? रात्रीदेखील आमाला कामं असतात. आता परवाच एका बार क्लबचं उद्घाटन आमच्या शुभहस्ते रात्री नऊ वाजता केलं. दिवसरात्र आमी कामातच असतो. बुकं वाचण्यासाठी तुमाला आमी पगार देतो. आमच्या मागं एक काम आहे का ?' मी त्यांना म्हणालो, 'खरं आहे तुम्ही रात्रंदिवस 'कामानं' झपाटलेले असता. पुस्तकं वाचण्याचे श्रम आपण घेऊ नका. आपल्यासारख्या नेत्यावर आम्ही पुस्तकं लिहू ?' आता मात्र मंत्रीमहोदय खूष झाले. मला म्हणाले, 'प्रोफेसर साहेब, रात्री तमाशाला येणार का ? थोडं नाचगाणं बघू.' नाचगाण्यात रंगलेले हे नेते सत्तेच्या जुगारात जिंकण्यासाठी हुषारीनं डाव लावीत होते.

एके काळी राजकारण आणि अभ्यास यांचं समीकरण होतं. गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, राममनोहर लोहिया यांच्यासारखे दिग्गज राजकारणी नेते आणि विद्वान विचारवंत लोक पुढील राजकारणात बहुधा दिसणार नाहीत. आजही अशा व्यासंगी लोकांचा अभाव आहे. राजकारणाच्या जुगारात यश मिळावं म्हणून काही कुशल जुगारी मंडळींना आमंत्रण दिलं जातं. आता आत घुसलेली ही मंडळी जुगाराची सर्व सूत्रं शकुनी मामांप्रमाणे आपल्या हातात घेऊन बसली आहेत. एकानं म्हटलं होतं, 'Politics is the last resort of scourdrels' राजकारण हे बदमाषांचं अखेरचं आश्रयस्थान आहे. ते अखेरचं होतं. पण आता ते आरंभीचं आश्रयस्थान बनत आहे की काय ? अशी जबरदस्त शंका येते. तुरुंगातले गुन्हेगार कैदी देखील तुरुंगातून निवडणूक लढवू शकतात. कोट्यवधी रुपयांचा प्रचंड घोटाळा करणारे पुढारी निवडून येतात. लोकांनाही घोटाळेबाज पुढारी आवडतात. हा लोकशाहीचा एक चमत्कार आहे. कसलीही पूर्वतयारी न करता, कोणताही अभ्यास न करता, कोणालाही खेळता येण्यासारखा खेळ म्हणजे 'राजकारण'. या जुगारी खेळाची नशा काही और असते.

राजकारण कधी तत्त्वनिष्ठ बनेल का ? या प्रश्नाचा मी विचार करीत आहे. खरं तर विंचवाच्या नांगीनं कधी गुदगुल्या होतील का ? या प्रश्नासारखाच हा प्रश्न आहे. अगदी महाभारत काळापासून राजकारणाची गती वक्र आहे. यशस्वी

राजकारण कोणतं तर जे चतुर वारांगनेप्रमाणं एकाचा हात हातात घेऊन दुसऱ्याला डोळ्यांनी खुणावतं आणि मनात तिसऱ्याचा विचार करतं.

माझा एक मित्र गेली दहा पंधरा वर्षे राजकारणात आहे. प्रत्येक वर्षी तो पक्ष बदलतो. कोणत्याही एका पक्षाशी त्याची बांधिलकी नाही. आपल्या या कृतीचं समर्थन करताना तो म्हणाला, 'प्रत्येक पक्षाचं राजकारण आपल्याला कळलं पाहिजे. सगळे पक्ष मी फिरून आलो. पण मला सगळीकडं एक साम्य दिसलं. प्रत्येक पक्ष सत्तेच्या खुर्चीभोवती पिंगा घालीत आहे. आम्ही लोककल्याणासाठी कार्य करतो. विशेषत: तळागाळातल्या लोकांना वर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करतो. हे त्यांचं म्हणणं म्हणजे शुद्ध थापेबाजी असते. कोणताही पक्ष हे थापेबाजांचं संमेलनस्थळ बनलेलं आहे. मी देखील या सर्वांच्या सहवासात एक उत्कृष्ट, यशस्वी, राजकारणी बनलो आहे. कित्येक वेळा पक्ष बदलले. पण माझं आमदारपद कधीही गेलं नाही. मतदार फार जागरूक असतात आणि फार विचारपूर्वक ते मतदान करतात. असं माझ्या तरी पाहण्यात आलेलं नाही. फार विचार करणारे लोक मतदानालाच येत नाहीत. माझी खूण लोक लक्षात ठेवतात आणि तिच्यावर शिक्का मारतात. त्यांनी बिनतक्रार शिक्का मारावा म्हणून मी त्यांच्यावर देणग्यांचा वर्षाव करतो अशी देवाण घेवाण करावीच लागते. जिथं देवदेखील नवस केल्याशिवाय पावत नाही तिथं जनता जनार्दनाची काही तरी पूजा करावी लागते. तुम्ही लोक याला भ्रष्टाचार वगैरे वगैरे शेलकी विशेषणं देता. पण हाच खरा 'स्वच्छ आचार' आहे. मत ही फुकट उधळण्याची वस्तू नव्हे. मताला किंमत आहे. ती किंमत मी मोजतो. आणि मतं मिळवतो असा हा सरळ व्यवहार आहे. त्यात असत्याचा अंशही नाही.'

त्याचं हे प्रवचन फारच उद्‌बोधक झालं. त्याच्या सत्यवादित्वाबद्दल मला आदर वाटला. गांधींजीनंतर सत्याचा इतका आदर करणारा दुसरा माणूस मी पाहिला नाही. कधीकधी मलाही राजकारणात प्रवेश करण्याची इच्छा होते. आपणही काहीतरी राजकीय कार्य करावं असं वाटतं. हा विचार मी माझ्या त्या 'अनुभवी' मित्राला बोलून दाखवला. तेव्हा तो खदखदून हसला. माझ्याकडं केविलवाण्या नजरेनं पाहत तो म्हणाला, 'अरे, राजकारणात येण्याची तुझी लायकी आहे काय ? आमच्यासारखे अनुभवानं श्रेष्ठ असलेले पुढारीसुद्धा कधीकधी कोंड्यात सापडतात. तुझी काय कथा ? राजकारण हा मास्तरांचा खेळ नव्हे. तू फार तर 'लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर एखादं व्याख्यान द्यावं आणि सभेत मिळालेला पुष्पगुच्छ

घरी घेऊन जावा !! संपलं ! या पलीकडं विचार करण्याचा अविचार करू नकोस. निवडणुका कशा लढवाव्यात याचं शिक्षण घेण्यासाठी तुला बिहारला पाठवावं लागेल. कुलगुरू लालू यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर राहावं लागेल. हे करण्याची तयारी नसेल तर राजकारणाचा विचार सोडून दे.' त्याचं म्हणणं खरं होतं. आज म्युनिसिपालीटीची निवडणूक लढवायची झाली तर पैसा, जात, गुंडगिरी अशी अमोघ शस्त्रं जवळ असावी लागतात. 'येथे पाहिजे जातीचे। येरागबाळाचे काम नोहे.' हे संत तुकारामाचं वचन वेगळ्या अर्थानं लक्षात ठेवलं पाहिजे.

भारतातली लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रथम इथल्या सर्व राजकीय पक्षांचं शुद्धीकरण झालं पाहिजे. सत्ता व्यक्तीच्या किंवा पक्षाच्या उपभोगासाठी आणि प्रतिष्ठेसाठी वापरली जाऊ नये. तिला प्रामाणिक जनसेवेचं अधिष्ठान मिळालं पाहिजे. खुर्ची मिळवण्यासाठी या देशात जो स्वैराचार चालतो तो लाजिरवाणा आहे. महात्मा गांधींना व्यवहारशून्य आणि वेडा म्हणणारे बरेच मूर्ख लोक देशात आहेत. पण गांधीजींनी तत्त्वनिष्ठेवर पक्षाचं राजकारण आणि देशाचं राजकारण उभं राहिलं पाहिजे हा मौलिक विचार सांगितला. आज तो पायाखाली तुडवला गेला आहे. तो मस्तकावर धारण केला पाहिजे. राजकारणाचा प्रवाह शुद्ध आणि स्वच्छ राहिला पाहिजे. हे फार अवघड काम आहे. यासाठी जुगार खेळणारे जुगारी मनोवृत्तीचे लोक नको आहेत. तत्त्वनिष्ठेचा ध्वज उंच उचलून धरणारे लोक या देशाच्या राजकारणात उतरले पाहिजेत. गांधीजींचं हे स्वप्न खरं ठरलं तर राजकारण म्हणजे 'जुगाराचा खेळ' असं कोणी म्हणणार नाही. राजकारणात नैतिक मूल्ये सांभाळली पाहिजेत. माझं हे लेखन म्हणजे एक वेडं स्वप्नरंजन आहे असं वाचकांनी म्हणू नये. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार करावा. ज्या राजकारणाला सामाजिक न्यायाचा आणि नीतीचा पाया असतो असं राजकारण उदयाला यावं.

●●●

# पुतळ्यांची कथा आणि व्यथा

एका विद्यापीठाच्या कुलगुरूंना असं वाटलं की विद्यापीठाच्या आवारात आपला एक भव्य पुतळा उभारण्यात यावा. आज आपल्या हातात सर्वाधिकार आहेत. या विद्यापीठात आपल्या शब्दाला कुणीही आव्हान देऊ शकत नाही. विद्यापीठाच्या रचनेत आपला वाटा महत्त्वाचा आहे. यात शंका नाही. पुढच्या पिढीला आपलं कर्तृत्व कळलं पाहिजे. विद्यापीठात पाऊल टाकणाऱ्या प्रत्येक माणसाला आपली भव्य प्रतिकृती दिसलीच पाहिजे. कुलगुरूंच्या मनात हा विचार आल्याबरोबर त्यांच्या भोवती 'साहेब', 'साहेब' म्हणून माना डोलावणाऱ्या विद्यापीठीय अधिकाऱ्यांची जी कायमची प्रभावळ होती तिनं पुतळा उभारण्याचा विचार उत्साहानं उचलून धरला. साहेबांचा पुतळा कोणत्या पोजमध्ये असावा याचीही लोचट चर्चा सुरू झाली. कोणत्या मूर्तिकाराला बोलावून घ्यायचं यावरही वादविवाद झाले. विद्यापीठातल्या सर्व विभागांतले प्राध्यापक आणि अधिकारी, कारकून व कर्मचारी यांची दुसऱ्या दिवशी सभा बोलावण्यात आली. कुलसचिव अध्यक्षपदी होते. त्यांनी कुलगुरूंचा पुतळा उभारणं कसं आवश्यक आहे हे आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितलं. सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला.

कुलगुरूंच्या नेहमी पुढे पुढे करणारे पुढारीछाप प्राध्यापक बोलायला उठले. आपला विषयही त्यांना धड शिकवता येत नव्हता. पण कुठल्याशा मंत्र्याच्या शिफारशीनं ते विद्यापीठात 'चिकटले' होते. कुलगुरूंनाही त्याच मंत्र्यांचा वरदहस्त लाभलेला होता. दर महिन्याला मंत्रालयात जाऊन ते भक्तिभावानं त्यांच्या चरणयुगुलांवर आपलं मस्तक वाकवीत असत. कुठं वाकावं याचं आवश्यक ज्ञान त्यांनी मिळवलं होतं. त्यामुळंच गेली दहा-बारा वर्षं ते कुलगुरूपद भूषवीत होते.

बोलायला उठलेले प्राध्यापक कुलगुरूंचे उजवे किंवा डावे हात होते. ते बोलू लागले, 'आपले साहेब म्हणजे आकाशातले सूर्य आहेत (यावेळी त्यांनी वर बोट केलं होतं. आकाश माझ्यावर असतं हे सामान्यज्ञान त्यांना होतं) या सूर्याच्या उजेडात आपण वावरत आहोत. (प्रचंड टाळ्या) या सूर्याचं रात्रीसुद्धा दर्शन व्हावं म्हणून त्यांचा भव्य पुतळा विद्यापीठाच्या प्रांगणात आपण उभा करणार आहोत.

त्यामुळं या विद्यापीठात सूर्य कधी मावळणारच नाही.' (हियर, हियर टाळ्या) टाळ्या मिळाल्यावर हे प्राध्यापक भलतेच चेकाळले. मधून मधून आपला कळकट आणि मळकट टाय कुरवाळीत बोलण्याची त्यांना सवय होती. प्रत्येक वाक्यानंतर 'बरं का!' हा शब्द ते न चुकता उच्चारीत असत. 'आपले कुलगुरू सूर्य आहेत हे मी तुम्हाला सांगितलंच आहे बरं का ! ते सूर्यालाही आपला प्रकाश देऊ शकतील (पुन्हा टाळ्या) खरं तर या विद्यापीठाला कुलगुरू साहेबांचंच नाव दिलं पाहिजे बरं का !' 'बरं का' शिवाय दुसरा युक्तिवाद त्यांच्यापाशी नव्हता. पण कुलगुरूंची लोचट स्तुती भरसभेत केली या बळावर कुलगुरूंची त्यांना शाबासकी मिळणार होती. अशाच पद्धतीची सात-आठ व्याख्यानं झाली. कुलगुरू हे दैवी अवतार आहेत असा निष्कर्ष एक दोघांनी काढला. पुतळ्याला विरोध कोणाचाही नव्हता.

इतक्यात विद्यापीठाच्या वसतिगृहात राहणारा एक विद्यार्थी ओरडला. 'मला थोडं बोलायचं आहे.' व्यासपीठावर येऊन तो अभिनिवेशानं बोलू लागला, 'कुलगुरूंचा पुतळा बसवणं ही भाबडी व्यक्तिपूजा आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी कोणती मौलिक भर घातली आहे ? आम्हा वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना नीट सोयी-सुविधा देखील मिळत नाहीत. कुलगुरूंच्या भोवती स्तुतिपाठकांचं एक कोंडाळं जमलं आहे, उद्या दुसरे कुलगुरू आले की त्यांच्या भोवतीही हेच लोक ओशाळेपणानं वावरत राहतील. सत्तेवर कोणीही असो, त्याच्यासमोर 'जी हुजूर' करणारी स्वाभिमानशून्य मनोवृत्ती असलेले हे लोक कोणत्याही विद्यापीठात असण्याच्या लायकीचे नाहीत. पुतळे उभे करण्यापेक्षा गरीब विद्यार्थी विद्यार्थिनींचं शिक्षण कसं मार्गी लागेल याचा विचार करण्यासाठी ही सभा घेतली असती तर मला आनंद वाटला असता. उभारलेल्या पुतळ्यांमुळं कावळ्यांची मात्र सोय होते. माझा या पुतळ्याला स्पष्ट विरोध आहे.'

तो विद्यार्थी व्यासपीठावरून खाली उतरताच दहावीस कर्मचारी त्याच्यावर तुटून पडले. त्याला मारहाण झाली. त्याच्या बोलण्यात जो मुख्य विचार होता त्याकडं कुणीही लक्ष दिलं नाही. बहुतेक दुसऱ्या दिवशी बेशिस्त वर्तनाबद्दल त्या विद्यार्थ्याला वसतिगृहातून घालवून दिलं असेल. जे बरोबर आहे ते बोलण्याची चूक त्यानं केली होती. बाकीचे वक्ते आपल्या कुलगुरुनिष्ठेचे अतिरेकी, अवास्तव ढोल वाजवीत होते. त्यांना व्यवहारज्ञान होतं. ज्याला व्यवहार कळत नाही त्याच्यावर अशाप्रकारच्या आपत्ती येणारच.

अखेर तो पुतळा मोठ्या थाटामाटानं मुख्यमंत्र्यांच्या 'शुभ' हस्ते अनावृत्त करण्यात आला. हा पुतळा म्हणे विद्यार्थ्यांना ज्ञानाची प्रेरणा देऊ शकेल असं मुख्यमंत्र्यांनी ठोकून दिलं. कोणत्याही समारंभात ते एकच भाषण करीत असत. वेळप्रसंग पाहून व्यक्तींची नावं तेवढी वेगळी उच्चारीत असत. या विद्यापीठात प्रचंड वशिलेबाजी, परीक्षांतले गैरप्रकार, अध्यापन-संशोधनाकडं दुर्लक्ष वगैरे प्रकार सर्रास चालत असत. पण कुलगुरुंचे वरिष्ठ मंत्र्याशी लागेबांधे असल्यामुळं त्यांना पूर्ण संरक्षण होतं. आता विद्यापीठाच्या आवारात या आधुनिक ज्ञानमहर्षींचा भव्य पुतळा उभा असल्यामुळं विद्यापीठाची प्रतिष्ठा गगनाला भिडली होती.

आपला पुतळा उभारण्यात यावा ही 'सात्त्विक' इच्छा कुलगुरुंच्या मनात का यावी ? पुतळ्यामुळं आपण दीर्घकाळ लोकांच्या लक्षात राहू. लोक आपल्या मूर्तीकडं आदरानं पाहून प्रेरणा घेतील. असा भ्रम कदाचित त्यांना झाला असेल. आपल्या जिवंतपणीच आपलं असं स्मारक उभं करण्याची योजना म्हणजे त्यांचा दु:सह अहंकार होता. आत्मप्रसिद्धीची अनिवार इच्छा असलेले लोक काय वाटेल ते उपाय योजतात.

एकदा एका मंत्र्यानं एका प्रसिद्ध वृत्तपत्राच्या संपादकाला आपल्या कार्यालयात बोलावून विचारलं, 'अलीकडं माझ्या विषयीच्या बातम्या आपण छापत नाही किंवा एखादी बातमी प्रसिद्ध केली तर ती सातव्या-आठव्या पानावर कोपऱ्यात छापता. सरकारी जाहिरातीसाठी आता आम्हाला तुमच्या बाबतीत फेरविचार करावा लागेल.'

त्याबरोबर ते संपादक स्तंभितच झाले. मनातून थोडे घाबरले. पण दुसऱ्याच क्षणी केविलवाणं हसून म्हणाले, 'मी काही दिवस आजारामुळं घरीच होतो. पत्राकडं लक्ष देऊ शकलो नाही. खरं तर आपली बातमी काहीही असली तरी पहिल्या पानावर आली पाहिजे. मागं आपला कुत्रा हरवल्याची बातमी मी पहिल्या पानावर प्रसिद्ध केली होती. सोबत आपला आणि कुत्र्याचाही फोटो होता. आता मी प्रेसमध्ये सर्वांना आपल्या संदर्भात स्टँडिंग इन्स्ट्रक्शन देत आहे. कृपालोभ असू द्यावा.'

प्रसिद्धीची लालसा कशी असते याचा हा एक नमुना आहे. एखाद्या कुलगुरूलाही आपला पुतळा डौलात उभा राहावा असं वाटलं तर त्याच्या लाजिरवाण्या अहंकाराला क्षमा करावी इतकंच मी म्हणेन. पुतळ्यांना कोण विचारतो ? कित्येक महनीय व्यक्तींचे पुतळे उपेक्षित अवस्थेत उभे असतात. ज्यांनी

देशातला अंधार दूर करण्यासाठी आपल्या आयुष्याची मशाल पेटवली त्या महान देशभक्तांचे पुतळे अंधारात राहिलेले आहेत. जवळ एखादा दिवादेखील नगरपालिकेनं ठेवलेला नसतो. तो कोणाचा पुतळा आहे याची बहुसंख्य लोकांना माहिती नसते. गांधीजींच्या पुतळ्याच्या चौथऱ्याखाली बसून जुगार खेळणारे लोक पुष्कळांनी पाहिले असतील. गांधीजींच्या छायेतच जुगार चालावा ही खरोखर एक दारुण शोकांतिका आहे. महापुरुषांचे पुतळे अवश्य उभारावेत पण त्या पुतळ्यांकडे लोक अक्षम्य दुर्लक्ष करतात. एका गावात एका श्रेष्ठ समाजपुरुषाचा पुतळा उत्साहानं उभा केला. पण सहा महिन्यातच त्या पुतळ्याभोवतालच्या जागेत इतकी अस्वच्छता झाली की तो पुतळा तिथून निघून कसा गेला नाही याचं आश्चर्य वाटावं. गावच्या नगरपालिकेला आपलं कर्तव्य करण्याची चुकूनही दुर्बुद्धी झाली नाही. ज्यानं सारा समाज आपल्या कर्तृत्वानं स्वच्छ केला त्यालाच अस्वच्छ वातावरणात रात्रंदिवस बंदिस्त व्हावं लागलं. असे प्रकार इंग्लंड अमेरिकेत घडत नाहीत. तिथंही श्रेष्ठ व्यक्तींचे पुतळे अनेक चौकांतून बसवलेले आहेत. पण त्या पुतळ्यांच्या सुरक्षिततेची आणि स्वच्छतेची कटाक्षानं काळजी घेण्यात येते. आमच्या देशातल्या पुतळ्यांना एक दिवस वाचा फुटली तर ते काय म्हणतील याची कल्पनाच केलेली बरी ! ते जनतेला उद्देशून म्हणतील,

'माय बापहो, आमची या वनवासातून कृपा करून सुटका करा. आमच्या शेजारच्या रस्त्यावरून दररोज हजारो लोक जातात. कोणी आमच्याकडं ढुंकूनही पाहत नाही. आम्हाला कधी स्वच्छ पाण्याची आंघोळ घातली जात नाही. आमच्या आजूबाजूला अस्वच्छता आहे. यातून आम्हाला सोडवायचं पुण्यकार्य कोणीतरी करावं हीच आमची प्रार्थना आहे.' जिथं श्रेष्ठ व्यक्तींच्या पुतळ्यांची ही व्यथा, तिथं कोण्या विद्यापीठाच्या कुलगुरूच्या पुतळ्याची काय कथा वर्णावी ? पण 'याचि देही याचि डोळा' आपला भव्य पुतळा दिमाखात उभा राहावा ही अनिवार इच्छा त्या महाभागाला व्हावी याचं आश्चर्य वाटतं. समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या एखाद्या कणाइतकंही ज्याला महत्त्व नाही त्यानं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून स्वत:चा पुतळा उभा करण्याचं पाप करावं. या घटनेला काहीही अर्थ नाही. एरंड कितीही वाढला तरी त्याला कोणी आम्रवृक्ष म्हणत नाहीत. असो.

इराकचा माजी हुकूमशहा सद्दाम हुसेन याचे भव्य पुतळे इराकच्या अनेक नगरांतून उभे केलेले होते. हुकुमशहांना ते शक्य असतं. कोणताही अहंमन्य, उन्मत्त,

सत्ताधीश आपले पुतळे निर्माण करतो. आपण किती लोकप्रिय आहोत. आणि या देशाचं पानही आपल्या इच्छेशिवाय कसं हालत नाही हे दाखवण्याची अनेक साधनं त्याच्यापाशी असतात. एकदा एका हुकूमशहानं असा फतवा काढला होता की, 'शाळा सुरू होताना प्रत्येक शाळेत आपल्या गौरवाचं गीत सामुदायिकरीत्या गायिलं जावं.' बिचारे शिक्षक आणि विद्यार्थी ! हुकूमाची तामिली करीत राहिले. हा देखील किळसवाण्या अहंकाराचा दुर्गंधी आविष्कार आहे. अमेरिकेनं इराकवर आक्रमण केलं. तो देश ताब्यात घेतला तेव्हा लोकांनी सद्दाम हुसेनचे पुतळे घणाचे घाव घालून फोडून टाकल्याची दृश्यं दूरदर्शनवर साऱ्या जगानं पाहिली असतील. त्या पुतळ्याची विटंबना पाहत असताना माझ्या मनात विचार आला, 'सत्ताभ्रष्ट होताच राजे महाराजे देखील कसे लोकांना तुच्छ वाटू लागतात. याचं हे चित्र आहे.' फुटून जाणारे पुतळे उपयोगाचे नाहीत. लोकांच्या हृदयातच आपला पुतळा उभा राहावा असं पवित्र कार्य करणारा माणूस शतकानुशतकं जिवंत राहतो. चौकात उभ्या राहिलेल्या दगडमातीच्या पुतळ्यापेक्षा लोकहृदयात उभा राहिलेला पुतळा प्रदीर्घ काळापर्यंत प्रेरणा देत राहतो.

महात्म्यांच्या मूर्ती देखील कालांतरानं भग्न होतात. पण ह्या महात्म्यांची पवित्र आणि स्फूरणदायक स्मृती मानवजातीचा इतिहास आपल्या हृदयात नंदादीपाप्रमाणं चिरंतन तेवत ठेवते. इतिहास म्हणजे थोरांची चरित्रे, थोर व्यक्तींचे पुतळे नसले तरी त्यांची स्मृती अमर राहते. आणि क्षुद्र व्यक्तींचे कितीही पुतळे उभारले तरी ते जमिनीवर उभे असतात. त्यांना लोकांच्या अंत:करणाचा आधार नसतो.

●●●

# मला वकील व्हायचं होतं !

'आयुष्य ही वेड्याने सांगितलेली एक अर्थशून्य कहाणी आहे' असं शेक्सपिअरच्या एका नाटकातलं पात्र म्हणतं. काही अंशी या विधानात तथ्य आहे. आयुष्याचा प्रवास निरर्थक झाला असं कित्येकांना आयुष्याच्या शेवटी वाटायला लागतं. पण हा निराशावादी विचार कशासाठी करायचा ? हजारो वर्षापासून सृष्टीच्या आणि माणसाच्या जीवनाचं चक्र अखंड फिरत राहिलं आहे. त्याचं प्रयोजन काय या प्रश्नाचा गंभीरपणानं शोध घेणारे तत्त्ववेत्ते असतील, आहेत. पण आयुष्यातल्या प्रत्येक दिवसाचा जो काही सुखदु:खात्मक अनुभव असेल तो हसतमुखानं स्वीकारावा आणि पुढची वाट एखाद्या आशागीताचे सूर मनात ठेवून चालत राहावी हे माझं जीवनाचं साधंसुधं तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञान हा शब्द बराच अवजड आहे. त्यामुळं तो सोडून द्यावा. कोणत्याही अनुभवाबद्दल मी कधी फारशी तक्रार करीत बसलो नाही. कारण येणारे अनुभव स्वैर असतात. विचित्र आणि विसंगतही असतात. त्यांचंही स्वागत केलं की त्या अनुभवांची शल्यं बोथट होत जातात. पण तरीही आपली वाट आपल्याला ठरवावी लागते. जीवनाचं नियोजन करावं लागतं.

मी अनेक वर्षे एक प्राध्यापक म्हणून जगलो. माझ्या विद्यार्थ्यांना मी केवळ पाठ्यक्रमातली पुस्तकं शिकवीत बसलो नाही. तसं केलं असतं तर ती चाकोरीतली वाट मला कंटाळवाणी वाटली असती. पुस्तकांपेक्षा जीवनाकडं सौंदर्यवादी दृष्टीनं पाहावं आणि आपल्या व समाजाच्या जीवनावर मनापासून प्रेम करावं हे शिकवण्याकडं माझा अधिक कल होता. यात मी कितपत यशस्वी झालो हे मला सांगता येणार नाही. पण शिकण्यातलं आणि शिकवण्यातलं आगळं समाधान मी घेऊ शकलो. इतकं की एखाद्या दिवशी नवं पुस्तक हातात पडलं नाही की दिवस सार्थकी लागला असं वाटत नाही. नवी कविता, नवी पुस्तकं आणि जुने मित्र यांचं अतूट आकर्षण मनात आहे. प्राध्यापक म्हणून मी आनंदात जीवन व्यतीत केलं यात शंका नाही. पण प्राध्यापक होण्याची माझी इच्छा नव्हती. आपल्या नावामागं 'प्रा.' हे उपपद असावं असं मला वाटत नव्हतं. बी. ए. होईपर्यंत आपण एक नामांकित कायदेपंडित व्हावं आणि अंगात काळा झगा घालून न्यायाधीशासमोर

प्रभावी भाषण करून हातातली केस जिंकावी. सहकाऱ्यांनी केलेलं अभिनंदन हसतमुखानं स्वीकारावं. आपल्या नावाचा दबदबा वाढावा. असलं मनोराज्य उभारण्यात मी धन्यता मानीत होतो. याचं कारण इतकंच की कुठल्यातरी अत्यंत यशस्वी वकीलाची प्रतिमा माझ्या मनात रुजून बसली होती.

कॉलेजात विद्यार्थी असण्याचं वय हे रोमँटिक कल्पना करण्याचं वय असतं. कल्पनाशक्तीला त्या मुक्त वातावरणात अनेक धुमारे फुटतात. वकील होण्याची माझी कल्पना फारशी अवास्तव नव्हती. कॉलेजात असताना कित्येक ख्यातनाम वकीलांची भाषणं मी ऐकली होती. त्यांच्या वक्तृत्वाचा, विचारांचा माझ्यावर पुष्कळच प्रभाव पडला होता. लोकमान्य टिळक यांनी कायद्याचा अभ्यास केला नसता तर त्यांच्या लेखनात आणि भाषणात निर्दोष युक्तिवाद आणि उत्तम तार्किक संगती आली नसती आणि त्याअभावी ते इंग्रज सरकारशी इतक्या मुत्सद्दीपणानं लढू शकले नसते, अशा अर्थाची विधानं मी कुठल्याशा पुस्तकात वाचली होती. वकील हे बुद्धिमत्तेचं प्रतीक मानलं जायचं. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांनी कोर्टात वकिलीही केली होती. गांधी, आंबेडकर, सावरकर, नेहरू हे सर्व प्रथमश्रेणीचे नेते कायद्याचे अभ्यासक होते. एक-दोन बॅरिस्टरांची यात पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू जयकर यांचा उल्लेख केलाच पाहिजे, उत्कृष्ट इंग्रजीतली मंत्रमुग्ध करणारी व्याख्यानं मी मनात जपून ठेवली होती. काही चित्रपटांतून यशस्वी वकीलाची ऐटबाज भूमिका एखाद्या नटानं वठवलेली पाहण्यात यायची. त्यामुळं आपणही बी. ए. झाल्यानंतर कायद्याचा अभ्यास करायचा आणि एक नामवंत वकील व्हायचं असं मी मनोमन ठरवून टाकलं. जणू काही मी खरोखरच महान वकील होणार होतो ! संकल्प आणि सिद्धी यांच्या आड परमेश्वरी इच्छा उभी असते हे मला माहीत नव्हतं. संकल्पाबरोबर अनेक विकल्पही समोर उभे असतात हे पुढील आयुष्यात कळलं. मनातल्या साऱ्याच कल्पना साकार होऊ लागल्या तर जीवनाचं स्वरूप फारसं मनोवेधक राहाणार नाही. अनिश्चितता हाच आयुष्याचा पाया आहे. येणारा प्रत्येक चेंडू सीमापार टोलवणं कुणालाच शक्य नसतं. कारण बरेचसे चेंडू फसवे असतात. नाटकी असतात. आपण सरळ आहोत असं भासवून भलतीकडे वळतात. या वळणांची कल्पना नसते आणि वळण म्हटल्यावर ते सरळ कसे असणार ? फर्ग्युसन कॉलेजातून बी. ए. झालो. उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालो. माझे मित्र पंडित आवळीकर, स. शि. भावे, पंडित शेटे यांनी एम. ए. होण्याचं ठरवलं. मी

त्यांना ऐटीनं म्हणालो, 'मी एल. एल. बी. होणार. एम. ए. होण्यात काय अर्थ आहे ? वकील होण्यात थ्रिल आहे.' आपल्या नावाची वकील म्हणून घरावर लागलेली पाटीसुद्धा मी मनातल्या मनात वाचली होती. पुण्याच्या लॉ कॉलेजात प्रवेश घेतला. पहिल्या सहामाहीची फी भरली. आणि लॉ कॉलेजच्या कँटिनमध्ये टोस्ट आणि मिसळ यांच्यावर ताव मारला. त्यावेळचे म्हणजे १९५४ मधले लॉ कॉलेजचे कँटिन पुण्यात प्रसिद्ध होते. कॉलेजच्या इमारतीपेक्षाही आज माझ्या लक्षात कँटिन तेवढं राहिलं आहे. त्यावेळी कायद्याच्या अभ्यासक्रमात इंग्रजी विषयाचाही समावेश होता. प्रा. पंडित यांनी घेतलेले इंग्रजीचे काही तास अजून मी विसरलो नाही. सुंदर इंग्रजी भाषेचा आणि लफ्फेबाज वक्तृत्वाचा एक नमुना म्हणून आम्ही पंडितांकडे पाहत होतो. बाकीचे तास किचकट आणि कंटाळवाणे वाटायचे. कायद्याची रुक्षता जाणवून देणाऱ्या त्या व्याख्यानांमुळं माझा उत्साह बराचसा मावळला. अभ्यासक्रमातली पुस्तकं आणि त्यांचा आकार-प्रकार पाहिल्यावर 'सीदान्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति' अशी माझी अवस्था झाली.

पण दुसऱ्या वर्षाचा एक अनुभवी विद्यार्थी त्यानं तीनचार वर्ष कॉलेजात काढली होती, तो मला म्हणाला, 'अरे ही जाडजूड पुस्तकं वाचण्यासाठी नसतात. ती केवळ 'शो' साठी ठेवली जातात. माझे वडील गावातले प्रसिद्ध वकील आहेत. असले ग्रंथ ते कपाटात ओळीनं लावून ठेवतात. अशीलांना वकीलसाहेबांच्या विद्वत्तेची यामुळं जाणीव होते. परीक्षेसाठी शंभर-दीडशे पानांचं गाईड घेतलं की काम भागतं. बावरू नकोस.'

त्यानं मला धीर देण्याचा प्रयत्न केला. पण कायद्याचा अभ्यास इतक्या बेकायदेशीरपणानं होऊ शकेल असं मला वाटलं नाही. माझ्या मनातली शंका दृढ होऊ लागली. हा अभ्यास माझ्या मानसिक प्रकृतीशी खरोखरच सुसंगत आहे का? हा प्रश्न मला पडला.

अस्वस्थ होऊन मी प्रा. रा. श्री. जोग यांना भेटलो. ते म्हणाले, 'हा निर्णय तुम्ही स्वत:च करायचा आहे. तुमचं साहित्यावर विशेष प्रेम आहे. कथा आणि निबंध लिहिण्यात तुम्हाला रस आहे. एखादी भावपूर्ण कथा लिहिण्याऐवजी घटस्फोटाची नोटीस लिहिणं तुम्हाला जमेल काय ? पुष्कळ चांगले वकील सहित्यिक आहेत. पण वकील झाल्यावर साहित्यासाठी तुम्हाला किती वेळ देता येईल ? एखाद्या प्रश्नाच्या दोन्ही बाजू ज्याला नीट तपासता येत नाहीत त्याला चांगला

वकील होणं शक्य आहे का ? मला वाटतं आपल्या वृत्ती-प्रवृत्तीशी जुळेल ते काम आपण करावं.'

प्रा. जोग यांनी मला वकिली सल्ला दिला. पण आपल्या 'प्रकृतीचा' विचार करावा हे त्यांचे शब्द पुष्कळच सांगून गेले. त्याच आठवड्यात लॉ कॉलेजाला शेवटचा नमस्कार केला. निरोप घेण्यापूर्वी कँटिनमध्ये जाऊन टोस्ट आणि मिसळ यांचा भक्तिभावाने आस्वाद घेतला. कायद्याशी माझा आलेला सबंध हा असा साजरा केला.

'मनसा चिंतितं एकं दैवमन्यत्र्य चिंन्तयेत्' आपण मनात एक योजना आखतो. पण दैवानं दुसरीच योजना तयार केलेली असते. आयुष्यात अनेक वाटा आपण ठरवतो. पुष्कळशा वाटा पुढे पुसट होतात. बुजून जातात. एखादी नवी वाट सापडते. कुठे होतो आणि कुठे आलो हे कळत नाही. जगण्यातली हीच गंमत आहे. मी खरोखरच वकील झालो असतो तर अध्यापक होण्यातला आनंद माझ्या पदरात कधी पडलाच नसता.

व्याख्यानांच्या निमित्तानं महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर आजही माझी भ्रमंती चालू आहे. अनेक ठिकाणी माझे विद्यार्थी-विद्यार्थीनी भेटतात आणि म्हणतात, 'तुमचं व्याख्यान ऐकताना फार वर्षांनी बी.ए. च्या वर्गात बसल्याचा आनंद मिळाला. कॉलेजातले ते दिवस पुन्हा आठवले. तुम्ही शिकवलेलं कुसुमाग्रजांचं काव्य अजून माझ्या स्मरणात आहे.' या उद्गारांनी माझ्या अंगावर मूठभर मांस चढतं. लक्षात राहण्यासारखा एक शिक्षक म्हणून आपल्याला मान्यता मिळाली ही जाणीव खरोखरच आणखी जगण्याचा उत्साह देते. आजवरचं आयुष्य कॉलेजात गेलं. पण लॉ कॉलेजात नव्हे. कोणी कसं आणि कुठं जगावं याचा कायदा करणारे हात वेगळे असतात. यात काय संशय ?

●●●

# मीरेची प्रेमकहाणी

संत कवयित्री मीरा हिची भावोत्कट कविता वाचताना माझ्या डोळ्यांत अश्रू आले. आपल्या प्रेमव्याकुळ मनाचं स्पंदन तिनं आपल्या हृदयस्पर्शी शब्दांत अगदी सहजपणानं प्रकट केलं आहे. मीरेची कविता म्हणजे कृष्णप्रियकराचा विलक्षण ध्यास लागलेल्या प्रियतमेची आर्त शब्दावली आहे. मराठीतही संतकवयित्रींनी पुष्कळ काव्य लिहिलं आहे. जनाबाईच्या कवितेत विठ्ठलाला भेटण्याची उत्कंठा आहे. तिच्या प्रत्येक शब्दानं त्या आतुर मन:स्थितीचं दर्शन होतं. पण मीरेच्या करुणरम्य आणि भावगम्य कवितेतली आर्त कोमलता मला केवळ मीरेच्याच काव्यात आढळली. जनाबाईच्या काव्यात मीरेइतकी आत्यंतिकता आढळत नाही. त्यामुळेच मीरेची भावगीतं वाचताना मला एक प्रकारचं हळवं आणि कोवळं दु:ख अनुभवता येतं. आपल्या हृदयातल्या साऱ्या आशाआकांक्षा आणि साऱ्या जखमा शब्दांतून तिनं उघड्या केल्या आहेत. संवेद्य मनाच्या रसिकाला मीरा आपल्या हृदयीचं सुखदु:ख देऊन त्याच्याशी एक मनमोकळा संवाद करू शकते. मी प्रेमकविता पुष्कळ वाचल्या आहेत. पण मीरेच्या कृष्णप्रेमाची समग्र कहाणी तिच्या काव्यातून एका आगळ्या सामर्थ्यानं व्यक्त झाली आहे. आपल्या प्रेमविषयावर कसं आणि किती प्रेम करावं याचं रसपूर्ण चित्र तिनं आपल्या अंतरंगानं रंगवलं आहे. खरं सांगायचं तर हा 'गिरिधर नागर' श्रीकृष्ण या भाबड्या मुलीला केव्हा भेटला हेच कळत नाही.

आख्यायिका अशी आहे की कुणीतरी तिला श्रीकृष्णाची एक सुंदर लहान मूर्ती भेट म्हणून दिली आणि विनोदानं तिला सांगितलं की, 'हाच तुझा प्रियकर आणि पती आहे.' त्या मूर्तीच्या दर्शनानं मीरेच्या अंत:करणात भावनेचे जे तरंग उठले ते कधीच मावळले नाहीत. त्या तरंगांवरच मीरेचं जीवन अखेरच्या क्षणापर्यंत तरंगत राहिलं. श्रीकृष्णाची अपूर्व चरित्रकथा तिच्या श्रवणी पडली. त्या शामसुंदर कृष्णकन्हैयाच्या मुरलीचे नितांत मधुर सूर तिच्या चित्तात उचंबळू लागले. श्रीकृष्णाचा तो मोरपिसांचा मुकुट, त्याच्या मुखावरचं मधुर आवाहनात्मक हास्य, त्याच्या काळ्याभोर डोळ्यांतली प्रेमशक्ती यांनी ती अंतर्बाह्य मोहरून गेली.

हृदयातल्या कृष्णावर गीत रचण्यासाठी बोलू लागली. आणि बोलता-बोलता गीत सिद्ध झालं. जेव्हा अंतर्मनाला एखाद्या विषयाचा अदम्य ध्यास लागतो तेव्हाच साहित्याची निर्मिती होते. मीरेच्या गीतकाव्यात तिचं संपूर्ण भावजीवन आहे. तिची स्वप्नं आहेत. तिचं दु:ख आहे. आणि तृप्तीचे नि:श्वासही आहेत. खरं तर कृष्णप्रेमी मीरा ही स्वत:च एक कविता झाली होती.

मीरेच्या रोमरोमांत कृष्णाच्या मुरलीची धुन निनादत होती. तिच्या डोळ्यांतच कृष्ण आल्यामुळं काजळ घालण्याची जरूर नव्हती. हृदयाच्या प्रत्येक आघातातून कृष्णाचाच उच्चार होत राहिला. पायांतल्या पैंजणांतून कृष्ण नाचत राहिला. कृष्ण आणि मीरा यांची भेट होणं लौकिक दृष्टीनं कधीच शक्य नव्हतं. कारण कित्येक शतकांचं प्रचंड अंतर दोघांमध्ये होतं. पण प्रेमभावनेला कितीही अंतर पार करता येतं. कल्पनेचे पंख लावून मीरा कृष्णाच्या कालखंडात आणि त्याच्या मनात हळुवार पावलांनी केव्हा शिरली हे कृष्णालाही कळलं नसेल. ती त्याची झाली, त्याच्याशी सर्वार्थानं एकरूप झाली. एवढंच त्याला आणि तिला कळलं. ही प्रेमकहाणी प्रेम करणाऱ्यालाच कळेल. वास्तवतेच्या रुक्ष फूटपट्ट्या हातात घेऊन बसणाऱ्या गद्य वृत्तीच्या समीक्षकाला मीरेचं प्रेम कधीच कळणं शक्य नाही. माझ्या दृष्टीनं श्रीकृष्ण ही एक अनुपम संगीतानं भरलेली मुरली आहे. तिच्यातले सूर मीरा नावाच्या मुरलीत प्रविष्ट झाले आणि दोन्ही वाद्यांतून एक अविनाशी प्रेमगीत जन्माला आलं.

प्रेम या भावनेचं कितीही विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला तरी या भावनेची गूढता उलगडत नाही. प्रेमावर अनेक पंडितांनी भाष्य केलं आहे. पण पांडित्यानं प्रेमाचं रहस्य आणि सामर्थ्य कळत नाही. हे प्रेम अनेक रूपांतलं आहे. ते देवावरचं असेल, ध्येयावरचं असेल, व्यक्तीवरचं असेल. ते जेव्हा प्रमाथी असतं तेव्हा त्याच्या शक्तीला तुलना असत नाही. संत नामदेवानं देवावर असंच प्रेम केलं. त्याचा देवाशी 'संवाद' होत होता असं सांगितलं जातं. जनाबाई देखील दळण-कांडण करताना विठ्ठलाच्या सोबतीत असायची असा उल्लेख तिनं स्वत:च केला आहे. यात अविश्वसनीय असं काहीच नाही. कारण ही त्या भक्तांना आलेली अनुभूती आहे. आपण सदैव परमेश्वराच्याच सान्निध्यात आहोत असं ज्या भक्तांना मनोमन अनुभवता येतं त्यांची अनुभूती असत्य आहे असं म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? केवळ इंद्रियांना येणारे अनुभव तेवढे खरे असं मानणं सयुक्तिक नाही.

काही अनुभव मनाचे असतात. काही आत्म्याचे असतात. मीरेचं कृष्णावरचं प्रेम शारीरिक असणं शक्यच नव्हतं. पण कृष्ण नावाच्या एका रमणीय व्यक्तित्वावर ती आपला प्राण ओवाळून टाकीत होती. तिला राजवाड्यात परत घेऊन येण्यासाठी मेवाडच्या राजानं शंभर लोक पाठवले होते. या लोकांनी तिची विनंती आर्जवं करावीत, तिला हर प्रयत्नानं परत घेऊन यावं, तिच्यासमोर धरणं धरून बसावं पण तिला घेऊनच यावं असं सांगितलं होतं. कारण ही राजघराण्यातली प्रतिष्ठित राजकन्या आणि राजपत्नी रस्त्यावर कृष्णप्रेमाची गीतं गात धुंद नृत्य करायची. राजघराण्याच्या प्रतिष्ठेला त्यामुळं बाधा येते असं राजाचं मत होतं. पण मीरेला प्रतिष्ठा नको होती. लौकिकाची लाज तिनं केव्हाच सोडून दिली होती. तिच्या शब्दांत, स्थिती गतीत श्वासोच्छ्वासात, प्राणांत आणि प्राणपणानं म्हटलेल्या गीतांत केवळ श्रीकृष्ण होता. मीरा ही जणू राधेची पुनरावृत्ती होती. राधेच्या जन्मात अपुरी राहिलेली प्रेमकहाणी आता मीरेच्या जन्मात पूर्ण होणार होती. ती फक्त कृष्ण जाणत होती. जिनं कृष्णाला जाणलं तिला जाणण्यासारखं आता दुसरं काही उरलं नव्हतं.

आपल्याला परत नेण्यासाठी शेकडो लोक मंदिरात अन्नत्याग करून बसले आहेत हे पाहून तिनं त्यांना म्हटलं, 'कृष्णसख्याच्या संमतीशिवाय मी येऊ शकत नाही. मी माझी नाही मी त्याची आहे. त्याच्या डोळ्यांनी मी पाहते. त्याच्या जीवनानं मी जगते. कृष्ण नावाच्या दीपकाची मी एक ज्योत आहे. एक जळणारी ज्योत. प्रकाश मात्र त्याचा. त्या कृष्णाला विचारल्याशिवाय मी तुमच्याबरोबर येऊ शकत नाही. तुम्ही इथंच थांबा. त्याला विचारून येते.'

असं म्हणून ती मंदिराच्या गाभाऱ्यात गेली. पुन्हा बाहेर आलीच नाही. श्रीकृष्णाच्या मूर्तीत ती समाविष्ट झाली. कृष्ण आणि मीरा असं द्वैत आता उरलंच नाही. प्रेमातल्या अद्वैताचा आनंदानुभव घेत मीरा कृष्ण नावाच्या एका प्रेमडोहात मिसळून गेली. तिला न्यायला आलेले लोक निराशेनं परतले. मीरा त्यांना सापडलीच नाही.

ही कथा पूर्णपणे खोटी आहे असं ज्यांना म्हणायचं असेल त्यांना प्रीतीचं तत्त्वज्ञान कधीही समजणं शक्य नाही. कृष्ण आणि मीरा ही अशी प्रेमकहाणी आहे की ती समजून घेण्यासाठी मीरा तरी झालं पाहिजे किंवा कृष्ण तरी व्हावं लागेल. ज्याला भक्ती कळत नाही त्याला प्रीती काय समजणार ? अग्नीची दाहकता कळण्यासाठी आतून जळावं लागतं. जळल्याशिवाय कळत नाही. मीरा जन्मभर

कृष्णप्रेमाच्या ज्वालेत जळत राहिली म्हणून तिच्या जीवनाचं सुवर्ण उजळून निघालं. भक्ती आणि प्रीती यांची फडकणारी पताका असा मीरेचा उल्लेख केला तर तो सार्थच ठरेल.

कृष्णाचं वेड घेतलेल्या मीरेला शहाणपण येत नाही म्हणून आणि तिच्यामुळं होणारी राजघराण्याची बेअब्रू टाळावी म्हणून तिला विषाचा प्याला देण्यात आला. कृष्णप्रेमाचं गीत गात-गात आणि नाचत नाचत तिनं तो प्याला ओठाला लावला. गीताची रंगत वाढली. नृत्याला आणखी धुंद लय आली. 'मीरा के प्रभु गिरिधर नागर' असं उच्च स्वरात गाताना त्या विषाचं अमृत झालं.

एकदा पुष्पहाराची करंडी म्हणून त्यात सर्प घालून तिच्याकडं पाठवली. मीरेच्या एकतारीवर कृष्णाचंच भावगीत झंकारत होतं. तिनं करंडी उघडून तो सुगंधी फुलांचा हार गळ्यात घातला. माझ्या दृष्टीनं हे चमत्कार नव्हते. अत्यंत घृणास्पद, घाणेरड्या विचारानं आणि वासनेनं अमृत घेतलं तरी त्याचं विषात रूपांतर होतं. अशुद्ध आणि क्षुब्ध मन:स्थितीत पुष्पमालासुद्धा नागिणीप्रमाणं भयानक वाटते. पण कृष्णप्रेमाच्या बेहोषीत नाचणाऱ्या मीरेला सर्प फुलांच्या माळेप्रमाणं दिसला तर त्यात आश्चर्य नाही. जशी दृष्टी तशी सृष्टी. मीरेच्या मनसृष्टीत गिरिधर प्रेमाचं अमृतच होतं. अमृताच्या डोहात डुंबणाऱ्या या प्रेमिकेला विषाचा प्याला काय करणार होता ? शुद्धोत्कट अंत:करणानं पाहताना सर्पाचं रूपांतर पुष्पमालेत झालेलं पाहणाऱ्याच्या दृष्टीला दिसतं. इथं वस्तू महत्त्वाची नाही. दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

मीरा हा काव्यसृष्टीतला एक चमत्कार आहे. आपल्या प्रेमानुभवाचा अर्क काढून तिनं आपल्या गीतात ओतला आहे. त्यामुळं तिची कविता वाङ्मयगुणांचा उच्चांक गाठणारी आहे. स्त्रीचं मन आधीच उत्कट आणि संवेदनशील असतं. त्यातून प्रीतीच्या भावानं अंतर्बाह्य भारलेली आणि आपल्या प्रियकराला जीवनसर्वस्व समर्पित करणारी स्त्री किती तरल आणि उत्कट मनाची असेल याची कल्पना सामान्य माणसाला येणं शक्य नाही. मीरेच्या दृष्टीतली कृष्णप्रेमाची तृष्णा अलौकिक होती. कृष्ण हे तिचं जीवन होतं. आणि कृष्णविरहित जीवन हा तिचा मृत्यू होता. काळाचं अंतर कापून मीरा नावाची एक पक्षिणी कृष्ण नावाच्या प्रेमवृक्षावर जाऊन बसली. तिथंच ती विसावली. त्या वृक्षाचंही जीवन धन्य झालं.

मीरेच्या गीतांचे कित्येक शब्द माझ्या कानामनात रुणझुण करतात. तिची कविता कोणाही रसिकाला दीर्घकाळ सोबत करील अशीच आहे. तिची पुढील

कविता पहावी,

माईरी मै तो लियो गोविन्दो मोल
कोई कहै छाने कोई कहै चौडे लियोरी बजंता ढोल
कोई कहै मुहंगो, कोई कहै सुहंगो लियोरी तराजू मोल
कोई कहै कारो कोई कहै गोरो लियोरी अमोलिक मोल
मीरा के प्रभु गिरिधर नागर

मी त्या श्रीकृष्णाला विकत घेतलं आहे असं मीरा सर्वांना सांगत आहे. घन:श्याम श्रीकृष्णाला कशानं विकत घ्यायचं ? सोनंनाणं देऊन जगाच्या बाजारात पुष्कळ वस्तू मिळतात. पण प्रेमाचा अधिपती कृष्ण विकत घेताना मीरेनं आपल्या संपूर्ण आयुष्याचं मोल दिलं. त्रिभुवनातली संपत्ती पणाला लावली तरी प्रेम विकत मिळत नाही. पण हृदयातली विशुद्ध भावना अर्पण केली की कृष्णासारखा प्रेमाचा चक्रवर्ती हस्तगत होतो. 'मी तो कान्हा जिवाच्या तराजूत तोलून घेतला. ढोल वाजवीत त्याला मनात स्थापन केला. कोणी म्हटलं सुंदर आहे, तर कोणी त्याला असुंदर म्हटलं, कोणी काळा गोरा म्हटलं, कोणी फार महागात पडला तर कोणी स्वस्तात मिळाला असं म्हटलं.' पण मी माझ्या जीवनाची बाजी लावून आणि हृदयाच्या तराजूत तोलून घेतलं आहे. जिवाचं मोल दिल्याशिवाय जिवलग भेटत नाही.'

ही कविता वाचताना रसिक मीरेच्या भावनिक पातळीवर जातो. तो स्वत: मीराच होतो. खरं तर कृष्ण संपत्तीच्या तराजूत तोलता येत नाही. साऱ्या सृष्टीवर प्रेम करणारा तो मुरलीधर साम्राज्याची संपत्ती देऊन देखील मिळू शकत नाही. परंतु मीरेच्या एका आर्त स्पंदनात तो गिरिधर कवेत घेण्याची शक्ती होती. जेव्हा मनच ओंजळीत घेऊन कृष्णचरणांवर वाहावं तेव्हा तो कृष्ण आपल्या मनात वस्तीला येतो. या प्रेमार्त गीतात मीरेनं भरलेला रस तिच्या भावनिक श्रीमंतीची साक्ष देतो. अशी गीतं वाचली म्हणजे दुसरी कोणतीही कविता मनाच्या गाभ्याला स्पर्श करू शकत नाही. आणखी एका हृदयस्पर्शी काव्यात मीरेनं आपल्या आयुष्याची प्रेमकहाणी सांगितली आहे. हातात एकतारी घेऊन गात आणि नाचत असलेली ही कृष्णप्रिया मीरा आपल्या दृष्टीसमोर स्पष्ट उभी राहाते. तिच्या मोहमुद्रेवर तृप्तीची मधुरता आहे. ओठांवरच्या शब्दांतून जणू कृष्ण बासरीचे सूर काढीत आहे. नर्तनात मग्न झालेली मीरा मुक्तपणानं गात आहे.

पग घुंगरू बाँध मीरा नाची रे
मै तो मेरे नारायण की आपहि हो गयी दासी रे
लोग कहै मीरा भई बावरी, सास कहै कुलनासी रे
विष का प्याला राणाजी भेज्या पीवत मीरा हाँसी रे
मीरा के प्रभु गिरिधर नागर, सहज मिले अविनासी रे

लोक म्हणतात, मीरेनं कुळाचा नाश केला. ती स्वैरिणी झाली. परंतु ती तर त्या कृष्णनारायणाची सखी आणि सेविका झाली. माझ्या पायातली घुंगुरं कृष्णाची गीतं गात आहेत. आणि मला माझा अविनाशी असा गिरिधर प्रभू मिळाला आहे. आता माझ्या पावलांना प्रेमाची वाट सापडली आहे. त्या वाटेनं नाचत नाचत मी प्रियाच्या घरी निघाले आहे. ही आशयघन आर्त कविता साहित्यसौंदर्याचं एक उत्तुंग शिखर म्हणावी लागेल.

मीरेच्या या राजस्थानी कवितांचा अनेक भाषांत अनुवाद झाला आहे. पण अखेर अनुवाद तो अनुवादच ! मीरेच्या अतूट आणि पराकोटीच्या प्रणयभावनेचा, भक्तीचा आणि आत्मशक्तीचा अनुवाद कोण कसा करणार ? मीरेची कविता मीरेसारखीच सुंदर आहे. कृष्णप्रेमाची, सुखदु:खाची कहाणी सांगणारी ही कविता अमर आहे. मीरेच्या प्रेमासारखीच अजर आणि अमर आहे. कृष्णप्रेमाच्या उबदार स्पर्शानं उमललेलं मीरेचं जीवनरूप आणि काव्यपुष्प सदैव सुगंधानं दरवळत राहील. एका शाश्वत प्रेमाच्या कहाणीचं गुणगान करीत राहील. तिच्याच शब्दांतून शेवट करू.

मै तो गिरिधर के घर जाऊ
गिरिधर म्हारो साचो प्रीतम देखत रुप लुभाऊँ....

●●●

# वक्ते आणि वक्तृत्व

एकदा एक गृहस्थानं मला प्रश्न विचारला, 'व्याख्यानांच्या निमित्तानं तुम्ही महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेर हिंडत असता. आजपर्यंत किती व्याख्यानं दिली ? व्याख्यानांमुळं समाजाचा काही फायदा होऊ शकतो का ? गावोगाव भटकण्यामुळं तुम्हाला नेमका काय लाभ झाला ? व्याख्यानं देणं ही एक निरर्थक आणि निरुपयोगी गोष्ट आहे असं मला वाटतं. याबद्दल तुमचं काय मत आहे ? तोंडची वाफ दवडणं ही एका अर्थानं सोपी गोष्ट आहे. पण यातून लोकशिक्षणाला थोडीफार तरी चालना मिळते का ? माझ्या मते या उपद्व्यापात आपल्या शक्तीचा आणि बुद्धीचा आपण अपव्यय करू नये. वर्षानुवर्षे व्याख्याने देऊन समाजाच्या स्थितीगतीत तुम्ही अंशमात्र तरी सुधारणा घडवून आणली आहे काय ?'

त्यानं माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. काहीशा आक्रमक स्वरात तो मला विचारीत होता. कदाचित प्रामाणिकपणानं किंवा उपहासानं त्यानं हे प्रश्न मला विचारले असावेत.

मी त्याला शांतपणानं म्हणालो, 'गेली अनेक वर्षं वेगवेगळ्या व्यासपीठांवरून, शाळा कॉलेजांतून, सामाजिक परिषदांतून अनेक विषयांवर मी व्याख्यानं दिली आहेत. त्यांची मोजदाद मी केलेली नाही. समाजाचा माझ्या व्याख्यानांमुळं काही फायदा झाला किंवा होतो असा दावा मी कधीही केला नाही. पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणं व्याख्यानं ही निरुपयोगी आणि निरर्थक गोष्ट आहे असं मला कधीही वाटलेलं नाही. महाराष्ट्रात प्रतिवर्षी शेकडो व्याख्यानमालांतून अनेक वक्त्यांची आणि विचारवंतांची व्याख्यानं होत असतात. ती ऐकण्यासाठी श्रोत्यांची गर्दी होते. तिच्यात सुशिक्षितांप्रमाणं अशिक्षित लोकही असतात. तरुण आणि वृद्धही व्याख्यानं ऐकतात. सभेहून परतताना श्रोत्यांच्या मनात विचार-भावनांची काही वर्तुळं निश्चित उत्पन्न झालेली असतात. त्या शेकडो श्रोत्यांपैकी काही श्रोते ऐकलेल्या विचारांविषयी चर्चा करतात. वक्त्यांची मतं काहींना मान्य किंवा अमान्य होतात. विचारांना चालना देणं, आपल्या व्याख्यानांतून लोकमनावर एखादा विचार बिंबवणं, त्याचं मन वळवणं हे कार्य चांगले व्याख्याते निश्चित करू शकतात. समाजजीवनात आलेली मरगळ

आपल्या प्रभावी विचारधारेनं आणि परिणामकारक शब्दांनी नष्ट करणारे कितीतरी प्रतिभावंत वक्ते होऊन गेले. आजही ती परंपरा चालवणारे विचारवंत आहेत. बहुसंख्य माणसांशी संवाद करण्यासाठी व्याख्यान, प्रवचन यासारखं दुसरं महत्त्वाचं साधन नाही. समाजप्रबोधन व्याख्यानांतून होत असताना वक्त्याचंही प्रबोधन होत असतं. समाजातले अनेक लोक त्याला परिचित होतात. एक व्यापक समाजचित्र त्याच्या दृष्टीसमोर उभं राहतं. लोकमनात खदखदणारे प्रश्न कोणते हे लोकांशी सतत बोलणारा लोकाभिमुख लेखक आणि वक्ता समजू शकतो. केवळ आपल्या वक्तृत्वकलेची आरास मांडणारे आणि समाजजाणीव शून्य असणारे वक्ते निरुपयोगी असतात. शब्द आणि कल्पना यांच्या रंजनापलीकडचं जग ज्यांनी कधी पाहिलेलंच नाही असे वक्ते देखील असू शकतात. पण या काही शब्दवीरांच्या उदाहरणांवरून एकूण वक्तृत्वाचा प्रपंचच निरर्थक असतो असं विधान करणं हास्यास्पद आहे. विचार आणि अर्थ यांनी ओथंबलेले शब्द लोकांच्या अंत:करणात नवनवीन तरंग निर्माण करू शकतात. हृदयाला भिडणारे शब्द बोलणं आपल्याला वाटतं तितकं सुलभ नसतं. जो हृदयापासून बोलतो तो जनहृदयापर्यंत पोहोचू शकतो. याला पांडित्यापेक्षा प्रेमभावनेची अधिक गरज असते. पांडित्याचे शब्द वाऱ्यावर उडून जातात. पण जिवंत भावनेचे जिवंत शब्द जीवनाचा वारा बदलू शकतात.'

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला तो गणेशाच्या भक्तीपेक्षा समाजाची शक्ती वाढवण्यासाठी. त्यांनी दिलेली अनेक व्याख्यानं लोकमनाला घडवणारी होती. टिळकांच्या मार्गानं अनेक देशभक्त गेले. त्यांनी वक्तृत्वाची उपासना केली.

शिवरामपंत परांजपे हे नाव आजच्या पिढीला फारसं परिचित नाही. पण आपल्या ओजस्वी, उपरोधिक, उपहासप्रचुर, अलंकारिक आणि कल्पनारम्य शब्दांतून ते जनतेशी स्फूर्तिदायक संवाद करीत असत. कायद्याच्या कचाट्यात न सापडता इंग्रजी राज्य आणि त्यातले अन्याय याविषयी लोकांच्या मनात प्रक्षोभ कसा निर्माण करायचा या कलेत ते निष्णात होते.

हजारो लोकांनी भरलेल्या एका सभेत ते बोलू लागले. ते म्हणाले, 'लोकहो, इंग्रजांसारखे सत्यवचनी आणि प्रामाणिक लोक तुम्हाला जगात कुठेही सापडणार नाहीत. एकदा एखादा देश त्यांनी आपला म्हटला की प्राण जाईपर्यंत ते कधीही सोडणार नाहीत. अशा प्रामाणिक लोकांचं आपल्यावर राज्य आहे. आपण किती

भाग्यवान आहोत बरं !'

अशी मिस्किलपणानं सुरुवात करून वक्रोक्तीच्या कौशल्यानं तास-दीड तास ते सभा खिळवून ठेवीत. त्यांच्या वक्तृत्वात साहित्याचं सौंदर्य असायचं. अनेक रसांचं रसायन असायचं. त्यांच्या वाणीत मधुरता होती. ते बोलायला उठले की सभेत चैतन्याची लाट पसरायची. रामायण-महाभारतातल्या एखाद्या गोष्टीचा आधार घेऊन इंग्रजांच्या अन्यायी राजवटीवर नाव न घेता ते तुटून पडायचे. एकदा त्यांच्यावर इंग्रजी राज्याविरुद्ध प्रचार केल्याचा आरोप ठेवून सरकारनं खटला भरला होता. तेव्हा त्यांनी आपण महाभारतातली एक गोष्ट लोकांची करमणूक करण्यासाठी सांगितली. यात सरकारविरुद्ध आपण काहीही बोललो नाही. दुर्योधन आणि दुःशासन यांची निंदा केल्याबद्दल तुम्ही माझ्यावर खटला भरता, हा काय चमत्कार आहे ? असा युक्तिवाद केला. रामायण-महाभारतातल्या गोष्टी सांगून समाजाची स्वातंत्र्य-भावना चेतवण्याचं काम आपल्या वक्तृत्वाच्या बळावर शिवरामपंतांनी केलं.

अनेक वक्त्यांच्या भाषणांतून वाणीचे नवनवीन उन्मेष कसे प्रकट होतात याची अनेक उदाहरणं मी देऊ शकेन. कित्येक वर्षांपूर्वी मी बॅ. नाथ पै यांचं व्याख्यान ऐकलं होतं. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर सारखंच प्रभुत्व असलेला तो एक विलक्षण वक्ता होता. लोकसभेत नाथ पै बोलायला लागले की पंतप्रधान पंडित नेहरू आपल्या दालनातून लोकसभेत येऊन बसायचे. लोकसभेत संपूर्ण शांतता पसरायची. खासदार नाथ पैंचा आवाज निनादत राहायचा. त्या काळात लोकसभेत काही अभ्यासू, वक्तृत्वनिपुण असे वक्ते होते. अनेकांची नावं उल्लेखिता येतील. नाथ पै यांच्या एका जाहीर सभेला मी उपस्थित होतो. त्यांचे शब्द वादळी वेगानं वाहत होते. शब्दांत नादसौंदर्य होतं. पण प्रत्येक शब्द उत्कट आवेगानं उमटत होता. सारे श्रोते त्या शब्दांच्या आणि विचारांच्या वादळात आपलं भान हरवून बसले होते. जे विचार नाथ पै यांनी व्यक्त केले ते नवीन नव्हते. पण त्यांची निवेदनशैली नवीन आणि उत्कंठा वाढवणारी होती. शब्दांत आवश्यक तिथं आर्जवीपणा होता. आणि जरूर तिथं आवेश आणि आक्रमकता होती.

चित्रकाराच्या कुंचलीला ज्याप्रमाणं सारे रंग टिपता आले पाहिजेत त्याप्रमाणं वक्त्याच्या शब्दांनाही निरनिराळे रंग आणि ढंग माहीत असले पाहिजेत. उत्तम सजवलेल्या जेवणाच्या टेबलावर रंगीबेरंगी पात्रांतून रुचकर खाद्यपदार्थ मिळावेत त्याप्रमाणं कित्येक वक्त्यांची आकर्षक, रंगतदार भाषणं असतात. आता हे खरं

की, पानाचा प्रत्येक विडा रंगत नाही. त्याप्रमाणं यशस्वी वक्त्याचंही प्रत्येक व्याख्यान रंगत नाही. त्याची अनेक कारणं असतात. कित्येक सभांत अगदी समोरच दहाबारा वर्षांची पोरं आणि पोरी बसलेल्या असल्या की वक्त्याचं व्याख्यान कोसळलंच म्हणून समजावं. श्रोतृवर्गावर आणि त्याच्या रसिकतेवर वक्त्याचं वक्तृत्व अवलंबून असतं.

आमचे एक प्राध्यापक वर्गात आल्यावर प्रथम मुलींच्या बाकाकडं पाहत. त्यावर आपले आवडते श्रोते आहेत असं दिसलं म्हणजे त्यांच्या वक्तृत्वाला भरती येत असे. ज्या दिवशी ती विशिष्ट व्यक्ती गैरहजर असायची त्यादिवशी प्राध्यापक महाशयांची रसवंती आटून जात असे. ते उत्साहात असले म्हणजे त्यांच्या भाषणाला बहर यायचा. ही अगदीच व्यक्तिगत गोष्ट झाली. पण सभेतलं वातावरण, श्रोत्यांचा प्रतिसाद, ध्वनिक्षेपकाची उचित योजना अशा अनेक घटकांमुळं वक्तृत्व रंगत जातं.

एकदा आचार्य अत्रे सभास्थानी आले तेव्हा त्यांच्या अपेक्षेइतके श्रोते जमलेले नव्हते. ते म्हणाले, 'मी समुद्रात पोहणारा माणूस आहे. ओढ्याच्या गुडघ्याइतक्या पाण्यात डुंबणं मला जमत नाही.' असं म्हणून अवघ्या सात-आठ मिनिटात भाषण संपवून ते निघून गेले.

कित्येक वेळा अरसिक आणि अडाणी श्रोत्यांसमोर एखादा महत्त्वाचा विषय कितीही चांगल्या पद्धतीनं मांडला तरी श्रोत्यांचे चेहरे निर्विकार असतात. त्यांच्या चेहऱ्यावरची माशीसुद्धा हलत नाही. किंवा हाललीच तर फक्त माशीच हलते. चेहऱ्याची हालचाल होत नाही. तिथं बृहस्पती तरी काय बोलणार ? समर्थ रामदासांनी श्रोत्यांच्या अवलक्षणांविषयी 'दासबोधात' एक समास लिहिला आहे. प्रवचनाचं श्रवण करायला आलेल्या लोकांबद्दल ते म्हणतात,

विषयी लोक श्रवणी येती।
ते बायकांकडेच पाहाती ॥
चोरटे लोक चोरून जाती।
पादरक्षा ॥

सर्वच लोक आपलं भाषण ऐकायला आले आहेत अशा भ्रमात वक्त्यानं राहू नये. सभेला आलेल्या स्त्रिया हा देखील काही श्रोत्यांच्या आकर्षणाचा विषय असतो.

मी एकदा कॉलेजात सुमारे दोनशे विद्यार्थ्यांच्या वर्गासमोर बोलत होतो.

पाठीमागच्या बाकावरील काही विद्यार्थी एकटक विद्यार्थिनींच्या बाकाकडे पाहत होते. मी थोडा वेळ ते सहन केलं. नंतर त्या विद्यार्थ्यांना उभं करून म्हणालो, 'माझ्या विवेचनापेक्षा अधिक महत्त्वाच्या कार्याकडं तुमचं लक्ष आहे हे माझ्या लक्षात आलं आहे. आता एवढंच सांगतो की माझं भाषण संपेपर्यंत डावीकडं मान न वळवता माझ्याकडेच पाहत रहा. मी फारसं प्रेक्षणीय स्थळ नाही पण तरीही माझ्याकडं पहा.' वर्गात हास्याचा स्फोट झाला. त्या वात्रट मुलांनी मान खाली घातली. व्याख्यान संपेपर्यंत वर केली नाही. पण अशा विक्षेपामुळं बोलण्याची घडी विस्कटते.

मनासारखं बोलण्याचा आणि मनापासून ऐकण्याचा एक आगळा आनंद असतो. तो घेतला पाहिजे. व्याख्यानांमुळं समाज बदलतो का ? असले प्रश्न कुत्सितपणानं विचारणारे टीकाखोर कमी नसतात. एका टीकाकाराला मी म्हणालो होतो, 'माझ्या व्याख्यानानं समाज बदलणार नाही. तो आहे तिथंच राहील. पण तुम्ही व्याख्यान द्यायला लागलात तर समाज शिल्लकच राहाणार नाही. त्याला पळता भुई थोडी होईल.' पुन्हा तो टीकाकार माझ्या वाटेला गेला नाही.

कोणी काही म्हटलं तरी चांगलं वक्तृत्व हे समाजप्रबोधनाचं साधन आहे. सानेगुरुजींच्या भाषणात उत्कट तळमळ होती. अतूट समाजप्रेम होतं. कॉम्रेड डांगे, शंकरराव मोरे, माधवराव बागल, वि. स. खांडेकर, अच्युतराव पटवर्धन, नाना पाटील असे वेगवेगळे वक्ते मी मन:पूर्वक ऐकले. प्रत्येकाच्या वाणीत आगळं सामर्थ्य आणि सौंदर्य होतं. महाराष्ट्रात अनेक विचारवंत वक्त्यांनी वक्तृत्वाची श्रीमंत परंपरा निर्माण केली आहे. लोकांशी बोलण्याची, लोकमन समजून घेण्याची आणि लोकमनात विचार पेरण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या लोकांनी बोलण्याचा अभ्यास करावा. काही प्रमाणात वक्तृत्व निसर्गदत्त असतं. पण बऱ्याच प्रमाणात त्याची आराधना करता येते. समाजावर आणि विचारावर प्रेम करणारा वक्ता हा आदराचा विषय ठरतो. यापेक्षा अधिक काय सांगणार ?

●●●

# जीवनाचा अर्थ काय ?

जीवन विचित्र आणि दु:खदायक आहे हे सांगायला कुणा तत्त्वज्ञाची जरूर नाही. जगणाऱ्या प्रत्येकाला ही विचित्रता जाणवत असते. आपलं जीवन आपण घडवू शकतो असं म्हटलं जातं. अनेक विचारवंतांनी हा विचार सांगितलेला असला तरी माणसाचं हट्टी आयुष्य त्याच्या हातात नसतं. जीवनाचा प्रवाह वेड्यावाकड्या वळणांनी वाहत असतो. त्या धावत्या प्रवाहाला विशिष्ट दिशा मिळावी म्हणून आग्रह धरला तरी ते साध्य होईल असं बहुधा घडत नाही. अनेक प्रकारच्या चमत्कारिक आणि तर्कशून्य घटनांनी, योगायोगांनी जीवन भरलेलं असतं. 'मनसा चिंतितं एकं दैवमन्य चिन्तयेत्.'

मनुष्य काहीतरी निर्णय घेतो. पण कित्येक वेळा नियतीनं वेगळाच विचार केलेला असतो. इथं मी मानवी कर्तृत्व आणि नियती हा वाद उपस्थित करीत नाही. आपल्या आकलनात येणार नाही अशा कितीतरी अगम्य घटना सभोवताली घडतात. आपल्याही आयुष्यात त्या घडत असतात. त्यामुळंच जीवनाविषयी ठाम विश्वासानं बोलण्यात अर्थ नसतो. प्रत्येकालाच आपल्या इच्छेप्रमाणं आपल्या जीविताला आकार देता आला असता तर हे जीवन एखाद्या हिशेबाच्या चोपडी इतकं आळणी, गद्यप्राय होऊन बसलं असतं. आपण सर्वजण जीवनाच्या घोड्यावर मांड ठोकून बसलो असलो तरी या घोड्याचे लगाम खरोखरच आपल्या हातात आहेत काय ? आपण घोड्याला पळवतो की घोडा आपल्याला घेऊन पळतो ? नाठाळ घोडा बेफाम वेगानं दौडत निघाला की हातात लगाम असूनही घोडेस्वाराचं भवितव्य सांगणं कठीण असतं.

एका लांबलचक घाटातून एक गाडी वेगानं खाली उतरत होती.तिचे ब्रेक्स् निकामी झाले होते. उतारामुळं गाडीचा वेग प्रतिक्षणी वाढत होता. आतले प्रवासी घाबरून किंकाळ्या फोडत होते. सुबक आकाराची ती नवी कोरी गाडी अखेर खालच्या भयानक दरीत कोसळली. आणि तिचे व प्रवाशांच्या जीवनाचे तुकडे तुकडे झाले. गाडीत एक सेनाधिकारी होता. लक्षावधी रसिकांना वेड लावणारी एक सुंदर नटी होती. एक प्रसिद्ध ज्योतिषी होता. निरनिराळ्या क्षेत्रांतले महत्त्वाचे

लोक होते. सर्वांनाच आपल्या क्रूर मिठीत मृत्यूनं क्षणार्धात ओढून घेतलं होतं. कोणी म्हणेल हा अपघात आहे. कोणी याला एक दुर्दैवी घटना असं म्हणेल. काहीही म्हणा ! पण जीवन आपल्या हातात असतं हा विचार किती खोटा, किती अविश्वसनीय असतो याचं हे प्रत्यंतर आहे.

जीवनाचं पाणी फसवं असतं. दिसायला ते संथ आणि स्वच्छ दिसतं. म्हणून विश्वासानं पाय टाकला की पुष्कळ वेळा ते तळाशी ओढून नेतं. अशा घटनेची चिकित्सा वेगवेगळ्या विचारांनी करता येईल. पण ही चिकित्सा केली म्हणून जीवनाचे लगाम पूर्णपणे आपल्या हाती येतील काय ? रामचंद्रासारखा शूरवीर, गुणवान पुत्र आपल्या डोळ्यांदेखत चौदा वर्षे वनवासाला पाठवण्याची आपत्ती आपल्यावर येणार आहे हे दशरथाला कोणी सांगितलं असतं तर तो हसला असता. राजप्रासादात सीतेबरोबर सुखानं राहणाऱ्या रामचंद्राला तरी ही कल्पना होती काय? श्रीकृष्णासारख्या योगेश्वराला आपली द्वारका जळत असलेली आणि त्यात सारं यादवसैन्य नष्ट होत असलेलं पाहावं लागणार आहे याची जाणीव होती काय ? रामकृष्णांनाही जे कळत नव्हतं ते सर्वसामान्य माणसांना कसं कळणार ? आपण एवढंच म्हणतो की, जीवन रहस्यमय आहे. केव्हा काय घडेल हे सांगता येत नाही.

पण म्हणूनच जीवनाचा हा चमत्कृतिपूर्ण खेळ रंगत जातो. कधी आकर्षक वाटतो तर कधी दु:खदायक होतो. जीवन हे कांचनमृगासारखं आहे. ते खोटं आहे हे समजून देखील त्याचा मोह सुटत नाही. त्याच्या पाठीमागं ऊर फुटेपर्यंत धावणं आणि धावण्यातला उन्माद अनुभवणं व अखेर विफलतेनं दु:खी होणं एवढंच आपल्या हाती आहे. कांचनमृग आपल्या लहरीप्रमाणं हुलकावण्या देत पळत असतो. प्रत्यक्ष रामचंद्रालाही तो सापडला नाही. आपणही असेच कुठल्या ना कुठल्या कांचनमृगामागं धावत असतो.

मी नियतीवादाचा समर्थक नाही. पण मला जीवनाच्या अगम्यतेवर बोलायचं आहे. ते समजलं असं वाटतं आणि त्याचवेळी ते अधिकच रहस्यमय बनलेलं असतं. ते समजून घेण्यासाठी आजपर्यंत कितीतरी प्रतिभावंतांनी जंगजंग पछाडले, प्रज्ञावंतांनी दंड थोपटले. बलवंतांनी ते मुठीत पकडण्याचा प्रयत्न केला. बल, बुद्धी आणि प्रतिभा यांनाही जीवनाचा अर्थ तर राहू द्याच पण जीवनाचा अल्पस्वल्प भाग देखील सापडलेला नाही. मग माणसानं आपल्या बुद्धीचा गर्व कशासाठी करावा? अरे, जे आयुष्य तुम्ही जगता ते काय नि कसे आहे हे सुद्धा

समजत नसेल तर आपल्या पराभूत बुद्धीचे डिंडिम कशाला वाजवीत बसला आहात ? जीवनात प्रवेश करणं आणि जीवनातून उठून जाणं तेही आपल्या इच्छेशिवाय. इतकंच आपल्या हाती आहे. खरं तर आपले हात रिकामेच आहेत.

या अनाकलनीय जीवनात अनेक आश्चर्यजनक गोष्टी घडतात. अकल्पित आणि अघटित असं हे मानवी जीवन चमत्कृतींनी संपूर्णपणे नटलेलं आहे. यात अद्‌भुतता आहे. कारुण्य आणि हास्यही आहे. बीभत्सता व भयानकताही आहे. सारे रस आहेत. रंगही तऱ्हेतऱ्हेचे आहेत.

भर्तृहरीनं 'वैराग्यशतक' या नावाचं काव्य लिहिलं आहे. त्यातल्या एका श्लोकात त्यानं स्वत:चा, आपल्या पत्नीचा आणि मदनाचा धि:कार केला आहे. राजा भर्तृहरी विरक्त का झाला हे त्या श्लोकावरून कळतं. प्रत्यक्ष घटना तपशीलानं त्यानं सांगितली नाही.

पण आख्यायिका गमतीदार आहे. एके दिवशी एक तपस्वी भर्तृहरीच्या दरबारात आला. त्याला सिद्धी प्राप्त झाली होती. त्यानं आपल्या झोळीतून एक फळ काढून ते राजाला दिलं. तो साधू म्हणाला, 'राजा, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. हे फळ तुला देतो. हे खाल्ल्यावर तू अमर होशील. मृत्यूला जिंकणारं हे फळ आहे.'

राजानं ते फळ स्वीकारलं. पण त्यानं ते खाल्लं नाही. त्याचं आपल्या पत्नीवर विलक्षण प्रेम होतं. तिला कधीही मृत्यू येऊ नये म्हणून त्या फळाचा अलौकिक गुणधर्म सांगून ते त्यानं पत्नीच्या हाती दिलं. तिला आनंद वाटला. पण तिनं ते आपल्या प्रियकराला खाण्यासाठी दिलं. त्या प्रियकरानं आपल्या दुसऱ्या प्रेयसीला प्रेमानं दिलं. पण तिचं प्रेम भर्तृहरीवर होतं. तिनं ते फळ प्रेमाची भेट म्हणून राजाला दिलं. भर्तृहरी स्तंभित झाला. त्याला प्रचंड उद्वेग आला. मी जिच्यावर प्रेम करतो ती मात्र दुसऱ्यावरच अनुरक्त झाली आहे. कोणाचंच कोणावर प्रामाणिक प्रेम नाही. या विचारानं तो हताश झाला. त्याच्या दृष्टीनं जीवनातलं स्वारस्य संपून गेलं. त्यानं संन्यास घेतला अशी कथा आहे. वैराग्यशतकातला श्लोक संस्कृतात आहे. त्याचं मराठी रूपांतर इथं देतो,

मी जीस चिंतित असे न रुचे तिला मी
माने तिला अपर तो पर अन्यगामी
संतुष्ट मद्विषयी अन्य वधूच पाही
धिक् तीस, त्यास, मदनास, मला, हिलाही

ही घटना कुणाचीही मती गुंग करून टाकील अशीच आहे. अशा अद्‌भुत घटना आयुष्यात घडतात. हा योगायोगही असेल. पण हा भर्तृहरीच्या किंवा कुणाच्या तरी आयुष्यात का आणि कसा घडतो तेच कळत नाही. जीवनाच्या खोल कुहरात कदाचित रत्नांचं भांडार लपलं असेल किंवा त्यात विषारी सर्पांचं वारुळही असू शकेल. निश्चित काही जीवनाबद्दल बोलता येऊ नये हे मात्र निश्चित आहे. कितीही विचार केला तरी जीवनाचं कोडं उलगडत नाही.

एका कवीनं म्हटलं आहे, 'Life hath more awe than death' 'मरणापेक्षाही जीवित अधिक भीतीदायक आहे.'

या विधानातल्या सत्याचा अनुभव असंख्य लोकांना येतो. मरणाचं दु:ख एकदाच भोगावं लागेल. पण सदैव चंचल, सदैव अनिश्चित आणि अवघड असलेल्या जीवनाची भीती कमी कशी करायची हा एक यक्षप्रश्न आहे. 'आयुष्य ही एका वेड्यानं सांगितलेली अर्थशून्य कहाणी आहे.' असं शेक्सपिअरनं म्हटलं आहे. पण तरीही या जीविताच्या इंद्रजालात असं एक मोहन लपलेलं आहे की त्याचं पुन्हा पुन्हा आकर्षण वाटत राहतं. आयुष्यात दु:ख दैन्य आहे, निराशा आणि लाचारी आहे. नाना प्रकारचे खाचखळगे आहेत. काटेकुटेही आहेत. पण फुलांच्या गंधाची एखादी पुसटशी झुळुक थंड वाऱ्याबरोबर येते आणि जीवनाची ओढ पुन्हा वाटू लागते. कितीही कष्टप्रद असलं तरी त्याच्या पाशात गुरफटून जाणं मनुष्याला सुखावह वाटतं. या जीवनाची निंदा साधुसंतांनी परोपरीनं केली आहे. त्या निंदेत अतिशयोक्ती असेल पण असत्य नाही.

कवी तिरुवल्लुवर म्हणतो, 'दुसऱ्या क्षणाचीही आपणास शाश्वती नसते. परंतु आपण किती दूरचा विचार करीत जीवनाला बिलगून बसतो !'

जैन साहित्यात जीवनमोहावर भाष्य करणारी एक रूपककथा आहे. तिचा आशय असा. एक मनुष्य भयानक अरण्यातल्या एका वृक्षाच्या फांदीला लोंबकळत आहे. बरोबर त्या फांदीखाली एक भयाण खोल विहीर आहे. विहीरीच्या काठावर महासर्प त्या माणसाकडे पाहत जिभल्या चाटीत बसले आहेत. त्या वृक्षाला काळेपांढरे उंदीर कुरतडत आहेत. फांदीवर मधमाशांचे एक मोहोळ असून त्यातून काही थेंब लोंबकळणाऱ्या माणसाच्या तोंडात पडत आहेत. त्याला मधमाशा जागोजागी दंश करीत आहेत. वृक्षाच्या शेंड्याजवळ एक देवविमान त्या माणसाची सुटका करण्यासाठी आलेलं असून 'चल ताबडतोब विमानात ये. तुझी या भीषण

परिस्थितीतून मुक्तता होईल.' असं देव सांगत आहे. पण लोंबकळणारा हा माणूस 'आणखी एकच मधाचा थेंब तोंडात पडू' द्या असं पुन्हा पुन्हा म्हणत तसाच लोंबकळत राहिला आहे. जीवनातल्या सुखाचं हे स्वरूप मधुबिंदूसारखं आहे. एका बिंदूसाठी साऱ्या आपदा-विपदा माणूस भोगतो. पण जीवनाचा मोह मात्र सुटत नाही. ते काळे पांढरे उंदीर म्हणजे आयुष्याचा वृक्ष कुरतडणारे दिवस आणि रात्री आहेत. फार गमतीदार पण उद्बोधक आणि माणसाच्या आसक्तीवर मार्मिक भाष्य करणारी ही कथा मला नेहमी आठवते.

मी इतकंच म्हणतो की, दु:खांच्या गर्दीतसुद्धा मनुष्यानं सुखाचा शोध करावा. आयुष्य बेभरवशाचं आहे यात शंका नाही. पण तरीही आयुष्याची वाट चालत राहिलं पाहिजे. दु:खसंकटांचं जीवनसुद्धा नाकारण्यापेक्षा स्वीकारलं पाहिजे. या जीवनावर प्रेम केलं पाहिजे. दु:ख करावं असं पुष्कळ असलं तरी प्रेम करावं असंही थोडंसं आहे. कदाचित माझे विचार तर्कशुद्ध नसतील. खरं आहे. कोणत्याही तर्काच्या चौकटीत हे मानवी जीवन बसत नाही. पण त्याच्यावर प्रेम केलं तर तेही आपल्याला वश होऊन आपल्यावर प्रेम करू लागेल.

●●●

# घनु वाजे घुणघुणा !

संतांच्या कवितेत केवळ भक्तिरसाचेच तरंग उमटलेले आहेत असं कित्येकांना वाटतं. पण हा एक गैरसमज आहे. संतांचं जीवनावर प्रेम होतं. जीवनातल्या अनेक रसरंगांवर ते लुब्ध होते. जीवनसौंदर्याकडं त्यांनी पाठ फिरवलेली नव्हती. त्यांची अभिरुची आणि दृष्टी संस्कारित असल्यामुळं त्यांची सौंदर्यभावना आणि आस्वादवृत्ती उन्नत स्वरूपाची होती. 'ज्ञानेश्वरी' वाचताना ज्ञानेश्वरांच्या हृदयातले सौंदर्यभावनेचे अनेक रंग आपल्याला दिसतात. एकनाथ आणि तुकाराम यांच्या काव्यातही हाच प्रत्यय येतो. संत हा एक उच्च पातळीवरील जीवन जगणारा 'माणूसच' असतो. त्यालाही सृष्टीतली अनेकविध सुंदरता मोह घालते. स्त्रीसौंदर्याचंही उत्कट स्तोत्र तो शुद्ध मनानं गाऊ शकतो. प्रेम आणि शृंगार हे जीवनाला तृप्त करणारे रस त्याच्याही मनाला भावतात. नाहीतरी संतांच्या संपूर्ण वाङ्मयाच्या मुळाशी प्रेम नावाचा रस आहे याची प्रतीती रसिकांना येतच असते. माणसांवरील प्रेम आणि जीवनातील विविध रसांवरील ममता संत काव्यात प्राधान्यानं आढळते. विठ्ठल या दैवताचंही संतांनी आपल्या साहित्यात मानुषीकरण केलेलं दिसतं. विठ्ठल आपल्या भक्तांशी बोलतो, हसतो, भूक-तहान लागली म्हणून भक्तांच्या घरी जाऊन अन्न घेतो. देवाचं मनुष्यपण चित्रित करणं हे उदाहरण जीवनप्रेमाचंच द्योतक आहे. संतांच्याही मनात विविधस्वरूपी रसभावनांचं चांदणं फुललेलं होतं. त्यामुळं त्यांची लेखणी केवळ भक्तीचेच सूर आळवीत राहिली हे विधान चुकीचं आहे.

एकदा एक पढीक विद्वान संतसाहित्यावर टीका करताना म्हणाले, 'विठ्ठलाच्या नामघोषात बुडालेल्या संतकवींना माणसाच्या आयुष्यातले सुखदुःखांचे स्पर्श फारसे समजले नाहीत. माणसाचं आयुष्य एकरंगी किंवा एकपदरी नसतं. भक्ती ही समर्थ भावना असेल पण स्त्री-पुरुषांतली प्रीती आणि त्यांना परस्परांसंबंधी वाटणारी ओढ कोणत्यातरी संतानं समजून घेतली आहे काय ? शृंगारात देखील उत्कटता आहे. व्याकुळता आहे. आपलं सर्वस्व अर्पण करण्याची तीव्र इच्छा प्रेमभावनेत असते. तिचं प्रतिबिंब संतकाव्यात आढळत नाही. चंद्राचं चांदणं,

उगवत्या सूर्याचा किरणोत्सव, सागराच्या नर्तनलाटा, पक्ष्यांचं चित्रविचित्र संगीत या संतांना समजलं होतं का ? त्यांना केवळ पंढरी दिसत होती. आणि कटीवर हात ठेवून उभा असलेला पांडुरंग तेवढा सुंदर वाटत होता. किती भिन्नाभिन्न सुंदरतेचे गंध सृष्टीत विखुरलेले आहेत हे त्यांना कधी जाणवलंच नाही. त्यांच्या एकतारीवर विठ्ठलनामाचा एकच स्वर मुखरित होत होता. माझ्या मते संत हे केवळ भक्त होते. ते रसिक नव्हते. मानवी मनातल्या भावभावनांचे हळवे मधुर झंकार त्यांना कधी ऐकू आले नाहीत. त्यामुळं संतसाहित्य हे विरक्तांचं, निवृत्तिमार्गी लोकांचं साहित्य आहे. प्रवृत्तीचे रंग त्यात नाहीत. जे वाङ्मय एकाच भावनेनं माखलेलं असतं ते श्रेष्ठ साहित्यात जागा मिळवू शकत नाही. संतांनी देव सांगितला, 'माणूस' मात्र पाहिलाच नाही.'

त्या पंडितानं संतसाहित्यावर केलेली टीका त्याच्या अज्ञानावर स्वच्छ प्रकाश टाकणारी होती. साहित्याच्या प्रांतात अर्ध्या हळकुंडानं पिवळं झालेले समीक्षक पुष्कळ भेटतात. एकतर यांचा व्यासंग अर्धवट असतो. मूळ साहित्याचं संपूर्ण वाचन त्यांनी केलेलं नसतं. समीक्षणासाठी रसिकता आणि पांडित्य या दोहोंचीही जरूर असते. दोन्ही गोष्टींचा अभाव असेल तर अज्ञानाचा प्रभाव कसा पडतो याचं हे तथाकथित विद्वान म्हणजे चांगलं उदाहरण होतं.

खरं तर 'ज्ञानेश्वरी' नवरसात्मक आहे. शृंगार रसाचेही पाझर ज्ञानेश्वरीत आढळतात. स्वत: संत ज्ञानेश्वर हे बालब्रह्मचारी होते. परंतु शृंगारातली सुंदरता आणि उत्कटता या महाकवीला अनाकलनीय होती असं म्हणता येईल काय ? रसानुभूती परोक्षपणे देखील घेता येते. आणि ती प्रत्यक्ष अनुभूतीपेक्षा अधिक उत्कट असू शकते.

अलीकडच्या साहित्यातलं एक उदाहरण देतो. हरिभाऊ आपटे यांनी स्त्रीमनाची अनेक लहानमोठी दु:खे चित्रित केली. स्त्रीभावनांचं सूक्ष्म चित्र त्यांनी कुशलतेनं स्पष्ट केलं. स्त्रीचं दु:ख या पुरुषाला कसं कळलं ? पुरुष असूनही स्त्रीमनाची अनुभूती हरिभाऊ देऊ शकतात. तर ज्ञानेश्वरांसारख्या षोडशवर्षीय बालकाला शृंगाराचा रंग का कळणार नाही ? हे कविप्रतिभेचं सामर्थ्य असतं. 'जे न देखे रवी ते देखे कवी' हेच खरं. ज्ञानेश्वर हे अत्यंत मृदु, तरल आणि चपल प्रतिभेचे कवी होते. त्यांच्या संवेद्य मनाला जगाची सुखदु:खं कळत होती. माणसाचे सगळे रंग ते जाणत होते. म्हणूनच ज्ञानेश्वर शृंगाररसाचंही चित्रीकरण करू शकले. चंद्रसूर्याचे

उदयास्त, समुद्राच्या लाटांचं क्रीडन, आकाशाची असीम निळाई, कोवळ्या फुलांचा गंध, नवयौवनेचं रूपलावण्य, इत्यादी अनेकविध सौंदर्याची दर्शनं त्यांनी रंगवली आहेत. जीवन हा त्यांच्या दृष्टीनं रसविषय होता. शांतरसाचा हृद्य आविष्कार ज्ञानेश्वरीत झाला असला तरी शृंगारालाही अवसर त्यांनी दिला आहे. चंद्र आणि चंद्रविकासी कमलिनी यांच्या काव्यमय शृंगाराचं चित्र ज्ञानेश्वर कसं रेखाटतात ते पाहण्यासारखं आहे.

का आपुला ठावो न संडिता। आळंगिजे चंद्रु प्रकटिता।
ऐसा अनुरागु भोगिता। कुमुदिनी जाणे ॥

चंद्राचा उदय झाल्याबरोबर ही कमालिनी अंतरंगातून फुलते. ती त्याला आहे त्या स्थानावरूनच गाढ आलिंगन देते. हा प्रेमानुराग केवळ ती कुमुदिनीच जाणू शकते. अशरीरी इंद्रियातीत प्रेमाचं (Platonic Love चे) हे सुंदर उदाहरण त्यांनी दिलं आहे. कमालिनी आणि भ्रमर यांच्या प्रेमाचे दाखले कित्येक ठिकाणी ज्ञानेश्वर मार्मिकपणे देतात.

का कमळावरी भ्रमर। पाय ठेवी सुकुमार।
कुचंबैल केसर। इया शंका ॥

कमळावर पाय ठेवताना त्यातले केसर कुचंबले जाऊ नयेत म्हणून भ्रमर आपले पाय अत्यंत हळुवारपणे ठेवतो. आणखी एक मार्मिक दृष्टान्त कमल आणि भ्रमर यांच्या प्रेमाचा स्पष्ट केला आहे.

जैसे भ्रमरतरी भेदी कोडे। भलतैसे काष्ठ कोरडे।
परि प्रेमभावे कमळदळ। चीरू नेणे ॥

कठीण लाकूड पोखरणारा भुंगा संध्याकाळच्या वेळी कमालिनीच्या कोषात सापडतो. सूर्यास्ताबरोबर कमळ मिटून जातं. कोरडं लाकूड कोरणारा तो भ्रमर कमळाची पाकळी सहज चिरू शकतो. पण प्रेमातिशयानं त्या मिटलेल्या कमळात तो मरणाला सामोरा जातो. कमलपत्राचा मात्र तो छेद करीत नाही. प्रेमभावनेची महती सांगताना हा अर्थपूर्ण दृष्टान्त ज्ञानेश्वरांनी घेतला आहे. चंद्र आणि पौर्णिमा यांचं मीलन एका ठिकाणी त्यांनी वर्णिलं आहे. प्रियकर आणि प्रेयसी यांच्या प्रेमाचंही दर्शन काही ओव्यांतून ते घडवतात. नवयुवतीच्या खुलत चाललेल्या देहसौंदर्याचं कथन ते हळुवार सौंदर्यदृष्टीनं करतात.

की प्रथमवयसा काली। लावण्याची नव्हाळी।

प्रकटे जैसी आगळी। अंगना अंगी॥

'लावण्याची नव्हाळी' हा अत्यंत अनुरूप शब्द ज्ञानेश्वरांनी योजला आहे. महाभारताची प्रशस्ती करताना त्याच्या सौंदर्यवर्णनासाठी हा दृष्टान्त त्यांनी घेतला आहे. वसंत ऋतूतल्या चांदण्या रात्री प्रिय व्यक्तीच्या सान्निध्यात कसं सुख लाभतं याचंही वर्णन त्यांनी केलं आहे. ज्या गीतेवर त्यांनी भाष्य केलं त्या गीतेत कुठेही शृंगाररसाचा उल्लेखही नाही. पण ज्ञानेश्वर हे सौंदर्यनिर्मिती करणारे अभिजात कवी आहेत. गीतेतला आशय विशद करताना काही स्थळी त्यांनी शृंगाररसाचंही सिंचन केलं आहे. गीतेसारखा गद्यप्रकृतीचा ग्रंथ जेव्हा ज्ञानेश्वरांच्या प्रतिभारसानं न्हाऊन निघतो तेव्हा ज्ञानेश्वरीचं लावण्य शतगुणित होतं.

ज्ञानेश्वरीतली अशी आणखीही कित्येक शृंगारस्थळं उल्लेखिता येतील. पण ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या विराण्या अधिक शृंगारानं नटलेल्या आहेत. 'विराणी' म्हणजे विरहिणी. परमेश्वराला प्रियकर मानून विरहिणीच्या प्रणय व्याकुळतेतून लिहिलं गेलेलं विरहगीत म्हणजे विराणी. भक्तीच्या तीव्रतेचं परिणमन रतिभावनेत होऊ शकतं. संतकवींच्या अंत:करणात कृष्णमीलनासाठी आसुसलेल्या राधिकेची आतुरता आहे. ही विरहिणी आपल्या प्रियकराला आर्त साद घालते. तिच्या मनातली वेदना आणि प्रीती विरहशृंगाराचं रूप घेऊन प्रकट होते. ज्ञानेश्वरांचे असे भावनेनं भिजलेले कितीतरी अभंग आहेत. ते वाचताना शृंगाररससुद्धा या संतकवीनं नाकारलेला नाही हे लक्षात येतं. ज्ञानेश्वरांची अत्यंत निकोप आणि उत्कट अशी जीवनासक्ती कित्येक सुंदर कवितांच्या रूपानं साकार झाली आहे.

परमेश्वराला प्रियकर मानण्यात आणि आपल्या काव्यातून त्याचा अनुनय करण्यात काहीही अनुचित नाही. काही सोवळ्या टीकाकारांना संतांनी लिहिलेली विरहोत्कट गीतं किंवा शृंगारगीतं अनुचित वाटतात. पण इतक्या अतिरेकी, सोवळ्या आणि रुक्ष दृष्टिकोनातून या काव्याकडं पाहण्यात अर्थ नाही. एकनाथ आणि तुकाराम यांच्या काव्यात ही भावना व्यक्त झाली आहे. रसिक कविमनाचे हे व्यापार वाचकांनीही नीट समजून घेतले पाहिजेत. भक्तीचं आत्यंतिक टोक म्हणजे संपूर्ण समर्पणशीलता. एखाद्या प्रेयसीनं प्रियतमाच्या व्यक्तित्वात पूर्णतया मिसळून जावं तशा या संतांच्या विराण्या आहेत. नदीनं समुद्रात विलीन व्हावं. त्याप्रमाणं भक्त परमेश्वराच्या प्रीतीत आणि भक्तीत समग्रपणानं विलीन होऊन जातो. ही अद्वैत भक्ती रतिभावनेचं रूप घेऊन कित्येक गीतांतून व्यक्त होते. प्रियकर आणि प्रेयसी

यांचं एकरूपत्व प्रकट करणारी गीतं म्हणजे या विराण्या आहेत.

चैतन्य महाप्रभू या कृष्णभक्ताबद्दल असं सांगतात की, तो श्रीकृष्णाची प्रार्थना करताना गोपिकेची वेषभूषा करून कृष्णमूर्तीसमोर नृत्य करीत असे. स्त्रीचं मन हे पुरुषापेक्षा अधिक आर्त, उत्कट आणि समर्पणशील असतं. दुधात साखर मिसळून एकरस व्हावी त्याप्रमाणं कृष्णप्रेमात गोपिका सम्मीलित झाल्या होत्या. ती भूमिका संतकाव्यातही आढळते. 'मधुराभक्ती' असं नाव या भक्तीला दिलं आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारखे श्रेष्ठ ज्ञानी भक्तही जेव्हा विराणीसारखी रचना करतात तेव्हा त्यांच्या भावविभोर मन:स्थितीची कल्पना येते. कवितेसारखा वाङ्मयप्रकार देखील स्त्रीमनाच्या मुशीतून प्रकट होतो. तेव्हा त्याला आगळं सौंदर्य लाभतं. ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' काव्यसौंदर्यानं नटलेली आहे. पण त्यांनी लिहिलेल्या विराण्या कृष्णप्रेमानं अंतर्बाह्य भिजलेल्या आहेत. अभंगांतून ज्ञानेश्वराचं सुकुमार हळवं आणि प्रेममय भक्तिसंपन्न मन जाणवत राहातं. त्यांनी लिहिलेली पुढील विराणी या विधानाची साक्ष देईल.

घनु वाजे घुणघुणा वारा वाहे रुणझुणा।
भवतारकु हा कान्हा वेगी भेटवा का॥
चांद वो चांदणे चापे वो चंदनु।
देवकीनंदनु वीण अणू नावडे वो॥
चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी।
कान्हो वनमाळी वेगी भेटवा का।
सुमनाची सेज सितळ वो निकी।
पोळे आगीसारखी वेगी विझवा का॥
तुम्ही गातसा सुस्वरे ऐकोनि द्या उत्तरे।
कोकिळे वर्जावे तुम्ही बाईयांनो॥
दर्पणी पाहता रूप न दिसे आपुले।
बाप रखुमादेविवरे विठ्ठले मज ऐसे केले॥

विरहिणीच्या रूपात आपली प्रेमार्त भक्ती साकार करणारा हा नादमय अभंग ज्ञानेश्वरांच्या भावस्थितीची जाणीव देणारा आहे. या अभंगात दाटून आलेल्या मेघांचं आणि त्यांच्या ध्वनीचं दृक्‌चित्र त्यांनी रेखाटलं आहे. वारा रुणझुणत आहे. अशावेळी कृष्णकन्हैयाच्या भेटीसाठी आतुरलेलं तळमळणारं प्रेम इथं समूर्त झालं

आहे. या कवितेत चंद्र आहे, चांदणं आहे. चाफा आणि चंदन यांचा सुवास आहे. कोमल फुलांची शय्या आहे. पण तरीही विरह भावनेची धग कमी होत नाही. चंदनाची चोळी देखील सर्वांगाला चटके देते. तो देवकीनंदन, तो कान्हो वनमाळी भेटलाच पाहिजे. कारण त्याच्याशिवाय या सृष्टीतलं कोणतंही सौंदर्य मनाला रुचत नाही. तो कृष्णसखा, तो भवतारक कान्हा भेटला तरच या जीवनात रस निर्माण होईल. विरहाचा अग्नी अंगअंग जाळत आहे. माथ्यावर दाटून आलेल्या मेघांचा आणि सभोवताली वाहणाऱ्या वाऱ्याचा मधुर आवाज विरहाची उष्णता वाढवीत आहे.

हा शृंगारिक आशय ज्ञानेश्वरांनी या भावगीतात किती कौशल्यानं ओतला आहे. विरहिणीच्या वेदनेशी सहकंप पावल्याशिवाय - नव्हे स्वत:च विरहिणी झाल्याशिवाय हे दु:ख इतक्या आर्तपणे व्यक्त होऊ शकत नाही. जो अनुभव चित्रित करायचा त्या अनुभवाच्या लहरी आपल्या मनात उचंबळून आल्याशिवाय कवितेला रसवत्ता लाभत नाही. ज्ञानेश्वरांची ही कविता नादपूर्ण शब्दांनी म्हणजे प्रासानुप्रासांनी नटलेली आहे. अर्थदृष्ट्या ती अगदी सहज आहे. पण विरहशृंगाराचा भावार्थ तिच्यात पूर्णपणे भरलेला आहे. चंदनाची चोळी, सुमनाची शेज ही देखील आगीसारखी वाटते. या विरहाच्या ज्वाला शमवण्यासाठी देवकीनंदनाचीच तीव्र ओढ लागलेली आहे. संपूर्ण कवितेत भावाकुलता आणि विरहिरणीच्या चित्रातली वेदना साकार झाली आहे. कृष्णाने सांगितलेल्या गीतेवर तात्त्विक भाष्य करणाऱ्या ज्ञानेश्वर नावाच्या एका विचारवंताचं विरहिणीच्या रूपातलं विव्हल दर्शन या ठिकाणी होतं. कवितेतले सारे शब्द गाणारे आणि नाचणारे आहेत. याचा अर्थ या कवीच्या हृदयात विरहशृंगाराच्या, गोपिकेच्या काही भावलहरी उपस्थित होत्या. विरह आणि मीलन हे प्रेमाच्या क्षेत्रातील अनुभव ज्ञानेश्वरांच्या प्रतिभादृष्टीनं वर्ज्य मानलेले नाहीत.

जातिवंत कवीला कोणताही जीवनानुभव स्वागतार्ह वाटतो. कारण त्याचं जीवनाच्या अंगप्रत्यंगावर प्रेम असतं. मला तरी संतकवींच्या अशा प्रकारच्या विराण्या विठ्ठलभक्तीच्या अभंगापेक्षाही अधिक सुरस आणि अर्थपूर्ण वाटतात. भक्ती ही भावना समर्थ आहे यात शंका नाही. पण प्रीतीची भावना अधिक गहिरी, अधिक प्रबल आणि प्रमत्त आहे हे अशा काव्यातून जाणवतं. ज्याला भक्ती करता येत नाही त्याला प्रीतीचा अर्थ आणि खोली कळणं शक्य नाही. संपूर्ण जीवनाला उदात्त आनंदाच्या उच्च पातळीवर प्रीती नेऊ शकते. प्रीती म्हटल्यावर ती स्त्री-पुरुषांची अदम्य प्रीती हीच प्रामुख्यानं दृष्टीपुढं येते.

संत कवयित्री मीरेनं तर कृष्णप्रेमासाठी आपल्या पतीलाही त्यागलं होतं. कृष्णप्रेमासाठी आर्तमधुर गाणी गात गात मेवाडच्या रुक्ष भूमीवर तिनं प्रीतीची हिरवळ निर्माण केली. खरं तर कृष्ण आणि मीरा यांच्या काळात शेकडो वर्षांचं अंतर आहे. पण प्रेमाची शक्ती काळाचं अंतर न जाणता निरंतर प्रेमविचारातच गढून जाते. प्रेम हे एक अनिवार वेड आहे. ते लागल्यावर जगाचे सारे संकेत प्रेमिकाला झुगारून द्यावेसे वाटतात. जो जगाला बांधला आहे त्याला जगाच्या बंधनांची कदर असते. पण राधेप्रमाणंच मीरेचंही प्रेम सारे लौकिक पाश तोडून अलौकिक पातळीवर पोहोचलं होतं. मीरेच्या डोळ्यांतल्या काजळात कृष्ण होता. तिच्या मनात तो आपल्या बासरीचे सूर भरत होता. तिच्या पायातल्या पैंजणात तो नाचत होता. तिच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूतून तो उचंबळत होता. मीरा म्हणजे कृष्ण नावाच्या एका महासागरावर आलेली प्रेमाची दुर्दम्य लाट होती. उचंबळणारी लाट सागराशीच निगडित असते. मीरा हे कृष्णाचंच रूप होतं. म्हणूनच तिच्या प्रत्येक कवितेतून कृष्णच अवतीर्ण झाला आहे. श्रीकृष्ण हा मीरेचा प्राणवायू होता. तिच्या प्रत्येक श्वासात तो मुरला होता. कृष्णवेड लागलेली मीरा जगाच्या दृष्टीनं कुलकलंकिनी ठरली. पण भक्ती आणि प्रीती या भावनांची प्रतिष्ठा सहस्रपटीनं वाढवणाऱ्या मीरेची नोंद, इतिहासानं कृष्णाची चिरकालीन प्रेयसी म्हणून केली आहे.

संत जनाबाईच्या काव्यातही प्रणयभावनेचे रंग काही ठिकाणी मिसळले आहेत. ती प्रेमानं विठ्ठलाला 'पंढरीचा चोर' म्हणते. आता जनाची लाज न धरता प्रियकराच्या घरी भर बाजारातून जाईन पदर खांद्यावर आला तरी त्याची पर्वा न करता त्या केशवाच्या (विठ्ठलाच्या) घरी जाईन, असं तिनं प्रेयसीच्या उत्कटतेनं म्हटलं आहे. भक्तीची अभिव्यक्ती शृंगारभावनेच्या माध्यमातून अधिक जोमदारपणे होऊ शकते हे अनेक ओव्या अभंगातून दाखवता येईल. एकनाथ आणि तुकाराम या संतांच्या विराण्या शृंगाराचं रूप चित्रित करतात.

ज्ञानेश्वरांनीसुद्धा विरहोत्कट अभंग लिहावेत याचं आश्चर्य वाटून एकानं प्रश्न विचारला, 'साधुसंतांच्या मनातही शृंगाराचे इतके गाढ तरंग असतात हे चमत्कारिक वाटतं. भक्ती प्रकट करताना ती 'रती' मधून त्यांनी का व्यक्त करावी ?'

या प्रश्नाला उत्तर इतकंच की सर्व भावनांत रतिभावना अत्यंत समर्थ असते. परमेश्वराची भक्तीदेखील या भावनेतून प्रकट होते. संतांच्या ठायी असलेला सौंदर्यवादी कवी कोणताही रस वर्ज्य न मानता त्या रसाचा आविष्कार करतो.

शृंगारभावनेचं उदात्तीकरण संतांनी लिहिलेल्या विराण्यांतून झालेलं आहे. शृंगारातली मधुरता आणि व्याकुळता ज्ञानेश्वरांसारखा अभिजात कवी अत्यंत हृद्य पद्धतीनं व्यक्त करतो. विरहिणीचं विरहदु:ख आकाशात मेघ दाटून आले की वाढत जातं. मग सारे शीतलोपचार व्यर्थ होतात. 'घनु वाजे घुणघुणा' या गीतातल्या शब्दांतलं नादसौंदर्य अवीट आहे. हे गीत ऐकताना कोणालाही 'देवकीनंदन कान्हो वनमाळी' याची ओढ लागेल. पुरुषांमधलाही स्त्रीभाव जागृत करू शकेल आणि विरहिणीच्या दु:खांशी समरस होऊ शकेल इतकं सामर्थ्य या गीतात आहे. ज्ञानेश्वरांच्या हृदयातल्या विरहिणीचं दु:ख आणि तिची आर्तता कोवळ्या, हळव्या शब्दांतून साकार करणारी ही कविता मला नेहमीच फुलवीत आली आहे. विरहदु:खानं भिजलेल्या अनेक कविता माझ्या वाचनात आलेल्या आहेत. मेघदूतातला विप्रलंभ शृंगार सुंदर ठरला तरी ज्ञानेश्वरांच्या या कवितेतल्या विरहभावनेच्या गहिरेपणाला तोड नाही. 'म्हणोनि माझे नित्यनवे। श्वासोश्वासही प्रबंध होआवे।' हे ज्ञानेश्वरांनीच आपल्या कवित्वासंबंधी काढलेले अभिमानाचे उद्‌गार सर्वस्वी सार्थ आहेत याची सुंदर प्रतीती 'घनु वाजे घुणघुणा' या अमर विराणीमधून येते.

●●●

## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे प्रकाशित साहित्य

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व
साहित्यवेध
संतकवी तुकाराम : एक चिंतन
काही रंग काही रेषा
हिरव्या वाटा
आनंदाची डहाळी
संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
जगायचं कशासाठी ?
रंग एकेकाचे
संत सहवास
संतांचिया भेटी
अमृतकण कोवळे
संतवीणेचा झंकार
समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज
सुखाचा परिमळ
संत तुकारामांचा जीवनविचार
मन पाखरू पाखरू
साहित्यातील प्रकाशधारा
संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी
प्रिय आणि अप्रिय
चिंतनाच्या वाटा
दीपमाळ
अजून जग जिवंत आहे !

### संपादित

ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
चिपळूणकरांचे तीन निबंध
प्रबोधनातील पाऊलखुणा
निवडक लोकहितवादी
रत्नकरंड श्रावकाचार
यात्रिक
कल्लोळ अमृताचे



मरणाच्या कितीही विक्राळ लाटा जगावर आल्या तरी जग अजूनही जिवंत आहे. प्रिय व्यक्तीचा हात जोपर्यंत माझ्या हातात आहे तोपर्यंत हे मृत्यो, तुझ्या दाहकतेला आणि क्रूरतेला मी भीक घालणार नाही. जोपर्यंत आईच्या स्तनांत वात्सल्याचं अमृतमय दूध आहे आणि जोपर्यंत ते तान्हुल्याच्या मुखात पडत आहे तोपर्यंत मरणाला कोण भितो ? अजून चंद्रोदय होतो. अजून सागर प्रेमातिशयानं उचंबळतो. अजून जीवनाचे सूर लहरत आहेत. अजून जग जिवंत आहे.
हा जीवनवादी विचार घेऊन आलेलं हे नवीन पुस्तक लेखक निर्मलकुमार फडकुले यांच्या जीवनप्रेमाची जशी साक्ष देते त्याप्रमाणंच जीवनातल्या कुरूपतेची आणि विसंगतीचीही ओळख करून देते. जगावं की मरावं ? या प्रश्नाचं निःसंदिग्ध उत्तर या ललित लेखनांतून आपल्याला मिळेल. अस्वस्थ आनंद देणारं हे लेखन अंतर्मुख करील.

सुविद्या
प्रकाशन